


रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ९ जून २०२४


# एक मोदी २६ नेत्यांवर भारी!

आधुनिक केसरी

**भारतात राम मंदिर उभारणीनंतर २०२४ लोकसभा निवडणूक झाली. यावेळी मोदी सरकारने विकासाच्या मुद्दावर 'चारशे पार' नारा दिला. तर दुसरीकडे मोदींना सत्तेतून घालविण्यासाठी २६ पक्षांच्या 'इंडी' आघाडीने निवडणुकीत जात, धर्म, घटनेबाबत दिशाभूल करणारा प्रचार केला. यात 'एम' फॅक्टर'ची इंडी आघाडीला साथ मिळाली. त्यामुळे भाजपाला बहुमताची संख्या गाठता आलेली नाही. पण मोदी नेतृत्वाने भाजपाला २४० जागेवर यश मिळवून दिले, तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए') स्पष्ट बहूमत मिळाले. देशात १९६४ च्या पंडित नेहरूनंतर भाजपा पक्षाचे व मोदी हे तिसऱ्यांदा पंतपधान होणारे दुसरे नेते आहेत.**

भारतात लोकशाही पध्दतीने होणाऱ्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीकडे जगाचे लक्ष लागले होते. मोदी सरकारच्या दहा वर्षाच्या देशाचा आर्थिक प्रगती विकासाला मोठ्या प्रमाणात गती मिळाली. त्याच बरोबर अयोध्यात प्रभू राम मंदिराची उभारणी सोहळा हिंदु समाजासाठी आनंदाचा व उत्साहाचा ठरला.यामुळे जनतेचा मोदी सरकार वर विश्वास वाढला होता.त्यामुळे या निवडणुकीत मोदी सरकारला चारशेच्यावर जागा मिळतील, असा विश्वास होता.दुसरीकडे गांधी परिवार व काँग्रेसने मुस्लिम वोट बँकेसाठी राम मंदिर सोहळ्यावर बहिष्कार टाकला. मोदी विरोधकांनी मोदी नेतृत्वाची चांगलीच धास्ती घेतली होती.पण एकट्या मोदींना पराभूत करणे अशक्य वाटत २६ पक्षांनी इंडी आघाडीला जन्म दिला. याचे कारण मोदी सरकारने भ्रष्ट राजकारणी विरोधात कारवाई सुरू केली.त्यामुळे परिवारवादी व भ्रष्टाचारी पक्षाच्या नेत्यांनी मोदी सरकारवर दवाब आणण्यासाठी राजकीय मंचाचा वापर केला. मोदींची पुन्हा सत्ता आली तर आपले पक्षाचे दुकान बंद करावे लागेल व जेलमध्ये जावे लागेल. या भीतीने 'मोदी सत्तेत नको' मागणी केली. या निवडणुकीत इंडी आघाडीची विरोधात मोदी अशीच लढाई झाली. इंडी आघाडीच्या नेत्यांनी पंतप्रधान मोदींना सतत लक्ष्य केले. मोदींनी देश विकला,भारतीय घटना समाप्त केली जाणार असून मागासवर्गियांचे आरक्षण रद्द केले जाणार आहे.असे दिशाहिन विषय उचलून मतदारांची दिशाभूल केली. संवैधानिकपद असलेल्या पंतप्रधानां शिव्या देण्यापर्यंत मज्जल गाठली. खर म्हणजे,घटना आहे म्हणून तर राष्ट्र आहे, नेते व निवडणुका आहेत. वास्तविक मोदीच काय ? कोणताही नेता, पक्ष देशाची घटना बदलू शकत नाही.आबेंडकर चळवळीत अनेक विचारवंत आहेत,जेंव्हा इंडी आघाडी नेत्यांकडून घटनेबाबत अप्रचार करत असताना ते गप्प का बसले?यात वंचित पक्षाचे नेते व डॉ. आंबेडकरांचे नातू प्रकाश आंबेडकर यांनीही भर टाकली. याचे आश्चर्य वाटते!वास्तविक पहाता, काँग्रेस सरकारने घटनेची मुळगाभा बदलून करुन प्रकाशित केली. घटनेची छेडछाड केली. त्याचा मुळ आकार बदलून डायरीचे स्वरुप दिले. हा घटनेचा अवमान नाही काय? यावर कोणी आक्षेप का घेत नाही! भाजपा सरकारच्या काळात झाले असते, हीच मंडळी रस्त्यावर उतरली असती. उलट मोदींनी घटनेचा आदर केला, या घटनेला प्रथम नमन करुन त्यांची देशाची सूत्रे स्विकारली मोदींना घटना व्देषी ठरविण्याचा काँग्रेस पक्षाने नीचपणा केलेला आहे. सतेसाठी वाटेल त्या घोषणा केल्या!त्यात जातीय जनगणानाच्या नावाने समाजात फूट पाडणे,सवंग घोषणाव्दारे गरीब मतदांरांना भुलविण्याचा प्रयोग केला.केवळ हिंदु मतांच्या विभाजणासाठी जातीयतेचा हा डाव खेळला गेला. दुसरीकडे मुस्लिमांना आरक्षण देण्याचा छूपा अजेंडाचा राबविला गेला. महागाई आणि बेकारीबाबतची सतत खोटी माहिती दिली जात होती. पण राजकारणाचा भाग म्हणून विचारवंतानी देशाच्या विकासाबाबत मौन पाळावे,वस्तुस्थिती मांडण्यासाठी पुढे येवू नये दुर्देव आहे. राहुल गांधी व आखलेश जोडीने तर महिलांना एक लाख रूपये देण्याचे ग्यारंटी कार्डचे वाटप केले. निकालानंतर पैसे खटाखट खात्यावर जमा होतील,असे जाहीर केले. पण निकालानंतर उत्तरप्रदेश, कर्नाटकात महिला मतदार कार्ड घेवून पैश्यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयासमोर रांगा लावत आहेत,ही तर गरिबांची फसवणूक आहे. भाजपाला २०१९ मध्ये ४३६ जागा लढविल्या त्यात ३०३जागेवर विजय मिळविला होता. या वेळेस पक्षाने ४४१ जागा लढविल्या यावेळी २४० जागेवर यश मिळाले, मताची टक्केवारी ३६.५६ टक्के आहे. पक्षाच्या ६३ जागेत घट झाली असून बहुमताचा आकडा गाठता आलेला नाही. तर काँग्रेसने जागा मागील निवडणुकीत ४४१ जागा लढविल्या, त्यात ५२ जागेवर यश मिळविले. यावेळेस पक्षाने २८५ जागा लढविल्या व ९९ जागा जिंकल्या, टक्केवारी २१.९६ असून ४७ जागात वाढ झाली. यात घटनेप्रमाणे केंद्रात सरकार स्थापनेसाठी बहुमताचा २७२ चे संख्याबळ लागते.या निवडणुकीत मतदारांनी 'एनडीए'चे बाजूने




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850





कौल मिळालेला आहे. एनडीएने २९२ तर इंडी आघाडीने २३४ जागा मिळाल्या.पण गांधी परिवाराला व इंडी आघाडीच्या नेत्यांना जनमताचा हा कौल मान्य नाही. मोदीच्या विरोधात कौल दिला गेला आहे,असे काँग्रेसचे अध्यक्ष खडगे म्हणाले.काँग्रेस व इंडी आघाडीला बहुमत मिळालेले नाही,तरी जनमताच्या विरोधात कांगावा करत आहेत. राजकारण हे जुगार आहे. तेंव्हा जागांचे गणिते चुकतात. या निवडणुकीत भाजपाचे गणित चुकले आहे. पक्षाच्या जागेत घट झाली. याचा अर्थ जनतेने भाजपा व एनडीला नाकारलेले नाही. यावेळी भाजपाच्या जागा घटल्या व गांधी दोन मतदार संघात निवडून आले म्हणजे लोकशाही,घटना वाचली काय? भाजपाच्या जागा घटल्या ना! गांधी परिवार याच खुशीत आहे.पण पक्षाला व इंडी आघाडीला अपयश आले,याची त्यांना खंत वाटत नाहीये!.रायबरेली मतदारांनी तर गांधींना ओटीत घेतले आहे. गांधी हे रायबरेली मतदार संघाचा राजीनामा देतील व प्रियंका वाड्रासाठी लोकसभेत जाण्याचा मार्ग मोकळा करतील! मग गांधी परिवार संसदेत सदस्यांना नजरेत ठेवतील!देशात १९९१ मध्ये पी.व्ही नरसिंहराव सरकारनंतर काँग्रेसला आजपर्यंत २४० जागा जिंकता आलेल्या नाहीत.इतेकच नव्हे, मोदी नेतृत्वाखाली झालेल्या तीन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला भाजपाचे आताचे संख्याबळ गाठता आलेले नाही. तसेच १९९९ पासून काँग्रेसचे नेतृत्व गांधी परिवाराकडे असताना पक्षाची मतांची टक्केवारी घसरत गेलेली आहे,याचा विसर पडला वाटत! त्याचप्रमाणे २००४ व २००९ च्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले नसताना काँग्रेस पक्षाने कोणत्या नैतिकतेच्या आधारावर मनमोहसिंग यांचे सरकार स्थापन केले?

देशात लोकसभेच्या ५४३ जागापैकी उत्तरप्रदेश महाराष्ट्रात व पश्चिम बंगाल सुमारे १५३ जागा आहेत.या राज्यात मुस्लिम मतदारांनी आपली मताची ताकद दाखविली आहे.म्हणतात ना!'भरोश्याच्या म्हशीने हलगट दिले'.या ३ राज्यांत भाजपाला शंभर जागेचा तरी फटका बसला आहे. उत्तरप्रदेशच्या एका बहुल मुस्लिम मतदार एका गावात मोदी सरकारने भेदभाव न करता घरकुल व आदी योजनांचा लाभ दिला.पण गावात भाजपाला एकही मत मिळालेले नाही.अयोध्यात राम मंदिर उभारणी झाली,तो फैजापूर लोकसभा मतदार संघात येतो.या मतदार संघाचा निकाल तर सनातन धर्माला लाजविणारा आहे.या मतदार संघातून भाजपाचे लल्लूसिंग हे २०१४ २०१९ मध्ये निवडून आले.पण यावेळी सपाचे उमेदवार अवधेश प्रसाद निवडून आले.तेंव्हा हिंदु मतदार जागा झालेला नाही! तो अजून झोपलेला आहे,तो जाती जातीत विभागला गेला आहे. भारतात मोगल व इंग्रजाने 'फुट डालो और राज करो'नीतीचा अवलंब केला!तीच नीती इंडी आघाडीची आहे.महाराष्ट्रात लोकसभेचा निकाल तर आश्चर्यकारक आहे. राज्यातील मुस्लिम व मराठा फॅक्टरची काँग्रेसला साथ दिली.ज्या मराठा समाजाला काँग्रेसने व शरद पवारांनी ५५ वर्षे आरक्षण दिले नाही पण शिंदे - फडणवीस सरकारने मराठा समाजाला कायदेशीर आरक्षण दिले. पण बिनचिपळ्याचे नारद व नेते शरद पवार हे जरांगेच्या माध्यमातून शिंदे व फडणवीस सरकार आणि भाजपा विरोधी डाव खेळण्यात यशस्वी झाले,याची चर्चा आहे. यातून मराठवाड्यात मराठा फॅक्टरने भाजपाचा बदला घेतला,याची समाजात चर्चा सुरु आहे.आता महाराष्ट्रात काँग्रेस मोठा तर ठाकरे शिवसेना लहान भाऊ मानायचे काय? ठाकरे शिवसेना तिसऱ्या तर पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चौथ्या क्रमांकावर गेला. शिंदे सरकारमध्ये लोकप्रतिनिधींची' कमीशनखोरी' वाढलेली आहे. नांदेड मतदार संघात विकास निधीच्या नावावर आमदारांचे 'कल्याण' झाले.शासकीय योजना गरीब कुटुंबापर्यंत पोंहचत नाहीत.सामान्यांचा आवाज सरकारच्या कानापर्यंत जात नाही! ही वस्तुस्थिती आहे.याचा फटका येत्या विधानसभा निवडणुकीत शिंदे सरकारला फटका बसेल,तेंव्हा त्यांचे डोळे उघडतील!

देशात मोदी नेतृत्वाने २०१४ भ्रष्टाचार २०१९ ला विकासा प्रश्नावर काँग्रेस व आघाडीला पराभूत केले होते.या निवडणुकीत विकासाचा मुद्दा महत्वाचा होता.त्याकडे दुर्लक्ष झाले.निवडणुकीत देशाच्या विकासापेक्षा जात,धर्म,व वैयक्तीक लाभाच्या योजना,महत्वाच्या वाटतात.भाजपाला अपप्रचार खोडता आलेला नाही.त्यात भाजपाला बहुमत मिळाले नाही तेंव्हा मोदींनी पंतप्रधान न होता विरोधी पक्षात बसावे,असा नैतिकतेचा सल्ला काँग्रेस व सपाने दिला आहे.देशात काँग्रेसला अनेक वेळा बहुमत मिळालेले नसतानाही केंद्रात सरकार स्थापन केले व अनेक सरकारे पाडली आहेत,त्या पक्षाने नैतिकतेचा धडे द्यावेत काय?यावेळीभाजपा नेत्यांचा अतिआत्मविश्वास भोवला!भाजपाचे कार्यकर्ते आम्ही निवडून येणार म्हणून गाफील राहिले! मोदीच्या नेतृत्वामुळे यावेळी बारा राज्यात भाजपाला मोठे यश मिळाले.राजधानी दिल्लीतील सर्व जागा भाजपाने जिंकल्या.तसेच लोकसभा निवडणुकीबरोबर आंध्र प्रदेश,ओरिसा, अरुणाचलप्रदेश,सिक्कीम या राज्यात विधानसभेची निवडणूक झाली! ओरिसात २५ वर्षानंतर भाजपाने सत्ता मिळविली.अरुणाचल प्रदेश भाजपाला बहुमत मिळाले.काँग्रेसची सत्ता असलेल्या तेलंगणा व कर्नाटक,हिमाचल राज्यात भाजपाने अधिक जागा जिंकल्या आहेत. यावेळी काँग्रेसचे राजपूत्र राहुल गांधी नेतृत्वाची जादू चालली नाही. उत्तरप्रदेशमध्ये सपाने ३७ जागा जिंकल्या,सपाने ''पीडीए' च्या नावाने जातीयवादी राजकारण केले.या राज्यात काँग्रेसला केवळ सहा जागेवर यश मिळाले!तरी परिवार भक्त नेते प्रियंका वाड्राला श्रेय देत आहेत. पण चंद्राबाबु नायडू व नितीश कुमार हे भाजपाला साथ देतील काय? हे ''एनडीए' चे सरकार पाच वर्षे टिकेल काय? असे भाकित करणारी चर्चा माध्यमावर सुरु आहे.इंडी आघाडी फूट पडण्यास सुरुवात झाली आहे. आम आदमीने विधानसभा निवडणुकीसाठी आता काँग्रेसला फारकत दिली आहे.

काँग्रेसचे नेते राहुल गांधींचे सरकार स्थापन करण्याचे स्वप्न पुन्हा भंगले आहे!गांधी परिवाराचेमुळे काँग्रेसला यश मिळत येत नाही,तरी काही नेते त्या परिवाराची सेवा करत बसले आहेत!एनडीए आघाडीची बैठकीत मोदी यांची नेता म्हणून निवड झाली.दुसरीकडे इंडी आघाडीची बैठकीत बहुमताचा आकडा जुळविणे कठीण आहे,याचा अंदाज आला.तसेच नेता निवडीवरही एकमत झालेले नाही.अखेर इंडी आघाडीने विरोधी पक्षात बसण्याचे निर्णय घेतला.यावेळी मोदी सरकार नव्हे,एनडीएचे सरकार!असा टोमणा मारला जात आहे.काँग्रेसला आघाडी सरकारचा अनुभव अधिक आहे.मोदी हे 'रिमोट कंट्रोल' ने सरकार चालणारे नाही. पण मोदी सरकार भाजपाचा अजेंडा राबविताना अडचणी येतील! मोदी सरकारचा शपथविधी होण्याच्या आधी जेडीयुचे राष्ट्रीय नेता केसी त्यागी यांनी मागण्याचा मिडीयासमोर मागण्याचा पाढा वाचला.तेंव्हा मोदी सरकारला निर्णण घेतांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. मोदींचा चुकीचे निर्णय घेण्याचा व ऐकण्याचा स्वभाव नाही.काँग्रेसने तर मोदी सरकार विरोधात आताच आरोपसत्र सुरु केले आहे.इंडीआघाडीचे गिधाडे मोदी सरकार पडण्याची व सत्तेच्या शिकार करण्याच्या प्रतिक्षेत बसला आहे.भारताचे.मोदी पुन्हा पंतप्रधान होत असल्याने जगभरातून राष्ट्रप्रमुखांचे शुभेच्छा संदेश येत आहेत.भारतात लोकशाहीत निवडणूक निकालानंतर राजकीय कटूता संपली पाहिजे, काँग्रेस नेते ही मर्यादा पाळत नाहीत.निवडणुकीची धूळवड संपली तरी इंडी आघाडीचा मोदी विरोधी शिमगा चालू आहे.गांधी परिवाराच्या नसा-नसात मोदी व्देष भरलेला आहे.गांधी यांच्या आजोळच्या आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी मोदींना शुभेच्छा दिल्या,पण गांधी परिवाराने शुभेच्छा सौजन्य दाखविलेले नाही.'राहुल गांधी तर तर' मोदी चार जून को जानेवाला है' अशा शब्दात वल्गना केली होती. पण पुन्हा मोदीची सत्ता येत आहेत.हे गांधी व इंडी आघाडीचे अपयश आहे. मोदी हे २६ नेत्यांना भारी पडले आहेत.इंडी नेत्यांना जबरदस्त चपराक बसली आहे. ते इ.व्ही.एम.अपयशाचे खापर न फोडता आम्हाला जनादेश मिळाला असा कांगावा करत आहे.पण कांही असो! मोदी तिसऱ्यांना दि.९ जून रोजी पंतप्रधानदाची शपथ घेत आहेत.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

आजकाल ज्यांना आपण प्रायोगिक नाट्यप्रयोग म्हणतो अशा प्रकारची अनेक प्रायोगिक नाटके टागोरांनी लिहिली, बसवली आणि रंगभूमीवर सादर केली. त्यांना जागतिक कीर्ती प्राप्त झाल्यानंतरही आपल्या स्वतःच्या नाटकांमध्ये अभिनयासाठी ते स्वतः उभे राहत.

टागोरांच्या नाटकांचे एक वैशिष्ट्य होते. लोकांना नाटके हवी म्हणून त्यांनी कधीच नाटके लिहिली नाहीत. त्यांचे नाटक त्यांना आलेल्या अनुभूतीतून आले. जे आतून स्फुरले तेच त्यांनी लिहिले. एखादे नाटक बसवायचे म्हणून नाटक लिहिणारे लेखक आणि केवळ आपल्याला वाटते ते उत्स्फूर्तपणे शब्दबद्ध करणारे रवींद्रनाथ हा फरक त्यांच्यात आणि इतर नाटककारांमध्ये सांगता येईल. प्रेक्षकांना काय हवे आहे त्याचा त्यांनी विचार केला नाही. प्रेक्षकांना जे हवे ते देण्यापेक्षा जे आपल्याला वाटले ते त्यांनी लिहिले आणि त्यांनी आपल्या स्वतःचा प्रेक्षकवर्ग तयार केला हे त्यांचे मोठेपण आहे. नाटकात गीते हवीत म्हणून मुद्दामून गीते न लिहिता, त्यांना ज्यावेळी प्रेक्षकांना नात्याची काव्यात्म अनुभूती द्यावीशी वाटेल, त्यावेळी त्यांनी ती गीतनाट्यातून दिली. त्यातील काव्य एखाद्या सुंदर फुललेल्या फुलाप्रमाणे त्यांच्या अंतरंगातून उमलून येत असे.

त्यातूनच त्यांचे रवींद्र संगीतही जन्मले. रंगभूमीवरील प्रथितयश नट आपल्या नाटकात घेण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या परिवारातील, परिसरातील, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, सेवक आदींना त्यांनी संधी दिली आणि त्यांच्यातून अप्रतिम असे कलाकार घडवले. जीवनातील सत्याबरोबरच रवींद्रनाथ हे जीवनातील सौंदर्याचेही उपासक होते. निसर्गातील रौद्र रूपातही सौंदर्य पाहणारा हा माणूस होता. त्याशिवाय जीवनाची एकात्म अनुभूती येत नाही असे त्यांना वाटत असे. प्रख्यात आंग्ल नाटककार शेक्सपिअरने म्हटले आहे की ' जग ही एक रंगभूमी आहे आणि आपण सगळे या रंगभूमीवरील कलाकार आहोत. प्रत्येकाची भूमिका ठरलेली आहे. ' या सत्याचा साक्षात्कार त्यांना होत होता आणि त्यांच्या केवळ साहित्यकृतीतूनच नव्हे तर वागण्याबोलण्यातून हा अविष्कार प्रकट होत होता. ( क्रमशः



## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

जगातगुरु योगाचार्य गोरक्षनाथजी जगातगुरु योगाचार्य श्री गोरक्षनाथजी नवनाथ संप्रदाय उपदेश त्रिंबकेश्वर हे नाथ संप्रदायाचे



उगम स्थान मानले जाते. याच ठिकाणी गुरु गोरक्षनाथांनी ९ नाथांना व ८४ सिद्धांना उपदेश केला. ते उपदेश केलेले ठिकाण म्हणजे अनुपम शीळा होय. ऋषींना घेऊन गुरु गोरक्षनाथ कौलगिरीकडे गेले तेथे त्यांना एका शिळेवर सर्व ऋषींना बसवून उपदेश दिला त्यातील ९ शिष्यांनी तो जसाचे तसा ग्रहण केला त्यांना नवनाथ म्हणतात.

ते नवनाथ मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ व चरपटीनाथ. त्या शिळेला अनुपम शिळा म्हणतात. आदि गुरू दत्तात्रेय आणि गोरक्षनाथ यांचा संबंध पाहिला आहेच. भगवान दत्तात्रेय आणि सिद्धाचार्य गोरक्षनाथ यांची भेट गिरनार पर्वतावर झाली असल्याचे प्रसिध्द आहे. याच ठिकाणी गोरक्षनाथांवर दत्तात्रेयांनी सिद्धीसामर्थ्य दाखवून अनुग्रह केला. आज या स्थानाला "कमंडलू तीर्थ' या नावाने महत्त्व प्राप्त झाले आहे. गोरक्षनाथांनी येथील शिखरावरील दत्तपादुकांचे दर्शन घेतल्याची कथा प्रसिद्ध आहे. दत्तांनी त्यांना या ठिकाणी उन्मत पिशाचवत् अशा दिगंबर, भस्मचर्चित, जटाजूटधारी अशा स्वरूपात दर्शन दिले. नाना सिद्धींचे चमत्कार दाखवून गोरक्षनाथांवर दत्तात्रेयांनी याच ठिकाणी कृपा केली.

## निरूपण

आधुनिक केसरी

अहंकारनक्रें उडविलें । नेऊनि पाताळीं बुडविलें ।
तेथुनियां सोडविलें । न वचे प्राणी ॥ ३॥
काम =मगरमिठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना ।
मद मत्सर वोहटेना । भूलि पडिली ॥ ४॥
वासनाधामिणी पडिली गळां । घालून वेंटाळें वमी गरळा ।
जिव्हा लाळी वेळोवेळां । भयानक ॥ ५॥
माथां प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें ।
बुडतांही न सोडी, फुंजे । कुळाभिमानें ॥ ६॥
पडिलें भ्रांतीचें अंधारें । नागविलें अभिमानचोरें ।
आलें अहंतेचें काविरें । भूतबाधा ॥ ७॥
बहुतेक आवर्तीं पडिले । प्राणी वाहातचि गेले ।
जेंहिं भगवंतासी बोभाईलें । भावार्थबळें ॥ ८॥
देव आपण घालूनि उडी । तयांसी नेलें पैलथडी ।



आधुनिक केसरी


## दिसे पांडुरंग | ठायी ठायी ||

लोखंडासी गंज | माती संगे येतो ||
परिसाने होतो | सुवर्ण हा ||१||
मातीचिया संगे | रूजतो अंकुर ||
धान्याचे भांडार | देतो आम्हा ||२||
गर्भाचे ठायी | फुकाची हमाली ||
संगती नडली | दुर्जनांची ||३||
जैसा ज्याला लाभे | संग प्रारबधात ||
तैसा संसारात | भोग भोगी ||४||
पूर्वसंचिताने | लाभे संत संग ||
दिसे पांडुरंग | ठायी ठायी ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प ८५वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## वर्तमान युवा मन


युवा मन म्हणजे सळसळत्या चैतन्याचा झरा, मनात अनेक आव्हाने व स्वप्ने नित्य नवे करायला उद्युक्त करीत असतात. शरीरही निरोगी, स्वस्थ, कांतिमान असते. अशी अंतर्बाहय युवाशक्ती झपाटून ध्येयपूर्तीच्या कार्याला लागली तर अपेक्षेपेक्षा जास्त यश घेऊन आपला जोम वाढवीत असते. खरे पाहता, युवा जीवन हे असेच जायला हवे. पण गरिबी, सामाजिक परिस्थिती, दिशाहीनता ध्येयाचा अभाव, संस्कार व प्रबोधनाचा अभाव, बौद्धीक परिपक्वतेची कमी, चंगळवादी जीवनाचे आकर्षण, दूरदर्शिता नसणे, संगठनाचा अभाव, श्रद्धा, विश्वास नसणे, चारित्र्य व नैतिकतेच्या संवर्धनावर विश्वास नसणे, रोजगार न मिळणे, सतत उपेक्षित होणे व धिक्कारले जाणे, अशा सर्व बाजूंनी त्रासलेला युवा वर्ग बहुसंख्येने मरगळलेला, कमकुवत, प्रवाहात वाहत जाणारा दिसतो. दिवसेंदिवस समस्या वाढताहेत. नवी संकटे समोर ठाकली आहेत. भ्रष्टाचार, शोषण, भांडवलवादी धोरणे, आर्थिक विषमता, सामाजिक भेदभाव, प्रतिष्ठेच्या खुळचट कल्पना यांनी युवा मनाला परंपरेचे विरोधी बनवले आहे. मिळणारे पदवीसापेक्ष शिक्षण युवकांना दिशा देत नाही व मात करायलाही शिकवत नाही. अध्यात्म- शिक्षण योग्य पद्धतीने उपलब्ध होत नाही. त्यामुळे मन व बुद्धीचे जीवन व समाजसापेक्ष पोषण होत नाही. खरे तर, आताचा युवावर्ग खूप संवेदनशील, पूर्वग्रहमुक्त, तपासून घेणारा, तर्कनिष्ठ पद्धतीने विचार करणारा, सोशिक, प्रामाणिक व मेहनती आहे. त्यांच्यावर आरोप करण्यापूर्वी आम्ही अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे की आम्ही त्यांना नक्की काय देतो आहोत? आम्ही कोणती मूल्ये व आदर्श त्यांच्यासमोर जिवंतपणाने उभे करतो आहोत? आम्ही कोणती जीवनदृष्टी त्यांना दिली आहे. आम्ही त्यांच्या अंतर्मनाच्या विकासासाठी कोणते आश्वासक, प्रबोधन पर्यायी विश्व त्यांना खुले करून दिले आहे? साचलेल्या, शेवाळलेल्या, दूषित पाण्यात कमळे कशी उमलतील ? शब्दांची जादू आता ओसरली आहे. आवश्यकता त्यांना नव्या उमेदीची, सुसंवादाची, योग्य कार्यदिशेची, प्राथमिक गरजा भागवणाऱ्या जीवनशैलीची आहे. अध्यात्म सुद्धा असेच असावे, हा शाश्वत नियम आहे. सामाजिक समस्या सोडवणारे, मनाला आश्वस्त करणारे, आत्मभान देणारे, 'माणूस' म्हणून जगायला लावणारे, वैयक्तिक प्रश्नांची सोडवणूक करणारे असे अध्यात्म युवकांच्या मनाला, बुद्धीला निश्चित हवे असंणार, यात शंकाच नाही.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४**

# नामाचे सूक्ष्म स्वरूप

आधुनिक केसरी

नुसते ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य ' नोकरी नोकरी ' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. ' रामनाम ' आणि ' नोकरी ' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. ' राम राम ' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ' राम राम ' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी



करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे ' नोकरी नोकरी ' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण ' राम राम ' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. ' राम राम ' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा ' नोकरी नोकरी ' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच ' राम राम ' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता ' राम राम ' जपावे. मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकचः प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. ' मी ' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

**११. जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.**

## विकल्पनिरसन

आधुनिक केसरी

त्यालाच विज्ञान म्हणतात. एक माणूस अमृत प्यायला म्हणून तो अमर झाला. लोकांना मरण कसे येतें बुवा असे तो म्हणाला, त्याप्रमाणे



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आत्मज्ञानी पुरूष सामान्य माणसाला म्हणतो की अहो मनुष्य मेल्यावर त्याला जन्म कसा येईल/ सतत जागृत अवस्थेत रहावे. चांगल्या वाईटाचे अवलोकन करावे. भूतबाधा, विष चढते, गंडेदोरे, सामाजिक व्यवस्था बिघडेल, अनितीला प्रोत्साहन मिळेल असं कुणी वागू नये. खरेखोट्याची चाड असली पाहिजे व अन्यायाची चीड असली पाहिजे. सगळ्यांचा भावार्थ समजण्यासाठी आपण बध्द दशेत जावे.त्या दिशेची लक्षणे अंगी बाणली म्हणजे मग वाईट प्रश्नांना मनामध्ये जागाच शिल्लक रहाणार नाही. ज्ञानी पुरूषाची वृत्ति दृष्ट्या मधून बाहेर पडलेली असते. त्यामुळे बध्द माणसाच्या वृत्ती प्रमाणे ती दृश्यांमध्ये गुंतुन किंवा अडकुन पडत नाही. ज्याप्रमाणे भुकेलेल्या माणसाच्या अवस्थेची कल्पना पोट भरून तृप्त झालेल्या माणसाला येत नाही. त्याप्रमाणे ज्ञानी व मुक्त माणसाला बध्द माणसाच्या जीवनाची कल्पना सहजपणे येत नाही.

सारांश काय तर ज्ञानानेच मोक्षप्राप्ती होते. खोल आत्मानात्मविवेक सतत जागृत ठेवायला हवा,आत्मज्ञानाची अंतस्थितीसंपूर्ण समाजाने सतत पेरत ठेवली पाहिजे.

रविवार, ९ जून २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २७८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 9 JUNE 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-278 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-05


## भूमरेंच्या विजयात वैजापूरकरांचा सिंहाचा वाटा

आधुनिक केसरी न्यूज

राहुल त्रिभुवन

**वैजापूर : औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात अतिशय अटीतटीच्या झालेल्या निवडणुकीत शिंदेसेनेचे उमेदवार संदीपान भुमरे यांनी विजयश्री खेचून आणली. भुमरेंच्या विजयात वैजापूरकरांनी मोलाचा वाटा उचलून त्यांना विजयासाठी ९३ हजार २२१ मते दिली. अन्य पक्षांच्या उमेदवारांच्या तुलनेत भुमरेंना जवळपास ४० हजारांच्या मतांची आघाडी मिळाली. त्यांच्या या विजयामुळे शिंदेसेनेचे आमदार रमेश बोरनारे यांच्यासह भाजप नेत्यांचा वरचष्मा झाला आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत आ. बोरनारेंना जितकी मते मिळाली जवळपास तेवढीच मते भुमरे यांना मिळाली.**

गेल्या दोन महिन्यांपासून लोकसभा निवडणुकीचा धुराळा सुरू होता. ४ जून रोजी निवडणूक निकाल घोषित करण्यात आला. या अनपेक्षित व धक्कादायक निकालामुळे राजकीय वर्तुळ अक्षरशः ढवळून निघाले. विशेषतः वैजापूर विधानसभा मतदारसंघात





सेनेचे चंद्रकांत खैरे व एमआयएमचे इम्तियाज जलील या दोन उमेदवारांमध्येच चुरशीच्या लढत होईल. असे चित्र रंगविले गेले होते. त्यामुळे मतदारांनाही तेच अपेक्षित होते. परंतु या अनपेक्षित निकालामुळे विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांसह राजकीय विश्लेषक चांगलेच तोंडघशी पडले. वैजापूर विधानसभा मतदारसंघातच नव्हे तर निकालपूर्व चाचणीतही ( एक्झिट पोल) कुठेच स्थान दिले गेले नसतानाही भुमरेंनी मारलेली बाजी पाहता कौतुकास्पद म्हणावी लागेल. परंतु असे असले तरी भुमरेंसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची झालेली सभा, शिंदेसेनेचे आमदार तथा 'सर'सेनापती आमदार रमेश बोरनारे यांच्यासह भाजप नेते डॉ. दिनेश परदेशी, एकनाथ जाधव, कल्याण दांगोडे, बाबासाहेब जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाऊसाहेब ठोंबरे, पंकज ठोंबरे आदी सरदारांनी जिवाचे रान करून घेतलेली मेहनतही भुमरेंच्या पथ्यावर पडलीच.

विशेषतः आमदार बोरनारे व डॉ. परदेशींच्या मतदारसंघात असलेले तगड्या नेटवर्कमुळे भुमरेंना मोठा फायदा झाला. परिणामी भुमरेंना विधानसभा मतदारसंघातून ९३ हजार २३१ मते मिळाली. एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील हे दुसऱ्या क्रमांकावर राहिले असले तरी विधानसभा सभा मतदारसंघात त्यांना तिसऱ्या तर पराभूत उमेदवार चंद्रकांत खैरे यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. या दोघांना अनुक्रमे २५ हजार २१३ व ५६ हजार २०७ इतकी मते मिळाली. या दोघांच्या तुलनेत भुमरेंनी अनुक्रमे ६८ हजार १८ व ३७ हजार २४ मतांची आघाडी घेतली. गेल्या लोकसभा निवडणुकीत खैरेंना विधानसभा मतदारसंघातून ६६ हजार ६७१ तर जलील यांना ३५ हजार ४६२ मते मिळाली होती. यंदा मात्र खैरे १० हजार ४११ तर जलील १० हजार २४९ मतांनी पिछाडीवर असून या दोघांनाही मोठा फटका पडला आहे. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अफसर खान यांना मतदारसंघातून १० हजार ५३४ मते मिळाली. हर्षवर्धन जाधवांनाही गेल्यावेळी मतदारसंघातून ५५ हजार ५५४ मते मिळाली होती. एकंदरीतच गेल्या निवडणुकीच्या तुलनेत खैरे व जलील यांच्या मतांमध्ये घट झाली. त्यावेळी खैरेंसोबत भाजप व जलीलसोबत वंचित आघाडी होती. खैरेंना उबाठा सेनेच्या नेत्या सुषमा अंधारे व जलील यांना एमआयएमचे सर्वेसर्वा असदुद्दीन ओवैसी यांची सभाही तारू शकली नाही. याशिवाय खैरेंच्या पाठीशी उबाठा शिवसेनेचे माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर, संजय निकम, ॲड. आसाराम रोठे, डॉ. राजीव डोंगरे आदी नेते व कार्यकर्त्यांची भक्कम फळी होती. असे असतानाही ते दुसऱ्या क्रमांकावर फेकले गेले. दरम्यान भुमरेंच्या विजयासाठी बोरनारे व डॉ. परदेशी या जोडगोळीने मेहनतही तितकीच घेतली. याशिवाय विधानसभा मतदारसंघात झालेल्या विकासकामांनाही मतदार विसरले नाहीत. रोहयोमंत्री संदीपान भुमरे यांनी विविध योजनांच्या माध्यमातून केलेली विकासकामे त्यांच्या पथ्यावर पडलीच. याशिवाय बोरनारेंचा विकासकामांचा सपाटा पाहून मतदररांनीही त्यांच्यावर विश्वास टाकलाच. एकंदरीत सर्वच भक्कम बाजू भुमरेंच्या विजयासाठी सोयीस्कर होऊन विजय दृष्टीपथात आला. असे म्हणता येईल.

**बोरनारेंनाही मिळाली होती एवढीच मते** : सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत सेना – भाजप युतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार रमेश बोरनारे यांनी ९८ हजारांपेक्षा जास्त मते घेऊन विजयश्री खेचून आणली होती . एव्हाना तिच परिस्थिती या लोकसभा निवडणुकीत बघावयास मिळाली . बोरनारेंना विधानसभा निवडणुकीत जी मते मिळाली होती . तेवढीच मते जवळपास भुमरेंना मिळाली . असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही . अर्थात याचे श्रेय आ . बोरनारे यांच्यासह डॉ . परदेशी यांच्या चमूला द्यावे लागेल .

**मतदार संघात युतीचे प्राबल्य** : लोकसभा निवडणुकीत वैजापूर विधानसभा मतदारसंघात सेना – भाजप युतीच्या उमेदवारास ९३ हजार २३१ मते मिळाली . महाविकास आघाडीच्या उमेदवारास ५६ हजार २०७ मते मिळाली . याचाच अर्थ मतदारसंघात सेना – भाजप युतीचे प्राबल्य असल्याचे दिसून आले . गेल्या विधानसभा निवडणुकीतही युतीचे उमेदवार रमेश बोरनारे यांना भरघोस मते मिळाली . म्हणजेच मतदारसंघात युतीचे एक लाख मतदान आहे . हेच येथे अधोरेखित होते . आगामी विधानसभा निवडणुकीत जो कुणी युतीचा उमेदवार असेल त्याचा मार्ग सुकर झाला आहे . असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही .

## मी पळणारा नाही, लढणारा : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणूक निकालांत महाराष्ट्रात



भाजपाच्या अवघ्या नऊ जागा निवडून आल्या आहेत. भाजपाने महायुतीसह ४५+ जागा जिंकण्याचा दावा केला होता. प्रत्यक्षात महायुतीला १७ जागांवर यश मिळाले आहे. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामाही देण्याची तयारी ठेवली होती. त्यानंतर मुंबईतल्या दादर या ठिकाणी भाजपाची बैठक पार पडली. यावेळी आमदारांना संबोधित करताना देवेंद्र फडणवीस यांनी मी पळणारा नाही, लढणारा आहे, असे म्हणत रणशिंग फुंकले आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीला मिळालेल्या मतांची टक्केवारी ४३.९ टक्के इतकी आहे. तर महायुतीला ४३.३ टक्के मते मिळाली आहेत. राजकीय गणितांमुळे आपल्याला अपयश आले आहे. मात्र भविष्यात आपण हे चित्र बदलू, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मी पळून जणारा नाही, तर लढणारा आहे. उपमुख्यमंत्रीपद सोडले असते तरीही एकही दिवस घरी बसणार नव्हतोच. चारही घेरले गेल्यानंतर पुरंदरचा तह करणारे आणि पूर्ण ताकदीने मैदानात उतरुन सगळे किल्ले जिंकणारे छत्रपती शिवाजी महाराज हे आपली प्रेरणा आहेत. माझ्या डोक्यात काही एक प्रकारची रणनिती होती, आजही आहे. आपण सगळ्यांवर विश्वास दाखवला. मी अमित शाह यांनाही भेटलो, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हणाले.

## दुष्काळाने होरपळणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेला तातडीने मदत द्या : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील जनतेला दुष्काळाचे चटके बसत असताना त्यांना मदत करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे पण सत्ताधारी पक्ष निवडणुका व राजकीय साठमारीत व्यस्त असल्याचे दिसत आहे. सरकारचे दुष्काळाकडे होत असलेले दुर्लक्ष पाहता राज्यपाल महोदयांनी या प्रश्नी लक्ष घालून जनतेला मदत देण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेतकऱ्यांची अवस्था पाहता कोरडवाहू शेतीला एकरी २५ हजार रुपये, बागायती शेतीला एकरी ५० हजार रुपये तसेच फळबागांना एकरी १ लाख रुपये मदत तातडीने द्यावी. जनावरांसाठी चारा छावण्या सुरु कराव्यात व पिण्याच्या पाण्याची सोय करावी. खरीपाच्या पेरणीसाठी खते आणि बियाणे सरकारने पुरवावे अशी मागणी करत दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारला निर्देश द्यावेत अशी मागणी महामहिम राज्यपाल यांच्याकडे केल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. काँग्रेस पक्षाने महामहिम राज्यपाल रमेश बैस यांना पाठवलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, राज्यातील जनता सध्या भीषण दुष्काळाचा सामना करत आहे. जवळपास १० हजारांपेक्षा जास्त गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहेत. आजही हजारो वाड्या-वस्ता पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्यांपासून वंचित आहेत. शेतकरी संकटात आहे. हंडाभर पाण्यासाठी माता भगिनींना पायपीट करावी लागत आहे. धरणामधील पाणी साठ्याने तळ गाठला आहे. मुंबईसह अनेक शहराच्या पाणी पुरवण्यातही कपात केली जात आहे. पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट आहे. शेतीला पाणी मिळणेही दुरापास्त झाले आहे. शेतक-यांनी आपल्या पोटच्या लेकराप्रमाणे वर्षानुवर्षे सांभाळलेल्या फळबागा वाळून गेल्या आहेत. शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. संपूर्ण राज्यातील जनता अत्यंत अडचणींचा सामना करत आहे. दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत करावी अशी मागणी विरोधी पक्ष सातत्याने करत आहेत पण राज्य सरकार मात्र अजगरासारखे सुस्त पडून आहे. राज्यातील जनता दुष्काळाने होरपळत असतानाही सत्ताधारी पक्ष त्याकडे फारसे गांभिर्याने पाहत नाही, हे अत्यंत दुर्देवी आहे. राज्य सरकारने केवळ आढावा बैठक घेण्याचे सोपस्कार पार पाडले आहेत. मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीला अनेक पालकमंत्री गैरहजर होते त्यामुळे सरकारला दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य नाही हे स्पष्ट झाले आहे.






प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# राजकारण आणि समाज

आधुनिक केसरी

**राजकारण हा लोकशाही व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. राजकारणाद्वारे जनताआपल्या समस्यांचे समाधान, विकासाच्या मार्गांचा शोध, आणि सामाजिक स्थैर्य साधण्याचा प्रयत्न करते. मात्र, सध्या राजकारणाचा स्तर खालावत चालल्याचे स्पष्ट दिसत आहे. या घटनेचे परिणाम समाजाच्या विविध अंगांवर होत आहेत. राजकारणाचा खालावत चाललेला स्तर हा अनेक कारणांमुळे होत आहे. पहिल्यांदा, राजकीय नेत्यांचे वर्तन आणि त्यांच्या कृतींमध्ये आलेली अनैतिकता हे महत्त्वाचे कारण आहे. पूर्वीच्या काळात राजकारणी नेते समाजसेवेचे उदाहरण असायचे, मात्र आजकाल त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप, गुन्हेगारी कृत्ये, आणि अनैतिक वर्तनाचे शिक्के लागलेले आढळतात.**



## क्षितिजापल्याड

यामुळे जनतेच्या मनात राजकारणाबद्दलचा आदर कमी होत चालला आहे. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे राजकीय ाषेचा खालावत चाललेला स्तर. प्रचार सभा, निवडणुकीचे भाषण, आणि सामाजिक माध्यमांवर नेते एकमेकांवर चिखलफेक करतात. अपमानकारक भाषा, व्यक्तिकेंद्री टीका, आणि द्वेषमूलक वक्तव्ये यामुळे समाजात तणाव निर्माण होतो. राजकारणातील चर्चा मुद्देसूद असण्याऐवजी वैयक्तिक वादविवादांवर केंद्रित होत आहे. तिसरे कारण म्हणजे पैशांचा प्रभाव. आजकालच्या निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होतो. प्रचारासाठी, मतदारांना आकर्षित करण्यासाठी, आणि अन्य अनेक कारणांसाठी पैसा महत्त्वाचा झाला आहे. यातून भ्रष्टाचाराला उत्तेजन मिळते. कारण नेता एकदा निवडून आल्यावर तो आपल्यापैशांची परतफेड करण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करतो. राजकारणाच्या खालावत चाललेल्या स्तरामुळे समाजावर अनेक परिणाम होतात. राजकीय नेत्यांच्या चिखलफेकीमुळे आणि द्वेषमूलक वक्तव्यांमुळे समाजात तणाव निर्माण होतो. धर्म, जात, वर्ग, आणि भाषा या आधारांवर समाजाचे विभाजन होते. यामुळे सामाजिक सलोखा भंग पावतो आणि एकमेकांविषयी द्वेषभावना निर्माण होते. उदाहरणार्थ, काही निवडणुकांमध्ये नेते जातीच्या, धर्माच्या नावाखाली मतदारांना विभाजित करतात, ज्यामुळे जातीय, धार्मिक तणाव वाढतो. राजकारणातील भ्रष्टाचार समाजाच्या सर्व स्तरांवर परिणाम करतो. सरकारी यंत्रणा, न्यायव्यवस्था, आणि प्रशासनात भ्रष्टाचारामुळे सामान्य जनतेला योग्य सेवा मिळत नाहीत. हे लोकांच्या मनात नैराश्य निर्माण करते आणि त्यांचा सरकारवरचा विश्वास कमी होतो. यामुळे विकासाच्या प्रक्रियेला धक्का बसतो. राजकीय नेत्यांच्या वर्तनामुळे समाजात नैतिकतेचा अभाव निर्माण होतो. नेते जर स्वतः अनैतिक वर्तन करीत असतील, तर समाजातील इतर व्यक्ती त्यांचे अनुकरण करायला प्रवृत्त होतात. यामुळे संपूर्ण समाजाचा नैतिक स्तर खालावत जातो. लहान मुले आणि युवकांना योग्य आदर्श मिळत नाहीत, ज्यामुळे त्यांचे नैतिक शिक्षण प्रभावित होते. राजकारणातील पैशाच्या प्रभावामुळे आर्थिक असमतोल वाढतो. निवडणुकांमध्ये पैसा खर्च करणारे नेते सत्ता मिळवतात, तर गरीब आणि सामान्य व्यक्तींना राजकारणात संधी मिळत नाही. यामुळे आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि गरिबांच्या मध्ये असमतोल वाढतो, आणि समाजात असंतोष वाढतो. राजकारणाच्या खालावत चाललेल्या स्तरामुळे विकास प्रक्रियेला अडथळे निर्माण होतात. अनैतिकता आणि भ्रष्टाचारामुळे सरकारी निधीचा योग्य वापर होत नाही. विकास प्रकल्पांमध्ये विलंब होतो आणि अनेक प्रकल्प अर्धवट राहतात. यामुळे समाजाच्या प्रगतीला धोका निर्माण होतो. राजकारणाचा खालावत स्तर शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रावर देखील परिणाम करतो. शिक्षण व्यवस्था आणि आरोग्य सेवा या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांत भ्रष्टाचारामुळे योग्य सुविधा उपलब्ध होत नाहीत. यामुळे सामान्य जनता विशेषतः गरीब आणि ग्रामीण भागातील लोकांना योग्य शिक्षण आणि आरोग्य सेवा मिळत नाही. यावर उपाय शोधला पाहिजे. राजकारणाचा स्तर उंचावण्यासाठी काही उपाययोजना गरजेच्या आहेत. राजकीय नेत्यांनी नैतिकतेचे पालन करणे गरजेचे आहे. यासाठी राजकीय पक्षांनी आपल्या नेत्यांना नैतिक शिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नैतिक शिक्षणाचा समावेश करावा. राजकीय प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आवश्यक आहे. सरकारी कामकाजात आणि निधीच्या वापरात पारदर्शकता वाढवावी. यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. तसेच, नेत्यांची जबाबदारी ठरवावी आणि त्यांचे वर्तन योग्य आहे का यावर देखरेख ठेवावी. निवडणुकांमध्ये पैशाचा प्रभाव कमी करण्यासाठी कडक कायदे बनवावेत. निवडणूक खर्चावर मर्यादा घालावी आणि नियमांचे काटेकोर पालन करावे. समाजाच्या सर्व स्तरांवर राजकारणाबद्दल जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. जनतेने राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि योग्य नेत्यांची निवड करावी. प्रसार माध्यमांनी जबाबदारीने वर्तन करावे. त्यांनी योग्य माहिती आणि तथ्य आधारित बातम्या प्रसारित कराव्यात. माध्यमांनी द्वेषमूलक आणि विभाजनकारी भाषणांना प्रोत्साहन देऊ नये. राजकारणाचा स्तर सुधारण्यासाठी नव्या पिढीची भूमिका महत्त्वाची आहे. युवकांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेतल्यास, परिवर्तनाची नवी लाट निर्माण होऊ शकते. तरुणाईत उत्साह,



नवीन विचार आणि प्रगतीशील दृष्टिकोन असल्यामुळे ते राजकारणात नवा सन्मान आणि नैतिकता आणू शकतात. युवकांनी राजकारणात सक्रीय सहभाग घेणे आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि राजकीय प्रक्रियेतील त्यांचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे. मतदार म्हणून आपल्या अधिकारांचा उपयोग करून योग्य नेत्यांची निवड करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. राजकीय पक्षांनी युवकांना नेतृत्वाची संधी द्यावी. युवा नेत्यांनी समाजाच्या समस्यांची योग्य मांडणी करणे आणि त्यावर उपाय शोधणे आवश्यक आहे. नव्या पिढीचे नेतृत्व राजकारणात नैतिकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वाचे ठरू शकते.

सोशल मीडियाचा वापर करून जनतेला राजकीय घडामोडींची माहिती मिळवणे सोपे झाले आहे. योग्य माहिती मिळाल्यास लोक आपल्या निर्णयांची योग्य निवड करू शकतात. मात्र, चुकीची आणि अप्रामाणिक माहिती पसरवण्यावर देखील नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सोशल मीडियाचा वापर करून जनता आपले मत मांडू शकते. विविध मुद्द्यांवर चर्चा घडवून आणून समाजाच्या विचारांना प्रोत्साहन देता येते. यामुळे नेत्यांना जनतेच्या समस्यांची जाणीव होते आणि त्यावर उपाययोजना करण्यास ते प्रवृत्त होतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने सरकारी कामकाजात पारदर्शकता आणता येते. विविध सरकारी योजना, निधी वाटप आणि विकास प्रकल्पांची माहिती ऑनलाइन उपलब्ध करून दिल्यास जनतेला त्याचा फायदा होतो. यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल आणि जनता सरकारवर विश्वास ठेवेल. राजकारणातील नैतिकता आणि स्तर सुधारण्यासाठी शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नैतिक शिक्षणाचा समावेश करावा. विद्यार्थ्यांना सामाजिक उत्तरदायित्व, नैतिकता आणि मूल्ये यांचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. यामुळे भविष्याच्या नेत्यांमध्ये योग्य विचारसरणी निर्माण होईल. राजकीय प्रक्रियेची माहिती, संविधानाचे अध्ययन आणि नागरिकांच्या हक्कांची माहिती विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. यामुळे युवकांना राजकारणात सहभागी होण्याची प्रेरणा मिळेल आणि योग्य नेत्यांची निवड करता येईल. थोडक्यात राजकारणाचा खालावत चाललेला स्तर हा समाजाच्या प्रगतीसाठी गंभीर अडथळा आहे. नैतिकता, पारदर्शकता आणि जबाबदारी ही राजकारणातील महत्त्वाची तत्त्वे पाळल्यास समाजातील समस्यांचे निराकरण होऊ शकते. नव्या पिढीची सक्रीय भूमिका, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि शिक्षणाच्या माध्यमातून राजकीय सुधारणा साधता येऊ शकतात. प्रत्येक नागरिकाने आपल्या हक्कांची जाणीव ठेवून योग्य नेत्यांची निवड करणे आवश्यक आहे. यामुळे समाजात स्थैर्य, सलोखा आणि विकास साधता येईल आणि एक प्रगतिशील, न्याय्य आणि नैतिक समाजाची निर्मिती होईल.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक प्राध्यापक आहेत)**



बबन गुळवे
मो.९७३०९३९७३२

# वाईट जीवन जगण्यापेक्षा ते चांगलेच जगावे..!

आधुनिक केसरी

**जीवन जगण्याची कला,तऱ्हा व पध्दत वेगवेगळी असते.कोणी स्वतःचे जीवन मनमानी जगणे पसंत करतो. त्याच्या बिनधास्तपणे जीवन जगण्याचा इतरांना त्रास झाला तरीही तो आपली जीवनशैली बदलायला तयार नसतो.काहीजण आपले जीवन अगदी तोलून मापून जगतात.काहींच्या जीवनात साहस, धाडस आणि रंगत नसते. त्यामुळे हे जीवन नीरस आणि कंटाळवाणे वाटते.आणि काहीजण आदर्श जीवन जगतात.त्यांच्या आदर्श जीवन जगण्याचा इतरांना हेवा वाटतो.हे लक्षात घेतले असता असे जाणवते की आपण आपले जीवन योग्य पध्दतीने जगतोय की वाईट पध्दतीने?मग नेमके कोणत्या पध्दतीने जीवन जगावे हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो असे म्हणणारे लोक स्वतःचे जीवन जगणे चांगले मानतात. आणि इतरांच्या चुकांचा पाढा वाचतात.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी जीवन जगावे कसे हे स्पष्ट करताना ग्रामगितेत खालील ओव्यांचा संदर्भ दिला आहे -

**अहो!जीवनाची एक तरी कला!**
**असावी लागते मानवाला!**
**तरीच तो मानव शोभला!**
**नाहीतरि कल्ला जीवनाचा!!**

या ओवीतून तुकडोजी महाराजांनी जीवन जगण्यासाठी एक तरी चांगली कला अवगत असावी हे सांगताना ती चांगली कला माणसांत असलीच पाहिजे असे स्पष्टपणे विवेचन केले आहे. जीवन जगण्याच्या कलेमुळे माणूस शोभून दिसतो नाहीतर जीवनात सगळा अंधार पडतो, जीवनात गोंधळच गोंधळ निर्माण होतो.जीवनाचा फज्जा उडतो.हे सांगून झाल्यावर ते दुसऱ्या ओवीत निक्षून सांगतात-

**जीवनात यावा सरळपणा**
**साधा सात्विकतेचा बाणा**
**हृदय निर्मळतेचा निशाणा**
**कलावंताचा धर्म हा...**

ज्यांच्या जीवनात सरळपणा असतो ते सुखी व आनंदी जीवन जगतात. ज्यांच्या जीवनात वाकडेपणा असतो, ज्यांची जीवन वाट वळणावळणाची असते ती माणसे फार चालू व ढोंगी जीवन जगत असतात.अ शा व्यक्ती फक्त स्वतःला चांगले समजतात बाकीच्यांना कवडीचीही किंमत देत नाहीत.म्हणून ज्यांना जीवनात सरळपणा हवा असतो ते लोक साधे,सात्विक व निर्मळ हृदयाचे असतात.जे खरोखर एका कलेत निष्णात असतात ते नेहमी आनंदी असतात.कलेमुळे कलावंत व्यक्तीच्या अंगी नम्रता, शुध्दता, आपुलकी व स्नेहभाव वृद्धिंगत होत असतो.

समाजात असे काही वाईट, स्वार्थी व कपटी लोक वावरत असतात जे फक्त स्वतःचा विचार करतात.फक्त आपले व आपल्या कुटुंबाचे भले झाले पाहिजे अशी त्यांची धारणा असते. अशा वाईट विचारांची माणसे मनमानी जीवन जगत असतात.ते इतरांचे वाईट चिंतीतात.इतरांच्या वाट्याला आनंद व सुखाचे क्षण आले की यांच्या पोटात गोळा उठतो. शेजारच्या मुलाने एखाद्या परीक्षेत चांगले गुण मिळविले की वाईट विचारांच्या लोकांच्या कपाळावर आठ्या पडतात.

अहिंसेचे पुजारी तथागत गौतम बुद्धांनी नेहमीच सम्यक जीवन पध्दतीने जीवन जगण्याचा सल्ला दिला होता. संपूर्ण मानव



प्रजातीचे जीवन सुखी करायचे असेल तर प्रत्येकाने सम्यक जीवन पध्दतीचे अनुसरण करावे असे त्यांनी स्पष्ट केले होते.वासना, लोभ, मत्सर, हेवा, दुराचार व वाईट कर्म यांचा वेळीच त्याग केला तर माणसाला सुखी व आनंदी व्हायला वेळ लागणार नाही हे समजून घेतले पाहिजे.आपण मनमानी जीवन जगताना वाईट बोलणे,वाईट वागणे,वाईट विचार आणि कामचुकारपणा करु लागलो की आपली ओळख वाईट व्यक्ती म्हणूनच होते.ही वाईट ओळख व्यक्तीचे चारित्र्य व आचार विचाराने पक्की होते.म्हणून व्यक्तीने आपले जीवन कसेही न जगता ते चांगले जगावे.त्यासाठी स्वतः::वर काही बंधने लादून घेतलीच पाहिजेत.वाईट संगत, वाईट कर्म व व्यसनापासून चार हात लांब राहिले पाहिजे.चांगले जीवन जगण्यासाठी मनावर ब्रेक उत्तम ब्रेक हा मंत्र लक्षात ठेवलाच पाहिजे. चांगल्या माणसांचे जीवन इतरांसाठी आदर्श असते. चांगल्या लोकांनी नेहमी कर्तव्य,सुवर्तन, परोपकार, आपुलकी, स्नेहभाव व चांगुलपणा यांना जपलेले असते.म्हणून ते चांगलेच असतात. त्यांची ही ओळख कायमस्वरूपी ठळक बनते.त्यांच्या मृत्यू नंतरही त्यांची आठवण काढली जाते.म्हणून मनमानी जीवन जगण्यापेक्षा प्रत्येकाने मिळालेले जीवन चांगलेच जगावे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जल है तो कल है



डॉ. शरद दुधाट
9834132138

आधुनिक केसरी

**पाऊस-पाणी हा एक सामासिक शब्द आहे. दोन्ही शब्दाचे अर्थ जरी वेगळे असले तरी एकमेकांच्यामध्ये अनन्यसाधारण असा संबंध आहे. पाऊस ही निसर्गातील एक घटना आहे. पाऊस पडल्यानंतर ही सृष्टी फुलते. अनेक दिवसांपासून वाट पहात बसलेली ही सृष्टी, पशू-पक्षी, वेली, वृक्ष पावसामुळे आनंदी दिसते. पक्षी आपल्या आवाजाने पावसाचे स्वागत करतात. पृथ्वीला हिरवेगार रूप आणणारा हा पाऊस भौगोलिकदृष्ट्या विचार केला तर कोठे, किती पडणार याची जाण कोणालाच नसते. पृथ्वीला हिरवे लेणं परिधान करणारा हा पाऊस जेव्हा पृथ्वीवर कोसळतो तेव्हा त्याचे रूपांतर पाण्यामध्ये होते.**

सृष्टीला तसेच वृक्षवेली, पशू-पक्षी, प्राणी, मानव, शेती या सर्वांनाच पाण्याची नितांत गरज असते. म्हणूनच पाण्याला 'जीवन' असेही म्हणतात. जोपर्यंत हा पाऊस आपल्या लीला दाखवत नाही तोपर्यंत त्याची अनेकजण वाट पाहतात. सर्वांचेच डोळे आकाशाकडे, ढगाकडे लागलेले असते. पाऊस लांबणीवर पडला की ज्योतिषी, हवामान अभ्यासक त्याविषयी भाकित करतात. पाऊस केरळमध्ये आला! पाऊस कोकणामध्ये स्थिरावला! आता लवकरच महाराष्ट्रात त्याचे आगमन होईल. या चर्चा ऐकायला मिळतात. तर कृषिराजा आपल्या शेतीच्या मशागतीबाबत आणि पेरणीबाबत बोलत असतो.'थेंब थेंब तळे साचे' असे आपण म्हणतो. थेंबा थेंबातून तळे जर साचत असेल तर पाण्याचे महत्त्व कळते. तोंडाला पडणारी कोरड, कोमेजणारी वृक्षवेली, पक्षांची आर्तता, व्याकुळता, शेतात करपणारी पीकं पाण्याच्या अस्तित्वाची जाण काय असते याची जाणीव करून देतात. हिंदू समाजातील देवदेवतांमध्ये वरुण देवता, पुरातन हिब्रू देवता, बौद्ध समाजातील मंदिराच्या जमिनीवर पाणी शिंपडण्याचा विधी, महाराष्ट्रामध्ये महादेव पाण्यात कोंडण्याचा विधी, दक्षिण भारतातील मंडूक विधी इ. देवता आणि विधी पाण्याशी संबंधीत आहेत. यावरून पुरातन काळापासून पोथी, पुराणातून तर आजकाळच्या कवींच्या कवितांमधून पाण्याचा जो उल्लेख होतो, तो एक जीवन म्हणूनच. विविध प्रकारच्या भाषिक साहित्यामध्ये पाण्याचा उल्लेख वेगळया अर्थाने होतो. आदीमानवापासून तर आजच्या आधुनिक मानवांपर्यंत पाण्याचे महत्व सर्वांना कळलेले आहे; परंतु पाणी वाचविण्यासाठी कृती मात्र कोणाकडूनही होताना दिसत नाही. कोणीही पाण्याचा वापर काटकसरीने करत नाही. प्रतिकात्मकरूपाने पाण्याचा विचार साहित्यात येतोच शिवाय लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार यामधूनही पाण्याचा अर्थपूर्ण उल्लेख जाणवतो. पाऊस-पाणी हे केवळ सृष्टीचाच एक भाग नाही तर संपूर्ण मानवी जीवनाची उदरभरणच त्यावर अवलंबून आहे. पाऊस पडला तर शेती पिकते, अन्नधान्य निर्माण होत असल्याने माणूस सुखावतो; परंतु पाऊस जर पडला नाही तर हा मानव अगदी कासाविस होतो. म्हणजेच पाऊस आणि पाण्यामध्ये मानवी संस्कृतीचा नाश अवलंबून आहे. सृष्टीच्या चक्रामध्ये हस्तक्षेप करणारा एकमेव प्राणी कोण असेल तो माणूस आहे. आपल्या बुध्दीच्या आणि कृतीच्या जोरावर त्याने सृष्टीकडून अनेक प्रकारचे फायदे मिळविलेले आहे आणि अद्यापही मिळविण्यासाठी तो सतत पुढे असतो; परंतु या मानवाने सृष्टीला अनेकवेळा दुःख दिलेले आहे. हवा, पाणी, मृदा, ध्वनी इ. प्रदूषणाच्या माध्यमातून तो सृष्टीला सतत हानी पोहचवतो. त्यामुळे हवामानातील बदल जाणवतात, बर्फ वितळून समुद्राची पाण्याची पातळी वाढते. याशिवाय पाण्याचे, पावसाचे वितरणसारखे होत नाही. कोठे कमी, तर कोठे जास्त, कधी खूपच जास्त, तर कधी खूपच कमी पाऊस पडत असतो. त्यामुळे पाण्या-पावसाच्या या वितरणाला, अनिश्चितेला हा मानवच कारणीभूत आहे. पृथ्वीवर पाणी जरी अधिक असले तरी प्रत्यक्षात ७१ टक्यांमध्ये केवळ १ टक्का पाणीच फक्त पिण्यासाठी गोड आहे म्हणजे योग्य आहे. बाकी ७० टक्के पाणी हे खारे समुद्रातील पाणी आहे. त्याचा वापर पिण्यासाठी अथवा शेतीसाठी योग्य नाही. तरीही उपलब्ध पाण्याचा वापर मानव काळजीपूर्वक करत नाही. शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा कमी पाण्यात जास्त उत्पादन घेण्याचा विचार आणि प्रयोग करणे आवश्यक आहे. अद्यापही बहुतांशी शेतकरी परंपरागत पद्धतीने पाणी देतात. त्यामध्ये पाण्याचा मोठा अपव्यय होतो.

घरामध्ये पाणी वापरताना योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. अंघोळ, धुणे, भांडी यामध्ये योग्य प्रमाणात पाणी वापरणे आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये सर्वाधिक पाण्याचा अपव्यय होतो. जर मानवाने पाण्याचा योग्य वापर केला नाही तर पुढील पिढयांना मात्र पाण्यासाठी भटकंती करावी लागणार, हे क्षितिजाप्रमाणे जाणवत आहे. माजी कृषिमंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी आपल्या 'शेती आणि पाणी' या लेखामध्ये म्हटले आहे की, 'मानवाने जर पाण्याकडे दुर्लक्ष केले तर या पाण्यासाठी यादवी युद्धे होतील.' सध्या पाऊस पडताना जो आनंद आपण व्यक्त करतो, पुढे मात्र चिंताजनक चेहऱ्याने पाण्यासाठी गावोगाव भटकंती करावी लागेल. हिरव्या सृष्टीचे सौंदर्य, धो-धो कोसळणारे धबधबे, शेतातून कालव्यातून वाहणारे पाणी हे दृष्य दुर्लभ होणार. मराठी गीतातील 'माळयाच्या मळयामधी पाटाचं पाणी वाहते', 'संथ वाहते कृष्णामाई' हया गीतांचे सूर केवळ नाममात्र राहतील. लहानांना खेळण्यासाठी सूरपारंब्यांचे वड, फळा-फुलांचे वृक्ष काही दिसणार नाही. मग संत तुकारामांच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी' हया अभंगाचे महत्त्व काय असणार. हिरवी हिरवी गार सजलेली ही सृष्टी आणि हिरवे हिरवे डोंगर व रांगा उघडया बोडख्या पडणार आहेत. स्पर्धात्मक युगात, धक्काधकीच्या जीवनात मानवाला आपला कासाविस होणाऱ्या जीवाला विसावा कसा मिळणार? 'पेर्ते व्हा' चा संदेश देणारा पावशा गायब होणार. 'काळया मातीत चालणारं तिफनं' आणि ती बैलजोडी, तो भूमिपुत्रही दिसणार नाही. माणसाला पाण्यासाठी वाळवंटातल्या ओॲसिससारखा शोध घेत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करावी लागेल. वृक्षराजी, शेतीबरोबरच मानवी जीवन देखील पाण्याअभावी होरपळून जाईल. महाराष्ट्रामध्ये लोकजीवन पूर्णतः शेतीवर आधारीत आहे. त्यामुळे शेतीसाठी पाण्याची आवश्यकता असते. पाऊस हे पाण्याच्या निर्मितीचे एकमेव साधन आहे. या पाण्याचा वापर पिण्यासाठी, शेतीसाठी आणि औद्योगिकरणामध्ये केला जातो. त्यामुळे पाण्याची आवश्यकता लक्षात घेता वर्षभर पडणाऱ्या पावसाचे प्रमाण महाराष्ट्राभर असमान असल्यामुळे पडणाऱ्या पावसाचे पाण्याचे योग्य नियोजन आणि उपलब्ध पाण्याचा साठा करून ठेवणे काळाची गरज आहे. पाण्याचा वापर काटकसरीने न झाल्यास पुढील पिढयांना पाण्यासाठी अनेक किलोमीटरपर्यंत भटकंती करावी लागणार आहे. कृषिमंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी आपल्या 'शेती आणि पाणी' या लेखामध्ये भविष्यात पाण्यासाठी यादवी युद्धे निर्माण होतील असे भाकित केले होते. हे भाकित कदाचित खरे होते की काय असे वाटू लागले आहे. पृथ्वीवर जेवढे पाणी उपलब्ध आहे. त्यापैकी ९७ टक्के पाणी समुद्राच्या स्वरूपात आहे. त्या पाण्याचा शेतीसाठी व मानवाला उपयोग नाही. इस्त्राईलसारख्या देशात समुद्राचे गोड पाणी करून ते शेतीला आणि उद्योग व व्यवसायांना द्यायला आपल्या देशाला परवडेल का? २ टक्के पाणी हे बर्फाच्या स्वरूपात आहे. तर केवळ १ टक्का पाणी द्रवरूपात आहे म्हणून पाण्याचा वापर आणि नियोजन ही काळाची गरज आहे. महाराष्ट्राची भौगोलिक प्राकृतिक तशी वैभवशाली आहे. महाराष्ट्रातील नद्यांनी इथला सांस्कृतिक वसा जपलेला आहे. संस्कृतीचा विकास करण्यास आणि इथली भूमी सुजलाम सुफलाम करण्यास नद्यांचा मोठा हातभार आहे. वायव्य-आग्नेय, उत्तर-दक्षिण, खानदेशात पूर्व-पश्चिम, कोकणात पूर्व-पश्चिम अशा नद्या वाहतात. महाराष्ट्रातील सर्वच नद्यांनी सर्वंकश विकास साधलेला आहे. महाराष्ट्रातील दक्षिण गंगा समजल्या जाणाऱ्या गोदावरी या सर्वात मोठया नदीने आपला भोवतालचा बराचसा भाग कृषी संपन्न केलेला आहे.




त्यापाठोपाठ कृष्णा, भिमा, वेण्णा, कोयना, वर्धा, तापी, प्रवरा, मुळा, मुठा आदी नद्यांनी आपला भोवतालच्या भागात विकासाला मोठा हातभार लावलेला आहे. या नद्यांवरील धरणांनी महाराष्ट्राला 'सुजलाम सुफलाम' केलेले आहे. थोडक्यात या नद्या आणि ही धरणे महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीचा एक घटक मानल्या जातात. या वैभवसंपन्न महाराष्ट्राला पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या मदतीने राज्यात अनेक छोटे मोठे लहान पाटबंधारे प्रकल्प उभारलेले आहेत. तसेच महाराष्ट्र 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरण' या संस्थेच्यामार्फत शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे काम गेल्या २५ वर्षापासून होत आहे. याशिवाय ग्रामपंचायत, नगरपरिषदा आणि महानगरपलिकांचीही स्वतंत्र पाणी पुरवठयाची योजना असते. महाराष्ट्रात अधिकाधिक सिंचनव्यवस्था ७१ लाख हेक्टर आहे; परंतु तरीही महाराष्ट्रामध्ये पाण्याची सतत अडचण आणि समस्या भासताना दिसते. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण असमान असल्याकारणे काही भागात पाण्याचा वापर काटकरीने करणे आवश्यक आहे. पडणाऱ्या पावसाचे पाणी वाहून बऱ्याचअंशी जाते असे चित्र महाराष्ट्रात दिसते. पाण्याची साठवण करण्याची सुविधा अधिक खर्चीक असल्यामुळे महाराष्ट्रात जनतेला ती पडवणारी नाही. त्यामुळे सार्वजनिक आणि शासनाच्या पातळीवर लहान मोठे प्रकल्पांची उभारणी करून वाहून जाणाऱ्या पाण्याची साठवण करणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्रात केवळ काही छोट्या आणि मोठया धरणाच्या क्षेत्रातच पाण्याची साठवण होते बाकी भागात पडणारे पाणी नदयांच्या माध्यमातून वाहून जाते त्यामुळे पिण्याची पाण्याची सततची समस्या भासताना दिसते. शेवटी त्यावर पर्याय म्हणून काही भागात पाण्याचे टॅंकर सुरू करावे लागतात. यात मोठया शासनाला मोठया प्रमाणात पैसा खर्च करावा लागतो. याशिवाय महाराष्ट्रात जलसिंचन सुविधांमध्येच बऱ्याच प्रमाणात असमान वितरण आहे. महाराष्ट्राच्या पश्चिम, दक्षिण आणि मध्य भागात पाण्याची उपलब्धता अधिक असल्यामुळे शेती चांगली होते; परंतु मराठवाडा पावसाचे प्रमाण आणि साठवण आणि पाण्याचे स्त्रोतही कमी असल्यामुळे नेहमीच पाण्याची टंचाई असते. तर विदर्भात पावसाचे प्रमाण अधिक असूनही साठवण व पाण्याचे वापराचे नियोजन नसल्यामुळे बरेचसे पावसाचे पाणी नदी आणि पुढे समुद्रला जावून मिळते. विहिर आणि कुंपननलिका हे पाणी स्त्रोताचे एक प्रमुख साधने आहे. भुजल व विकास यंत्रणेच्या १९९५ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ११ लाख ४३ हजार विहिरी होत्या बऱ्याच मोठया प्रमाणात विहिर या सिंचन व्यवस्थेवर महाराष्ट्रातील पश्चिम, दक्षिण आणि मध्य महाराष्ट्रातील शेती अवलंबून आहे; परंतु महाराष्ट्रात विजेची मोठी टंचाई ग्रामीण भागात असल्यामुळे पाणी असून सुद्धा पाणी शेती आणि पिण्यासाठी वापरता येत नाही. ही दयनीय स्थिती उज्ज्वल महाराष्ट्राची आहे. तलाव सिंचन व्यवस्थेमुळे भूजल पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते याशिवाय कालव्याव्दारे शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा वेळप्रसंगी केला जातो. सध्या महाराष्ट्रात तलावांची संख्या १४०० इतकी असून १८०० पाझर तलावांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच भविष्यात ३००० तलावांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या योजनेनुसार सर्वच राज्यांमध्ये नद्या जोड प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही प्रकल्प महाराष्ट्रात कार्यरत होणार आहेत. त्यामुळे या योजनेचा फायदा अनेक जिल्हयातील शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे. पश्चिम भागात शेती आणि उद्योगांचा कायापलाट करणारा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून कोयना योजनेकडे बघितले जाते. या जलाशयामुळे सातारा जिल्हयात ६५ हजार पेक्षा अधिक क्षेत्र ओलिताखाली आलेली आहे. कृष्णेची उपनदी असलेल्या भिमा नदीवर पुणे आणि सोलापूर जिल्हयात अनेक धरणे उभारली आहेत. उजणी धरणामुळे सोलापूर जिल्हयाला मोठा फायदा झालेला असून १ लाख ७३ हजार क्षेत्र पाण्याखाली आलेले आहे. जायकवाडी हे महाराष्ट्रातील धरणांपैकी एक मोठे धरण आहे. या धरणाचा फायदा मराठवाडा आणि अहमदनगर जिल्हयातील ३३ लाख हेक्टर क्षेत्राला झालेला आहे. अहमदनगर जिल्हयात मुळा नदीवरील मुळाधरण व प्रवरा नदीवरील भंडारदरा धरणाने जिल्हयातील मोठा भाग ओलिताखाली आलेला आहे. साखर कारखान्यांचा विकास याच क्षेत्रामध्ये अधिक झालेला दिसतो. आज सर्वाधिक साखर कारखाने हे अहमदनगर जिल्हयात आहेत. याशिवाय शहरांची आणि औद्योगिकरणाची वाढती संख्या लक्षात घेता उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. भविष्यामध्ये मोठया संख्येने लघुपाटबंधारे योजना अमंलात आणणे गरजेचे आहे. महात्मा गांधीजी नेहमी म्हणत की, लोकांना स्वच्छ पाणी मिळणे हा त्यांचा प्रथम हक्क आहे आणि शासनाने त्याची जबाबदारी स्विकारून लोकांची प्राथमिक गरज पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु महाराष्ट्रात अद्यापही ९० टक्के भागात लोकांना शुध्द पाणी पिण्यास मिळत नाही. महाराष्ट्रातील १० कोटी ११ लाख लोकसंख्येला पिण्याचे शुध्द, स्वच्छ पाणी मिळणे ही एक समस्या झालेली आहे. ऐवढेच नाहीतर पाण्यापासून होणारे आजाराचे प्रमाणही जास्त असून मोठया प्रमाणात मृत्यु हे अशुद्ध पाण्याच्या सेवनाने होतात. भाजीपाला, अन्नधान्य आणि जनावरांना दिले जाणारे पाणी तसेच चारा हा अशुद्ध पाण्यातच घेतला जातो. त्यामुळे अशुद्ध पाण्याचा प्रभाव सर्वांवरच असर करतो. आजही नदी काठच्या गावांना नदीतील अशुद्ध पाणी प्यावे लागते, तेव्हा शुध्द पाण्याच्या पर्ततेसाठी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा एक एक थेंब थेंब वाचविण्याची गरज आहे. महाराष्ट्र प्राधिकरण योजनेने पिण्याचा स्वच्छ पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी उचलून २५ वर्षांच्या कालावधीत ६७ लोकांना पिण्याचे पाणी देण्याचे काम विविध योजनाव्दारे पूर्ण केलेले आहे. तसेच टॅंकरमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी सर्वानीच पाऊले उचलणे आवश्यक आहे. पाणी वाचविणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे तसेच त्याचे योग्य नियोजन करणे ही प्रत्येक नागरिकाची गरज आहे. पाऊस हा निसर्ग निर्मित आहे, त्याचे नियत्रंण माणसाच्या हाती नाही. त्याने कृत्रिम पाऊस पाडण्याचे कितीही प्रयोग केले तरी निसर्गतः पडणाऱ्या पावसाची किमया निराळीच. पाऊस हा पाण्याचा एक स्त्रोत आहे. त्यामुळे पावसापासून निर्माण होणाऱ्या पाण्याचे नियोजन, योग्य वापर, जतन, संवर्धन, उपयोजन हया सर्वच गोष्टी माणसाच्या हातात आहे. आदिम काळापासून, पुरातून पाण्याच्या संरक्षणाचे दाखले आढळून येतात त्याप्रमाणे सध्याच्या काळातही काही सामाजिक संस्था, शासन पाणी वाचविण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पश्चिम बंगालमध्ये पावसाचे पडणारे पाणी वर्षानवर्षे साठा करून ठेवतात आणि गरजेनुरूप त्याचा वापर करतात. पंढरपूर सोलापूर रस्त्यालगत असलेल्या पावसाच्या पाण्यावर आधारीत शेतीत वर्षभर पिके घेण्याची आणि त्या भागातील गावांची अर्थव्यवस्था बदलण्याचे किमया बापू कांचन आणि त्यांच्या सुपुत्रांनी केली आहे. 'पाणी आडवा-पाणी जिरवा' असे काही उपक्रमही काही सहकारी संस्था व साखर कारखान्यांनी हाती घेवून पाणी वाचविण्यासाठी प्रयोग यशस्वी केलेला आहे. हिवरे बाजारचे पोपटराव पवार, विलास सांळुखे या व्यक्तींनी प्रत्यक्ष कृतीतून पाणी अडविण्याचे, पाणी जिरविण्याचे प्रयोग केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये चंद्रपूर जिल्हयात आनंदवन, सोमनाथ, मुळगव्हाण या ठिकाणी डॉ. विकास आमटे यांच्या संकल्पनेतून जलसंधारणाचे नवीन नवीन प्रयोग करून जलसंधारणाचे सर्वात मोठे काम हाती घेण्यात आलेले आहे. मुळगव्हाण येथील आदिवासी विकास प्रकल्प हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी डॉ. विकास आमटे यांचा एक यशस्वी प्रयोग ठरला आहे. पाण्यावर होणारा शासनाचा खर्च, पाण्यावरून होणारी तंटे यादवी युद्धाकडे आकर्षित करणारी असतील हे भाकित खरे होण्याच्या मार्गावर आहे. जल जीवन मिशन (JJM), भारत सरकारचा प्रमुख कार्यक्रम, १५ ऑगस्ट २०१९ रोजी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू करण्यात आला. अलिकडच्या काही विचारवंताकडून आणि तज्ज्ञांकडून जलजाणिवेचा विचार होवू लागला आहे. विविध चर्चासत्रे, परिषदा यामधून हा विचार पुढे येवू लागला आहे. यासाठी सर्वात महत्वाचे म्हणजे माणसाची पाणी वाचविण्याची मानसिकता निर्माण होणे आवश्यक आहे. कारण जीवन म्हणजे पाणी, आज जाईल पाणी वाया तर उद्या तहान जीव घेईल ! मग पाणी वाचावयालाच हवे ! पाणी देते जीवनदान, पाणी वाचवणे हेच श्रेष्ठ काम. जल है तो कल है !

# समाजव्यवस्था हादरून टाकणारी वास्तवदर्शी ग्रामीण कादंबरी: गोंडर

आधुनिक केसरी

**अशोक कुबडे लिखित 'गोंडर' एक वास्तवदर्शी ग्रामीण कादंबरी. जी हादरून टाकणाऱ्या समाज व्यवस्थेचे वर्णन करते. अशी कादंबरी अलिकडेच वाचनात आली. कादंबरीची सुरुवातच दमदार अशा प्रकाशन सोहळ्याने झाली आणि लोकप्रियतेचा प्रचंड प्रवास तुफान वेगाने कादंबरीने अनुभवला. अनेक पुरस्कार प्राप्त अशी कादंबरी माझ्या हातात जरा उशिराच मिळाली. पण लवकरात लवकर वाचून मी पूर्ण केली आणि कादंबरीला अनेक पुरस्कार का प्राप्त झाले याचे गमक मला कळले. अतिशय सुंदर पण साधी सोपी भाषा,ओघवतेपणा, लयबद्धता,भाषेचा सहजपणा दाखवणारा चढ-उतार, वाचत असताना या प्रत्येक गोष्टीची जाणीव मनाला होऊ लागली.**




प्रत्येक प्रसंग वाचताना डोळ्या समोर प्रत्यक्ष घडत आहे असा भास होत होता. जातीव्यवस्थेचा समाजावर असलेला प्रचंड प्रभाव, बारा बलुतेदार पद्धती. न्हावी/वारिक हा त्यामधील एक घटक. त्याचे नेमके वर्णन कादंबरीत सहज सुंदररित्या मांडले गेले आहे. यशवंत हा या कादंबरीचा नायक. शिक्षणाची आवड असूनही स्वाभिमानामुळे मध्येच शाळा सोडतो, पण शिक्षणाचे महत्त्व कळत असल्याने पुन्हा शाळेत जावू लागतो.

लेखक अशोक कुबडे यांनी वडिलांकडून फुले, शाहू,आंबेडकर यांच्याविचारांची झालेली पेरणी यामुळे लेखक प्रेरित झाले आणि परिवर्तनवादी विचारांनी झपाटून गेले.अन्याय होत असताना सुद्धा त्या विरोधात सुधारणा करणे. त्याविषयीची तळमळ,त्यांच्या व्यथा या कादंबरीतून सहजपणे लक्षात येतात आणि गोंडर हे नाव कादंबरीला सार्थ ठरते. कादंबरीतील प्रत्येक पात्र वामन, शेवंता, यशवंत, उमा, रंगा, सर्वांचे हुबेहूब वर्णन लेखकाने सहज चितारले आहे. समाजाची चित्तरकथा मांडण्यासाठी मी समाजाचं प्रतिनिधित्व करत आहे हे पुरोगामी विचार आणि या विचारातून मानवी कल्याणाची ध्येयप्राप्ती करता येते हे ठसवण्याचा प्रयत्न लेखक अशोक कुबडे यांनी केला आहे. सरांना पुढील लेखनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा! मला इतकी सुंदर कादंबरी वाचावयास मिळाली याबद्दल खूप खूप धन्यवाद!

अस्मिता समजिसकर
अलिबाग / रायगड

# घरोघरी अवघे झाले ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील तमाम मराठी वाचकांना विनम्रपणे आवाहन करतो की; कृपया इथल्या वारकरी संतांचे जीवन, विचार आणि वाङ्मय लक्षपुर्वक वाचा. त्यांच्या लेखणीतून संतांचे चरित्र झिरपले आहे. संत समजून घ्यायचे असतील तर सर्वप्रथम त्यांचे वाङ्मय वाचावे लागेल. त्यानंतर त्यांचे खरे खुरे चित्र-चरित्र आपल्यासमोर आणि समाजासमोर दृगोचर होईल. संतांची प्रत्येक कलाकृती, निर्मिती, अभंग, ओवी हा त्यांच्या सर्वोच्च विचारांचा अविष्कार असतो. तो समजून घेतांना वाचकांना, चिंतकांना त्यांच्या पातळीवर जावे लागेल. असे झाल्यास त्या कलाकृतीचा काही प्रमाणात अन्वयार्थ लागू शकतो. त्यांच्या लेखनाचे थोडक्यात आकलन होऊ शकते.**

त्यासाठी संतांच्या जीवनात काळ आणि समाजाने केलेले कठोर आघात आपण समजून घेतले पाहिजेत. आज त्यांच्या तोडीचे लेखन समाजासमोर येतांना लेखकांना काय काय सहन करावे लागेल( ?) याचा अंदाज न केलेला बरा! आज विविध माध्यमांचा झालेला उदय आणि त्यातून प्रसार-प्रचारित होणारे लेखन याकडेही डोळे सताड उघडे ठेऊन पाहिले पाहिजे. नवीन लेखकांना लिहिण्यासाठी "मागील आधार बहुतांचा" या तुकोक्तीप्रमाणे आपण भूतकाळातील लेखनाचा अर्क आपल्या जीवनात आणि लेखनात उतरवायला हवा. असे झाल्यास आपल्याही लेखनाला परीसस्पर्श झाल्याशिवाय राहणार नाही. तुकोबांचा गाथा ही मराठीतील सर्वोत्तम कलाकृती असून त्यातून वेळोवेळी तुकोबा आपल्याला दर्शन देत असतात. अभंगातून तुकोबांचे जीवन आपल्यासमोर येत असते. तुकोबांचे अभंग हे समाजाचे सर्वांगीण, सार्वकालिक, सचेत चिंतन असून त्याद्वारे तुकोबा आपल्याला जागे करत असतात. आतापर्यंत अनेक सृजनशील मराठी लेखकांनी तुकोबांना शब्दांकित केले असून पुढेही तुकोबा अनेकांच्या शब्दात सतत उतरत राहतील. तुकोबांचे अभंग हिंदी, इंग्रजी आणि इतर भाषेतही अनुवादित झाले असून तुकोबा केंव्हाच सातासमुद्रापार पोहोचले आहेत. अनेक भाषेतील लेखकांचे तुकोबा पथदर्शी आहेत. अशी बहरलेली मराठी प्रतिभा जगभर पसरते, याचे कारण म्हणजे त्यातील विश्वऐक्याची संकल्पना आणि व्यक्त होणारा मानवी मनाचा फुललेला पिसारा!

तुकोबांचा गाथा पुन्हा पुन्हा वाचतांना क्रमाने येणाऱ्या आणि मनाला वेगळेपण जाणवून देणाऱ्या अभंगावर चिंतन करतांना वेगवेगळ्या रुपात आणि भावात तुकोबा सातत्याने भेटत असतात. तसे भेटतांना तुकोबा अनेकवेळा आपल्याला चपराक देऊन वर्तमानात जगायला आणि आपल्यातील होत असलेल्या भावनिक, सामाजिक चुकांना दुरुस्त करतांना मार्गदर्शक मित्र बनतात. तुकोबांच्या अभंगांवर लिहिणे सुरु केल्यापासून माझ्यात अनेक बदल झाले आहेत किंबहुना तुकोबांच्या संगतीने ते आपसूकच झाले आहेत असे म्हणणे वावगे ठरू नये. या काळात माझ्यावर काही कठीण प्रसंग आले, तेंव्हा तुकोबा मोठ्या ताकदीने सोबत उभे राहतांना मला सावध करत गेले. तुकोबांच्या अभंगांवर आणि वारकरी लेखनावर लेखन-चिंतन मांडतांना हे संत आणि लेखक म्हणून खऱ्या अर्थाने समजत आहेत. यामुळे माझे चिंतन-मनन-लेखन वाढले आणि व्याख्याने, कीर्तने आणि प्रवचने याचे प्रमाण आपोआपच घटले. संत वाङ्मयावर चिंतन



तुकारामनीती
भाग -91

मांडतांना बडबड करण्यापेक्षा लिहिणे कधीही श्रेष्ठच याचे भान आले. आज सगळीकडे कीर्तन-प्रवचन आदींचा बाजार भरलेला असतांना अनेकांच्या कीर्तनात खुद्द कीर्तनकार महाराजांकडून वारकरी संप्रदायाची पायमल्ली होताना दिसते आहे. नामदेव, जनाबाई, ज्ञानोबा, एकोबा किंवा तुकोबा या महान लेखक-कवी कीर्तनकार अध्वर्यू मंडळींनी आपले कोणतेही-कुठेही प्रस्थ थाटले नाही. असे असतांना आज वारकरी सांप्रदाय आणि त्यातील प्रसार-प्रचारक हा संप्रदाय कुठे घेऊन जात आहेत( ?) यावर सर्वच मंडळींनी चिंतन-मंथन करण्याची महत्वपूर्ण वेळ येऊन ठेपली आहे. संत, महाराज मंडळींनी कीर्तन, प्रवचनाद्वारे आनंद, शांती, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, एकात्मता, समानता, सहृदयता, सामाजिक सलोखा, ऐक्य इत्यादी महत्वपूर्ण गोष्टींचे प्रतिपादन करून समाजाची एकसंध मोट बांधण्याचे काम करत राहणे अपेक्षित आहे. दुभंगलेली मने एकत्र यावीत, भेदाभेद समूळ नष्ट होऊन सामाजिक सौहार्द नांदण्यासाठी आणि जीवन क्षणभंगुर आहे याची जाण आणि भान येण्यासाठी समाजाला भजन-कीर्तन-प्रवचन इत्यादींची गरज असते. असे होण्याऐवजी जर सामाजिक सलोखा बिघडत असेल तर आपण कुठेतरी मूळ विचारांसी फारकत तर घेत नाहीत ना? असा सहज प्रश्न मनाला सतावत असतो.

**यात पुढच्या येणाऱ्या घरोघरी अवघे झाले ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥१॥ नीरे कोणापाशी होय एक रज । तरि द्या रे मज दुर्बळासी ॥२॥ आशा तृष्णा माया कालवूनि दोन्ही । दंभ तो दुरोनि दिसतसे ॥३॥ काम क्रोध लोभ सिणवी बहुत । मेळवूनि आत काळकूट ॥४॥ निंदा अहंकार द्वेष बहू फार । माजिवरी धूर सारियेला ॥५॥ तुका म्हणे तेथे काही हाता नये । आयुष्य मोले जाये वायावीण ॥६॥ (१२८८)**

अशा अभंगांनी तुकोबा आपल्या डोळ्यात अंजन घालतांना दिसतात. हा अभंग वाचला आणि त्यावर सूक्ष्म चिंतन केले असता तुकोबारायकाळ आणि वर्तमानकाळ परिस्थिती सारखीच झाली आहे असे मला वाटते. तुकोबाराय तत्कालीन समाज मंथन करतांना धार्मिक क्षेत्रात किती अवडंबर माजले आहे( ?) याचे चित्रण करतात. त्या काळात घरोघर ब्रह्मज्ञान सांगणारे लोक असायचे, परंतु त्याला कृतीची आणि अनुभवाची शून्य जोड होती. ब्रह्मज्ञानी माणसांची अवस्था म्हणजे हातात अनमोल रत्न आहे, परंतु त्याची पारख नाही अशी झाली होती आणि आज आहे सुद्धा. आपल्याला ब्रह्मज्ञान प्राप्त आहे, परंतु त्याचा विनियोग काय? ते आपल्यासह समाजाला कितपत फायद्याचे आहे? या प्रश्नाचे उत्तर कुणाकडेच नाही. यजुर्वेदातील बृहदारण्यक उपनिषदातील "अहं ब्रह्मास्मि" हे महावाक्य सापडते. ब्रह्म म्हणजे परम तत्व. अंतिम सत्य आणि आपण त्या परम तत्वाचा अंश आहोत. हा याचा अर्थ. परंतु आपण ब्रह्म होणे म्हणजे काय? याचा शोध आपण घेतला पाहिजे. जर ब्रह्म अंतिम सत्य असेल आणि जर प्रतिपादन करणारे "मी ब्रह्म आहे" अशी उद्‌घोषणा करत असतील तर त्यांना कोणत्याच गोष्टींचे भेदात्मक तारतम्य असता कामा नये. कुणी काहीही म्हणो, कसेही वर्तन करो, खायला मिळो अथवा न मिळो. जे भेटेल, लोक जे देतील ते खाऊन जगावे. जगाला सत्य, अहिंसा, अभेद इत्यादींचे महत्व सांगून कोणत्याही प्रकारचा संग्रह अथवा कुठलेच धन संचय न करणारे लोकच खरे ब्रह्म असू शकतात. अशा ब्रह्म झालेल्या लोकांना सर्व जग आपले नातवाईक वाटावेत! झाडे, वेली, प्राणी आणि माणूस यात भेद असता कामा नये. हेच खरे ब्रह्म तत्व. सिद्धार्थ गौतमांना याची जाण झाली आणि त्यांनी उभ्या राजमहालातून जीवनाचा खरा अर्थ शोधण्यासाठी जंगलात प्रस्थान केले. तुकोबांना सुद्धा अनेकवेळा भंडारा, भामनाथ डोंगरांचे सानिध्य घ्यावे लागले. कपारीत बसून आत्मचिंतन करावे लागले. यातूनच त्यांना खऱ्या ब्रह्माची जाण झाली असावी. त्यामुळे ज्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त झाले आहे अशांना, ज्यांच्यापाशी निके, नीरे ब्रह्मज्ञान असेल तर द्यावे अशी तुकोबाराय मागणी करताहेत. अजून आपल्यातील आशा, तृष्णा, माया, दंभ, अहंकार आदि विकार नाहीसे झालेले नसतांना तिथे ब्रह्म कसे वास्तव्यास येईल? त्याच्या जोडीला काम, क्रोध, लोभ इत्यादी ब्रह्माचे महाशत्रू असतांना तिथे ब्रह्म असेलच कसे? याचा तुकोबांना पुरता अनुभव आला होता. निंदा, अहंकार, द्वेष आदि काळेकुट शत्रू सोबत असतांना तिथे ब्रह्म कसे असू शकते? असे प्रश्न तुकोबांना तेंव्हा पडले आणि त्यांनी आपल्या सडेतोड लेखणीतून ते समाजासमोर मांडले. अरे बाबांनो, ब्रह्म वगैरे मोठ्या दूरच्या गोष्टी आहेत. तुम्ही त्याच्या पाठीमागे पळू नका, हाताला काहीच लागणार नाही. ब्रह्म केवळ मृगजळ असून आपले दैनंदिन जीवन आनंदी, निरपेक्ष, प्रेमळ, एकोप्याने जगणे हेच खरे ब्रह्म आहे असे शेवटी तुकोबा या अभंगात प्रतिपादन करतांना सर्वांचे डोळे उघडण्याचे काम करतात. याचा परिणाम असा झाला की; आपले आणि परके म्हणजे स्वतःला ब्रह्मज्ञानी समजणारे सारेच तुकोबांचे शत्रू झाले. त्यांना असे खतरनाक, सत्याच्या सहाय्याने अवडंबराची लक्तरे वेशीवर टांगणारे तुकोबाराय शत्रू वाटणे साहजिक होते, परिणामी तुकोबांना भक्तीच्या क्षेत्रात असूनसुद्धा लोकांकडून मार खावा लागला. वारकरी सांप्रदायिक असो की कुणीही, आपण आपले दैनंदिन जीवन आनंदाने व्यतीत करणे हेच खरे ब्रह्म आहे! कुणाशी वैर नको. कुणाचे वाईट करायचे नाही, वाईट चिंतन करायचे नाही. आपण आणि आपला भोवताल नित्य नित्य आनंदी, प्रसन्न ठेवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करत रहावे. जात, धर्म, पंथ, लिंग इत्यादी भेद बाजूला ठेवून आपल्या सर्वांच्या डोक्यावर एकेच निळे आभाळ, सर्वांच्या शरीरात लाल रक्त संचारते आहे, सर्वजण एकच प्राणवायू घेत आहोत हा विचार करावा. सर्वांना हिरव्या वनस्पतीपासून अन्न खायला मिळते आहे. सर्वांना धरित्री आपल्यावर धारण करत आहे. इथे भेद नाही. तेंव्हा असे वैश्विक विचार सोबत घेऊन महान विचारवंत, संत विचार सतत सोबत असू द्यावेत! असे होणे म्हणजे खऱ्या अर्थाने तुकोबांची संगती आज समाजासोबत आहे याची जाण होणे होय! जय तुकोबाराय!

# निखिल वागळेंना उकळ्या का फुटल्या..?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या पत्रकारितेत निखित वागळे जेष्ठ पत्रकार म्हणुन ओळखले जातात. अर्थात अनेक दैनिकात संपादकीय पदावर त्यांनी काम केलं. अलीकडे डिजिटल जमान्यात स्वतःचं व्हिडिओ चॅनेल देखील चालवताना दिसतात. एक गोष्ट खरी आहे की विक्षिप्त स्वभावाची माणसं एका ठिकाणी स्थिर राहु शकत नाहीत. कारण वैचारिक धारणाच स्वस्वभावी लव्हाळ्यासारखी असते. अनेक घटनेत त्यांनी केलेला संघर्ष लोकांनी डोळ्यांनी पाहिला.**

कदाचित परखड लिखाण करणारा पत्रकार असं देखील म्हणता येईल. खरं तर स्वतःला लेखक, पत्रकार म्हणुन घ्यायचं आणि कुणा एखाद्या पक्षाची सुपारी घेत वकीली करायची हे मुळातच पत्रकारितेसाठी दुर्दैव म्हणावे लागेल. पण वागळे सारखी माणसं आयुष्यात सतत भाटगिरीच्या स्वभावाने गाजली. काल त्यांचा व्हिडिओ दृष्टीक्षेपात पाहिल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्रकार परिषदेत मला मोकळं करा एवढं बोलुन गेल्यानंतर वागळेंना उकळ्या फुटल्या. का फुटल्या? कुणास ठावुक? पण एका लढणाऱ्या नेत्याला त्यांनी रडणारी उपाधी लावत केलेले भाष्य सुपारीबाज विचारवंतांचं अवलक्षण म्हणावे लागेल. मागच्या पस्तीस वर्षापासुन पत्रकारिता क्षेत्रात आम्ही देखील काम करतो. एक गोष्ट खरी आहे की आम्ही विशिष्ट पक्षाच्या विचारसरणीने लेखणी चालवतो. कदाचित कार्यकर्ता म्हणुन देखील काम करतो. संपादक असो किंवा पत्रकार ज्याच्याकडे सामान्य माणुस कुणा एका पक्षाचा कार्यकर्ता म्हणुन पहात नाही. खऱ्या अर्थाने सामाजिक मार्गदर्शक म्हणुन समाज त्यांच्याकडे पहातो. महाराष्ट्राच्या पत्रकारिता क्षेत्रात निखिल वागळे यांचे नाव नेहमीच वादात आणि गाजलेले आहे. संपादक म्हणुन दैनिकात काम करताना वेगवेगळ्या संघर्षाला त्यांना सामोरे जावे लागले. कदाचित त्यांच्या अंगी असलेला अवलक्षण गुण म्हणुन वास्तविक पहाता एखाद्या पक्षाची किंवा पक्षीय विचाराची वकीली जर करायची असेल तर त्यापेक्षा संजय राऊतांच्या भुमिकेत काम केलेला पत्रकार लोक समजुन घेवु शकतील. कारण राऊत दैनिकाचे संपादक, पक्षाचे प्रवक्ते एव्हाना खासदारसुद्धा आहेत. पत्रकारिता करताना हुजरेगिरी जर केली तर आपण निश्चित खासदार होवु शकतो असं स्वप्न देखील वागळे सारख्यांना अनेक वर्षापासुन मनी पडलं असावं. कारण या देशात आणि राज्यात अनेक पत्रकारांचे खासदार झालेले आहेत. पण आम्ही कुठल्या पक्षाचे नाही, कुठल्या विचाराचे नाही, कुणाचे बांधील नाहीत असं सांगायचं आणि प्रत्यक्षात मात्र एखाद्या राजकिय आघाडीची वकिली करायची ही दुप्पटी भुमिका वागळे सारख्यांना जमु जाणं. मागच्या पाच-सात वर्षापासुन तसं पहाता हे नाव आडगळीला पडलेले तो भाग वेगळा. पण डिजिटल जमान्यात पत्रकारिता क्षेत्रात तरूणाईचा



शिरकाव झाल्यानंतर वयाच्या उतरंडीला लागलेल्या वागळेंनाही चळ येणार नाही कशावरून? स्वतःचं युट्युब चॅनल काढत त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली ज्ञानाचे दिवे पाजळायला सुरूवात केली. तसं पहाता काही महिन्यापुर्वी पुण्यात व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांना संघर्ष करावा लागला. पण विश्वांभर चौधरी, ॲड.असीम शिरोदे यांच्या लक्षात आल्यानंतर पुण्याच्या घटनेपासुन पुन्हा वागळेंना त्यांनी जवळ केलं नाही. हे महाशयांनी युट्युब चॅनल बोलताना देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केलेल्या इच्छेचे रूपांतर रडण्यात केलं. मुळात फडणवीस रडणारे नेते नसुन लढणारा नेता या अनुभवातुन वागळे देखील बाजुला जावु शकत नाहीत. जो नेता पराभवाची जबाबदारी स्वतःवर घेतो, घटक पक्षाच्या नेत्यावर देखील टाकत नाही, त्यालाच खरा राजकिय पुरूषार्थ म्हणतात. हे विचारवंत असलेल्या वागळेंना कळत नाही याचे दुर्दैव म्हणावे लागेल. खालच्या स्तराला जावुन बरचसं वर्णन करताना आता विधानसभेची सुपारीच महाविकास आघाडीकडून वागळेंनी घेतली की काय? अशी शंका पाहणाऱ्या दर्शकाला निश्चित येवुन गेली. महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत 150 विधानसभा मतदारसंघात मताधिक्य मिळालं यावर राजकिय पक्षाचे ज्या त्या लोक आनंद साजरा करणं साहजिक. पण वागळेसारखा जो स्वतःला राजकिय विचारवंत म्हणुन घेतो असा लेखक विचारवंत देखील 150 मतदारसंघात मिळालेल्या मताधिक्यावर विश्वास ठेवतो. ही तर कमालच म्हणावी लागेल. लोकसभा निवडणुक आणि विधानसभा निवडणुक यातला राजकिय फरक तरी वाघळेंना समजायला हवा. स्थानिक समीकरणं, आघाडीचे समीकरणं यातले फरक त्यांना अजुनही कळत नाही दुर्दैव म्हणावे लागेल. मुळात सांगायचं तात्पर्य हेच आहे की, देवेंद्र फडणवीसांविषयी उकाळ्या पाकळ्या तुम्हाला का फुटल्या? महाविकास आघाडीच्या कुठल्या पक्षाकडुन तुम्हाला अर्थार्जनाचे धडे मिळाले? हे तरी जाहिर करायला हवं. नाही तर त्यापेक्षा काँग्रेस किंवा शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचे प्रवक्ता पद मागवुन घ्यायला हवं. आम्ही कुठल्याही राजकिय पक्षाशी संबंधित नाही म्हणुन ओरडायचं. कृती मात्र प्रवक्त्यापेक्षाही अधिक करायची हा दुटप्पीपणा निखिलजी वागळे बरं नव्हं. तुम्ही प्रवक्ते व्हा, जो नेता आणि पक्ष तुम्हाला आवडतो. कदाचित महाविकास आघाडी आणि मग विरोधक म्हणुन सत्ताधाऱ्यावर हल्ले चढवा.लोक तुमच्या भुमिकेचे स्वागत करतील. वेड घेवुन पाडगावला जायचं. मी म्हणेल ते चांगलं तुमचा व्हिडिओ सुरू झाला की बंद करणाऱ्यांच्या संख्या वाढली लक्षात घ्या.

# इस्त्राईलची उत्तर सीमेवरील नवी चढाई ?



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**इस्त्राईल पुढे मोठा प्रश्न आहे तो सुरक्षिततेचा आणि पॅलेस्टाईन पुढे प्रश्न आहे तो पुनर्बांधणीचा. हे दोन्ही प्रश्न युद्धबंदी झाल्याशिवाय सुटण्याची सूतराम शक्यता नाही. गेल्या वर्षी ७ ऑक्टोबरला सुरू झालेले इस्त्राईल- हमास युद्ध काही केल्या थांबता थांबत नाही. इस्त्राईलचा प्रयत्न गाझापट्टीवर पूर्ण वर्चस्व मिळविण्याचा आहे. परंतु त्यामध्ये त्याला किती यश येईल आणि केव्हा येईल हे आज सांगता येत नाही. अमेरिका मात्र कधी इस्त्राईलची बाजू घेते, कधी विरोधी पक्षाची बाजू घेते, कधी पॅलेस्टाईनचा पुरस्कार करते आणि हे युद्ध लवकर थांबावे असे म्हणते. त्याबरोबरच, इस्त्राईलला स्वरक्षणाचा अधिकार आहे असेही सांगते.**

त्यामुळे त्रिपक्षीय बोलणीतून फारसे काही निष्पन्न झाले नाही. तीन कलमी तोडगा तयार झाला पण त्याची अंमलबजावणी अजूनही झालेली नाही. याच पार्श्वभूमीवर आता इस्त्राईलने त्याच्या उत्तर सीमेकडील लेबनान आणि हिसबुल्ला यांना प्रतिशह देण्यासाठी नवी चढाई मोहिम सुरू करण्याचा संकल्प केला आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांची उत्तर सीमेवरील भेट त्यामुळे अर्थपूर्ण मानली जात आहे. इस्त्राईलचा हा नवा पवित्रा नव्या युद्ध आघाडीवर काम करण्याचा आहे. इस्त्राईलची ही खेळी मोठी चतुराईची आहे. मुत्सद्देगिरीची आहे. कारण इस्त्राईलला एका बाजूला हिसबुल्ला आणि हमास यांची युती तोडावयाची आहे आणि दुसऱ्या बाजूला जर गाझापट्टीत युद्धबंदी झाली तर हमासचा मित्र असलेल्या हिसबुल्लाला कसे मागे सारावयाचे हा इस्त्राईलचा त्यामागील डाव आहे.

मागील ऑक्टोबर महिन्यापासून हिसबुल्लाने इस्त्राईलच्या प्रदेशावर हल्ले सुरू केले आहेत. या हल्ल्या-प्रतिहल्ल्यामध्ये दोन्ही बाजूंचे नुकसान झाले आहे. हिसबुल्लाचे ३०० हून अधिक लोक मारले गेले आहेत, तर ८० लोक विस्थापित झाले आहेत आणि इस्त्राईलच्या बाजूनेसुद्धा १८ ते २० लोक कामी आल्याचे सांगितले जाते. हिसबुल्लाचे वाढते ड्रोन हल्ले, अचानक केल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्राचा वापर यामुळे उत्तर सीमेवरील इस्त्राईली लोक अस्वस्थ झाले आहेत. त्यातील २-३ शहरातील लोकांना तर जीव मुठीत धरून जगावे लागत आहे. काहींनी स्थलांतर केले आहे. लेबनान व हिसबुल्ला बंडखोरांना इराणचा पाठिंबा आहे असे म्हटले जाते. या पार्श्वभूमीवर, नेतान्याहू यांनी उत्तर सीमेचा दौरा केला. या भेटीनंतर त्यांनी जे आपल्या मनातले रदगत बोलून दाखविले ते मोठे अर्थपूर्ण आहे. नेतान्याहू म्हणतात की, हिसबुल्लाचे हे हल्ले किती दिवस सहन करावयाचे, तर उलट हिसबुल असे म्हणते की, जोपर्यंत गाझापट्टीवरील आक्रमण इस्त्राईल थांबवित नाही तोपर्यंत हिसबुल हमासचे समर्थन करतच राहणार. याचा अर्थ असा होतो की, या दोन्ही युद्धामधला अंतर्गत कलहाचा मुद्दा हा शेवटी पॅलेस्टाईन आणि हमासशी निगडीत आहे. आता अचानक इस्त्राईल उत्तर सीमेवरील आक्रमण तीव्र करण्याचा प्रयत्न का करीत आहे ? त्याचे उत्तर असे की, इस्त्राईलला लेबनानमधील हिसबुल्लाच्या गटांना मागे सारावयाचे आहे. लेबनानच्या सीमावर्ती भागातून हिसबुल्लाचे बंडखोर मोठ्या प्रमाणात इस्त्राईलवर प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे हल्ले करीत आहेत. या हल्ल्यांना रोखण्याचा प्रयत्न करण्यासाठी एक व्यापक अशी लष्करी संरक्षण मोहिम इस्त्राईलने उघडण्याचे ठरविले आहे. आता ही मोहिम किती दिवस चालेल, तिचे स्वरूप काय



असेल याचा विचार करता असे दिसते की, जोपर्यंत गाझापट्टीवर पूर्ण वर्चस्व मिळत नाही, तोपर्यंत हिसबुल्लाचे लेबनानमधून इस्त्राईलवर हल्ले होतच राहतील आणि या हल्ल्याचा परिणाम उत्तर सीमेवरील लोकांच्या नागरी जीवनावर होत आहे. हे पाहून आता या उत्तर सीमेवरील लेबनानमधील हिसबुल्लाच्या केंद्रावर प्रत्युत्तर म्हणून आक्रमण करण्याचा इस्त्राईलचा संकल्प दिसतो आहे. यावर अमेरिकेचे प्रवक्ते मिलर यांनी असे सांगितले आहे की, इस्त्राईलला स्वसंरक्षणाचा अधिकार आहे. परंतु अमेरिकेची भूमिका अशी आहे की, आता हा संघर्ष कुठेतरी थांबला पाहिजे. यापुढे गाझापट्टीवरील शांततेसाठी अमेरिका सतत दबाव आणत राहणार हे उघड आहे आणि जर गाझामध्ये त्रिपक्षीय शांतता करारामध्ये काही सकारात्मक घडून आले, युद्धबंदी झाली तर हमास हिसबुल्लाच्या मदतीने उत्तर सीमेवर काही ना काही कुरापती करीत राहील हे लक्षात घेऊन त्याला चोख प्रत्युत्तर देण्याची नवी मोहिम नेतान्याहू यांनी आखली आहे.

नेतान्याहू यांच्या कार्यकाळातील त्यांचे अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री हे कमालीचे उजवे समर्थक आहेत. त्यांच्या मित्रपक्षाचे ते सदस्य आहेत. त्यांचेही समर्थन नेतान्याहू यांच्या पाठिशी आहे. नेतान्याहू यांच्यावरील आरोप-प्रत्यारोप हे सर्व विसरून जाऊन घटक पक्षाचे लोक त्यांच्या नेतृत्वावर विश्वास करीत आहेत आणि नेतान्याहू इतिहासामध्ये एक नवा अध्याय लिहिण्याच्या तयारीत आहेत. खरेतर, हिसबुल्लाने पहिले आक्रमण २००६ मध्ये केले. तेव्हापासून २०२४ पर्यंत या ना त्या मार्गाने हिसबुल्ला काही ना काही कुरपती काढून इस्त्राईलच्या उत्तर सीमेवर हल्ले करीतच आहे. अलिकडे, मागील ऑक्टोबर महिन्यापासून या हल्ल्यांची तीव्रता वाढली आहे. हे लक्षात घेऊन इस्त्राईलने चोख प्रत्युत्तराची योजना केली. आहे. इस्त्राईलने केलेल्या हल्ल्यामध्येसुद्धा लेबनानमधील अनेक शहरांमध्ये आगीचे लोळ दिसतात आणि अनेकांच्या दुःखाच्या किंकाळ्या ऐकू येतात. तेव्हा हिसबुल्लाचे असे म्हणणे आहे की, आमच्यावर जर हल्ले केले तर आम्ही त्याचे चोख उत्तर देऊ आणि आम्हीही इस्त्राईलमध्ये अस्थिरता आणि हिंसाचार घडवून आणू. तेव्हा उभयतांच्या क्रिया-प्रतिक्रियातून लेबनान आणि इस्त्राईल सीमेवरील युद्धाचे ढग हे कायम राहतील असे दिसते. इस्त्राईलचा पवित्रा आक्रमक बनला आहे. उत्तर सीमा सुरक्षेसाठी नेतान्याहू नवी सामरिक व्यूहरचना करीत आहेत. त्यांना हमासला एकाकी पाडावयाचे आहे. पण हिसबल आणि हुथीसारख्या संघटनांना रोखून धरण्यात इस्त्राईलला किती यश येते यावर या मोहिमेचे यश अवलंबून आहे.

या सर्व चर्चेचा अर्थ असा की, इस्त्राईलची नवी नियोजित उत्तर मोहिम म्हणजे गाझामध्ये युद्धबंदी झाल्यानंतर पुढे कोणत्या मार्गाने, कोणत्या भौगोलिक दिशेने युद्ध चालू ठेवायचे तर ते उत्तर सीमेवरून उत्तर सीमा आम्हाला सुरक्षित करावयाची आहे, तिच्यावर हिसबुल्लाकडून आक्रमणाचा धोका आहे. त्यामुळे आम्ही उत्तर सीमा अधिक सुरक्षित आणि भक्कम करण्यासाठी प्रत्युत्तर द्यायला तयार आहोत, असे नेतान्याहू यांनी या भागाचा दौरा केल्यानंतर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. याचा अर्थ असा होतो की, इस्त्राईलची युद्धाची तयारी संपलेली नाही. गाझापट्टीमध्ये ७५ टक्के भागात विजय मिळविल्यानंतर, राफाहवर नियंत्रणानंतर आता इस्त्राईल त्याच्या उत्तर सीमेकडील हिसबुल्ला आणि लेबनानमधील बंडखोरांना चोख उत्तर देण्याच्या तयारीमध्ये आहे. आपल्या सीमा सर्व बाजूंनी सुरक्षित करावयाच्या आणि आक्रमकांना रोखून धरावयाचे हे इस्त्राईलचे धोरण असून नेतान्याहू या दिशेने प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. त्यांची उत्तर मुसंडीची मोहिम किती यशस्वी होते हे त्यांच्या युद्ध व्यूहरचनेवर अवलंबून असणार आहे आणि त्यांना हिसबलच्या आक्रमक हालचाली, त्यांचे व्यूहरचनात्मक डावपेच, त्यांची हमासची असलेली युती या सर्व गोष्टींचा विचार करून योग्य निर्णय आणि योग्य कृती करावी लागेल, नाहीतर दोन आघाड्यांवर युद्ध करता करता इस्त्राईलचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे हीही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

नजीकच्या भविष्यकाळात इस्त्राईलच्या युद्ध व संरक्षण व्यवस्थेचा खर्चही वाढणार आहे. त्यामुळे इस्त्राईलने आता हा संघर्ष कमी करून आपल्या देशाच्या विकासासाठी आणि पॅलेस्टाईनच्या पुनर्रचनेसाठी मदत केली पाहिजे. अमेरिकेने आम्ही आता पॅलेस्टाईनच्या पुनर्रचनेसाठी व हमासच्या युद्धामुळे नुकसान झालेल्या भागाची पुनर्बांधणी करण्यासाठी नवी मोहिम आखत आहोत असे सांगितले आहे. अमेरिकेप्रमाणे युरोपिय देशांनासुद्धा पॅलेस्टाईनच्या पुनर्स्थापनेसाठी मोठा पुढाकार घ्यावा लागणार आहे. भारत आणि विकसनशील देशांनीसुद्धा पॅलेस्टाईनच्या पुनर्रचनेसाठी नवी योजना आखण्यास सहकार्य करण्याचे ठरविलेले आहे. युद्ध लवकर थांबले तरच या पुनर्रचनेला प्रारंभ होऊ शकतो नाहीतर, इस्त्राईलची उत्तर मोहिम आणखी संकटाच्या खाईत नेणारी ठरेल असेच म्हणावे लागेल. इस्त्राईलची मोसाद ही गुप्तहेर संघटना त्यांच्या नौदल व हवाईदल पेक्षाही मोठी शक्ती मानली जाते. असे असले तरी, इस्त्राईल पुढे मोठा प्रश्न आहे तो सुरक्षिततेचा आणि पॅलेस्टाईन पुढे प्रश्न आहे तो पुनर्बांधणीचा. हे दोन्ही प्रश्न युद्धबंदी झाल्याशिवाय सुटण्याची सूतराम शक्यता नाही.

# वाढते पाणीसंकट : देशाच्या आर्थिक विकासाला खीळ



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**पाण्याचे वाढते संकट हा पर्यावरणाच्या दृष्टीने चिंतेचा विषय तर आहेच, पण त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासालाही बाधा येत आहे. कमी होत जाणारे जलस्रोत आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे मानवी जीवनात आणि आर्थिक विकासात अस्थिरता वाढत आहे. त्यामुळे मानवी जीवनासह पशु-पक्ष्यांचे अस्तित्वदेखील धोक्यात आले आहे. वाढत्या जलसंकटाचा अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या क्षेत्रांवर विशेष परिणाम होत आहे. कृषी उत्पादन, पर्यटन, पशुसंवर्धन, उद्योग, फलोत्पादन, मत्स्यपालन, दुग्धउद्योग आणि यांसह इतर अनेक क्षेत्रांना याचा सर्वाधिक सामना करावा लागत आहे.**

आज जगातील एक तृतीयांश लोकसंख्येला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही. संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालात असे दिसून आले आहे की, सध्या प्रत्येक दुसऱ्या व्यक्तीला पाण्याची गंभीर समस्या भेडसावत आहे. जगातील सुमारे 73. 3 कोटी लोक अशा भागात राहतात जिथे पाण्याची समस्या अत्यंत गंभीर बनली आहे. जागतिक स्तरावर, 2050 पर्यंत शुद्ध पाण्याची एकूण मागणी 30 टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे.जागतिक बँकेने आपल्या एका अहवालात म्हटले आहे की स्वच्छ पाण्याच्या कमतरतेमुळे दरवर्षी 260 अब्ज डॉलर्सचे नुकसान होते.

जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेतही जलसंकट हा मुख्य अडथळा आहे. यामुळे नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा नैसर्गिक हक्क धोक्यात आला आहे, त्याचबरोबर देशातील कोट्यवधी लोकांचे जीवनमान धोक्यात आले आहे. विविध क्षेत्रातील नोकऱयांवर गदा येत आहे. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या चारपैकी तीन नोकऱ्या या पाण्यावर अवलंबून आहेत. अशा स्थितीत वाढत्या जलसंकटाचा नोकऱ्यांवर विपरीत परिणाम होणार आहे. आधीच आपल्या देशात बेरोजगारीचा दर उच्च पातळीवर आहे, त्यामुळे पाण्याच्या संकटामुळे बेरोजगारीचा दर प्रचंड वाढेल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

औद्योगिकीकरणाकडे वेगाने वाढणारी भारतीय अर्थव्यवस्था आणि शहरीकरणाचा वाढता कल यामुळे पाण्याची मागणी झपाट्याने वाढत आहे. दुसरीकडे, पाणीपुरवठा वाढण्याची शक्यता फारच मर्यादित आहे. भूजल पातळी हळूहळू कमी होत आहे. शहरांमधील पाण्याचे वाढते संकट तेथील आर्थिक विकासालाही खीळ घालत आहे. पाण्यावर आधारित खाद्यपदार्थांच्या किमती वाढताहेत, साहजिकच त्यामुळे महागाई वाढते. वाढत्या महागाईमुळे लोकांवर आर्थिक दबाव वाढतो, ज्यामुळे गरिबी आणि उपासमार यासारख्या समस्या निर्माण होतात. शहरे आणि ग्रामीण भागात जलसंकटामुळे शुद्ध पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत असून जलजन्य आजार झपाट्याने पसरत आहेत. स्वच्छ पाण्याच्या कमतरतेमुळे कामगारांच्या उत्पादकतेवर परिणाम होतो आणि आरोग्य सेवांवर आर्थिक भार वाढतो. ‘वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिटयूट’च्या अहवालात जगातील गंभीर जलसंकटाचा सामना करणाऱ्या सतरा देशांच्या यादीत भारताचाही उल्लेख करण्यात आला आहे. अनेक मोठ्या शहरांमध्ये पाण्याचे संकट हे गंभीर आव्हान आहे. भारतातील तिसरे सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर बंगळुरू हे सध्या गंभीर जलसंकटाचा सामना करत आहे. ‘डे झिरो’ सारखी परिस्थिती तिथे पाहायला मिळते. याचा विपरीत परिणाम शाळा, कॉलेज, रेस्टॉरंट, हॉटेल्स यांच्या व्यवसायावर होत आहे. ही परिस्थिती केवळ बंगळुरूमध्येच नाही, तर भारतातील अनेक मोठ्या शहरांमध्ये आहे. युनेस्कोच्या अहवालात म्हटले आहे की 2025 पर्यंत उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, बिहार, महाराष्ट्र अशा अनेक मोठ्या शहरांमध्ये पाण्याचे संकट वाढेल, अनेक शहरे ‘ड्राय झोन’मध्ये सामील होतील. ‘सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट’च्या अहवालातही भारतातील तेरा राज्यांमध्ये ‘डे झिरो’ची भीती व्यक्त करण्यात आली आहे. ‘टू-झिरो’ शहरांमध्ये पाणीपुरवठा इतर स्रोतांवर अवलंबून असतो. भारतात शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा न झाल्याने मोठ्या प्रमाणात लोकांचा मृत्यू होतो. नीती आयोगाच्या अहवालातून हे स्पष्ट झाले आहे. भारतात दरवर्षी सुमारे दोन लाख लोक पुरेशा पाणीपुरवठ्याअभावी मरण पावतात.



जगातील एकूण लोकसंख्येपैकी १८ टक्के लोक भारतात राहतात, तर भारतात फक्त चार टक्के लोकसंख्येसाठी पाण्याची उपलब्धता आहे. जागतिक बँकेच्या अहवालात असे दिसून आले आहे की गेल्या वर्षी भारतातील सुमारे 9.1 कोटी लोक शुद्ध पाण्यापासून वंचित होते. ‘क्लायमेट चेंजः वॉटर अँड इकॉनॉमी’ या शीर्षकाच्या 2016 च्या अहवालात जागतिक बँकेने जगाला इशारा दिला होता की, जलसंकटाचा सामना करणाऱ्या देशांना 2050 पर्यंत आर्थिक वाढीच्या संकटाचा सामना करावा लागू शकतो. जलसंकटामागे अनेक कारणे आहेत. हवामान बदलामुळे पर्जन्य चक्रात होणारे बदल, अनियोजित शहरीकरणात झपाट्याने होणारी वाढ, वाढती लोकसंख्या, शीतपेये बनवणाऱ्या कंपन्यांकडून होणारे भूजलाचे अत्याधिक शोषण, जलविद्युत प्रकल्पांची वाढती संख्या, नद्यांवर बांधले जाणारे बंधारे, सिंचनाच्या योग्य व्यवस्थापनाचा अभाव, त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड, अशी अनेक कारणे जलसंकटाला जन्माला घालत आहेत.

पाण्याशिवाय मानवी विस्तार आणि आर्थिक विकास शक्य नाही. पाण्यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्यांचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होतो, अन्न उत्पादकता कमी होते, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते आणि अन्नसुरक्षेवरील संकट वाढते. यामुळे देशातील गरिबी, विषमता आणि सामाजिक अस्थिरता वाढते आणि देशात राजकीय अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता वाढते. तसेच, ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम झाला आहे. जलसंकटामुळे पर्यटन स्थळांवर आणि व्यवसायावर परिणाम होतो, त्यामुळे स्थानिक लोकांचे रोजगार आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थेचे नुकसान होते. देशाच्या औद्योगिक विकासात आणि उत्पादनात घट होत असून या क्षेत्राशी संबंधित रोजगार कमी होत आहेत. अनेक समाजकल्याणविषयक धोरणे आणि योजनांना बाह्य आणि अंतर्गत व्यापारात अडथळे येतात.

आपल्याला माहीतच आहे कि, आर्थिक विकासासाठी पाणी हे मूलभूत स्त्रोत प्रदान करते. ते लोकांच्या जीवन आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे रक्त आहे. जलसंकट आणि कमी होत जाणारे जलस्रोत यामुळे जगभरातील सर्व समुदायांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पाण्याचे अतार्किक शोषण लवकरात लवकर थांबवण्याची गरज आहे. नवीन कायदे करून पाण्याच्या शोषणावर मर्यादा घालाव्या लागतील. जलस्रोत वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी पुढाकार घेतला पाहिजे. सांडपाणी आणि समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर प्रक्रिया मोठ्या प्रमाणात राबवण्याची गरज आहे. शहरे आणि ग्रामीण भागात स्वातंत्र्याच्या काळापासून ते आजपर्यंतच्या सर्व तलाव, विहिरी आणि लहान नद्यांचे नूतनीकरण करण्याचे नियोजन केले पाहिजे.

शहरी भागातील पाण्यावर आधारित उद्योग, कारखाने, शेती आणि फलोत्पादनासाठी सांडपाण्याच्या पुनर्वापराला चालना द्यावी. खासदार-आमदारांनी आपापल्या भागातील विहिरी, तलाव, लहान नद्या दत्तक घेण्यासाठी आणि त्याचे नूतनीकरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. जलसंधारण रक्षक नेमून लोकांमध्ये जलसंधारणाबाबत जनजागृती करावी. पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी. जलसंकट वेळीच रोखले नाही तर आर्थिक विकासाला खीळ बसेल.

# देवाचिये द्वारी उभा क्षणभरी | तेणें मुक्ति चारी साधिलिया ||



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**प्रत्येक जीव हा सुखाच्या शोधात फिरत असतो. जसं प्रत्येकाला आपलं स्वतःचं घर प्रिय असतं. दिवसभर आपण कोठेही फिरलो, सुख देणाऱ्या कितीही वस्तू आपल्याला प्राप्त झाल्या, किंवा दिवसभरामध्ये कितीही कष्ट करावे लागले तरी जेंव्हा आपण आपल्या घरी येतो, तेव्हाच आपल्याला खऱ्या सुखाची अनुभूती येते. बाह्यांगाने मनाची अस्वस्थता थांबत नाही. आपलं मन हे फार चंचल आहे, परंतु जेव्हा ते आत्मतत्त्वाच्या घरी येतं तेव्हाच त्या मनाला खरी शांतता अनुभवता येते. मन स्वरूपा जवळ, स्वगृही आल्यावरच शाश्वत आनंद मनास प्राप्त होतो. जसं आपण फिरायला बाहेर जातो तिथे आपल्याला सर्व सुख सोयी, सुविधा उपलब्ध असतात.**

परंतु तरीही घराची ओढ लागलेली असते... आपण बाहेर कितीही गेलो तरी आपल्याला आपल्या घरी जो आनंद मिळतो तो इतर कोठेही मिळू शकत नाही. अगदी त्याचप्रमाणे संतांनी सांगितले आहे की आपण मनाने कितीही जरी भरकटलो तरी आपल्याला आपल्या आत्मस्वरूपाच्या घरी येता आलं पाहिजे. त्यालाच संत म्हणतात "परे हून परते घर | तेथे राहू निरंतर" || बाह्य जगतामध्ये मनाने वावरत असताना सुख मिळाल्यासारखं वाटतं, परंतु ते क्षणिक असतं, क्षणभंगुर असतं. म्हणून संत सांगतात दिवसभर आपण कुठेही गेलो तरी चालेल, कुठे फिरावं असं वाटलं तरी चालेल, परंतु सायंकाळ होण्याच्या आधी आपण आपल्या घरी यावं म्हणजेच आपल्या आत्मस्वरूपाच्या जवळ येण्यासाठी चिंतन, मनन, शास्त्राचे वाचन, सत्संग करायला हवा. जसं गाई, गुरे, वासरे दिवसभर रानांमध्ये चरायला गेल्यानंतर ते सायंकाळ होताच घरच्या ओढीने धावत सुटतात, अगदी त्याचप्रमाणे आपलं मन सुद्धा आपल्याला स्वगृही धावत यायला हवं. ते विषयामध्ये एवढं भरकटतं की त्याला तेथून माघारी यावसं वाटत नाही. जसं माशी प्रत्येक वस्तूवर बसते परंतु ती अग्नीवर बसायला तयार होत नाही. जेव्हा मन स्वगृही येतं तेव्हा ते मन उरत नाही ते आत्मस्वरूपाच्या ठिकाणी एकरूप होऊन जातं. जेव्हा मन, बुद्धी, चित्त, अहंकार हे अंतकरणांमध्ये एकरूप होतात त्यावेळी अंतकरणांमध्ये प्रेम निर्माण होतं, आणि हे निर्माण झालेलं प्रेम आपल्याला भगवंताजवळ घेऊन जात असतं. यालाच संत म्हणतात "देवाचिये द्वारी उभा क्षणभरी | तेणे चारी मुक्ती साधयेल्या ||" मानवी मनामध्ये अनेक संकल्प विकल्प असतात. या संकल्प विकल्प यामुळे मनुष्य प्राणी आयुष्यभर भरकटत राहतो.जोपर्यंत मन अस्थिर आहे, अस्वस्थ आहे तोपर्यंत आपल्याला खऱ्या देवाची ओळख होऊ शकत नाही. आपल्या मनामध्ये देहाच्या योगाने आकार, विकार, प्रकार आपल्याला पाहायला मिळतात.देहाच्या संबंधाने संबध व संग्रह होत असतात. आपलं मन हे भरकटत जाऊ नये, त्याला कोणत्यातरी गोष्टीचं भय असावं, म्हणून लहानपणी आपल्याला भीती घालत असत. उदा. खोटं बोललं की देव कान कापतो, चोरी केली एक देव बाप्पा आपला शिक्षा देतो या अशा या आणि अनेक प्रकारच्या भीतीमुळे आपण ती गोष्ट करत नव्हतो. अगदी त्याचप्रमाणे मनामध्ये अजून उपासनेचा एक भय टाकलं गेलं होतं. तुम्ही उपवास नाही केला तर देव पावणार नाही, तुमची प्रगती होणार नाही, तुम्ही यात्रेला नाही गेलात, तुम्ही वारीला नाही गेलात, तुम्ही चारधाम नाही केले, तुम्ही सोळा सोमवार नाही केले अशा एक ना अनेक गोष्टींचे भय दाखवून आपल्याकडून त्या कृती करून घेतल्या जात होत्या. ते भय मानवाच्या मनावर एवढे खोलवर रुजले गेले होते की ते जर पूर्ण झालं नाही तर पुढच्या पिढीने ती गोष्ट पूर्ण करायचे तरच घरामध्ये सुख शांती नांदेल असा मौखिक परंपरेने आलेला वारसा प्रत्येक जण चालवत होतं. तेव्हा खऱ्या ज्ञानाची, खऱ्या देवाची, खऱ्या संतांची ओळख माणसाला झालेली नव्हती. संतांनी एवढी ओळख करून दिलेली असताना सुद्धा मानव मात्र ह्या सगळ्या उपासनेच्या मार्गामध्ये भरकटत चालला होता. अजूनही बरेच जण निरंकार उपवास करून भगवंताचे लक्ष माझ्याकडेच राहील, भगवंत माझं कल्याण करेल अशी भोळीभाबडी श्रद्धा असते. परंतु याला संत म्हणतात "उपाशीपोटी देव जोडे, तर दुष्काळात काय मेले थोडे". याचा अर्थ असा नाही की आपण उपवास करायचा नाही, श्रद्धा ठेवायची नाही, भक्ती करायची नाही... आपल्याला एखादी आपली इच्छा पूर्ण होण्यासाठी उपवास धरायचा नाही किंवा या देहाला यातना देऊन भगवंत आपल्याला कधीच भेटणार नाही. यालाच संत साधं सोपं उदाहरण देतात, रस्त्यावरती भीक मागणारे यांना पुरेसं अन्न मिळत नाही व त्यांना उपवास घडत नाही का, मग त्यांना देव का भेटत नाही? आपण जर या गोष्टीचा सूक्ष्म विचार केला तर आपली आपल्याला जाणवेल, स्वइच्छेने, स्वतःच्या अंतकरणापासून भगवंताच्या जवळ वास करण्यासाठी जो प्रयत्न केला जातो त्याला उपवास असं म्हटलं जातं. कोणतीतरी इच्छा पूर्ण व्हावी, आपल्या मागण्यांच्या लिस्टमधील मागणी पूर्ण व्हावी, यासाठी केलेला अटोकाट प्रयत्न म्हणजे उपवास नव्हे, कारण खरंतर उपवास म्हणजेच त्या भगवंताजवळ राहणं, परंतु जोपर्यंत आपल्या मनामध्ये संकल्प विकल्प आहेत, जोपर्यंत अपेक्षांचे ओझं आपल्या मनावर आहे, तोपर्यंत आपण भगवंताजवळ वास करू शकत नाही. आपण उपवास करतो, वाऱ्या करतो आणि कोणाला यश मिळालं तर आपल्या मनामध्ये मस्तराची भावना निर्माण होते, कोणी आपल्या मनाविरुद्ध वागलं तर आपल्या मनामध्ये क्रोधाची भावना निर्माण होते, आपल्याला प्रारब्धापेक्षा अधिक मिळालेला आहे परंतु तरीही अजून मिळत राहो ही मोहाची भावना मनामध्ये निर्माण होते, हे सगळं जे जगामध्ये भरलेला आहे हे सर्व सुखे माझ्याजवळ असायला हवीत ही जी माया मानवी मनामध्ये निर्माण होते, त्याचबरोबर माझ्यापेक्षा त्या व्यक्तीकडे अधिक कसं ही जी मत्सराची भावना मानवी मनामध्ये निर्माण होते, त्यावेळी त्या व्यक्तीने अगदी पाणीही न पिता जरी उपवास केला तरी तो एक क्षण सुद्धा भगवंताजवळ राहू शकत नाही. उलट अंतकरणातील प्रेम नाहीसे होते. म्हणून ज्यांना असं वाटतं की मी उपवास केल्याने देव मला भेटेल, त्यांनी एक दिवस काम, क्रोध, मोह, मत्सर, द्वेष यांचा उपवास करावा. आपण खऱ्या अर्थाने भगवंताच्या जवळ जाण्यासाठी पात्र होऊ शकत नाही.मी आणि माझे हा अहंकार गेला पाहिजे... संत म्हणतात, "साळुंखी मंजुळ बोलत असे वाणी, शिकविता धनी वेगळाची". माऊली नव्या अध्याय मध्ये म्हणतात," हे मजिस्तव झाले | परी म्या नाही केले | ऐसे जेने जाणितले | तो सुटला गा ||



संत साहित्यातील तत्वज्ञान भाग -१०

जोपर्यंत मी पणाचा आणि माझे पणाचा अहंकार जात नाही तोपर्यंत आपण स्वस्वरूपाच्या मार्गाने जाऊ शकत नाही. ज्या क्षणी मनामध्ये कोणताही विचार नसेल मन हे निर्विचारी असेल तो क्षण म्हणजे देवाच्या द्वारामध्ये उभा असलेला क्षण आहे. तेव्हा मी कोण आहे, माझी उपाधी काय आहे, मला काय हवं आहे, मी कशासाठी आलेलो आहे, माझं कोण आहे, माझ्याकडे काय आहे अशा एक ना अनेक प्रत्येक गोष्टीचा विसर ज्या क्षणी आपल्याला पडेल तो एकच क्षण आपण भगवंताच्या जवळ असणारा होय. तो एक क्षण आपल्याला साधता आला पाहिजे. पण आपलं मात्र उलट होतं ज्या क्षणी आपण ध्यानाला बसू, चिंतनाला बसू त्या वेळेला आपल्या डोक्यामध्ये पिऱ्याचा उरूस सुरू होतो. म्हणजे शांतता मिळण्याच्या ऐवजी मनाची अस्वस्थता अधिक प्रमाणात वाढत जाते. परंतु आपल्याला या चिंतनाची सवय असायला हवी.म्हणून रोजच्या नित्य अभ्यासाने सद्गुरूंच्या कृपेने आपल्याला तो एक क्षण साधता आला पाहिजे. तेव्हा माऊली म्हणतात, देवाचे द्वारी उभा क्षणभरी तेणे चारी मुक्ती साधयेल्या || लहानपणापासून आपल्या मनावरती बिंबवलेलं असतं. आपल्याला मुक्ती हवी, आपल्याला मोक्ष हवा, देवाची उपासना केली की आपल्याला मोक्ष मिळेल, भक्ती केली की मुक्ती मिळेल. ह्या ज्या गोष्टी आपल्या मनावर बिंबवलेल्या असतात. अहो संतांनी सांगितलं की मुक्ती म्हणजे - सलोकता, समीपता, स्वरुपता, सायुज्यता या चार मुक्ती सांगितलेल्या आहेत. यामध्ये देहाच्या मृत्यूनंतरही आपल्याला भगवंताच्या जवळ देवलोकांमध्ये राहता येणे त्याला सलोकता असं म्हटलेलं आहे, समिपता म्हणजेच भगवंताच्या जवळ सातत्याने राहणं, स्वरूपता देवाचे भगवंताचे स्वरूप आपल्याला प्राप्त होणं आणि सायुज्यता म्हणजे त्या परमात्म्याशी एकरूप होणं. परंतु संत सांगतात देहाच्या मृत्यूनंतर आज पर्यंत कोणी ह्या गोष्टी अनुभवले आहेत, हे कोणाला सांगता येईल काय? म्हणून जे काही हवं आहे जो काही मोक्ष, जी काही मुक्ती, आनंद जे काही हवं आहे ते या देहात जीव असेपर्यंतच. म्हणजे या जीवात जीव आहे तोपर्यंतच आपल्याला आत्मतत्त्वाच्या या देव लोकात राहता आलं पाहिजे. ज्या चरचरसृष्टीने तत्व भरलेले आहे, त्या भगवंताजवळ आपल्याला वास करता आला पाहिजे. सगुण आणि निर्गुण हे जे काही भगवंताचे रूप आहे त्या भगवंताच्या रूपाशी आपल्याला एकरूप होता आलं पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे या परमार्थिक वाटेवर चालताना आपल्याला त्या जीवा शिवाचं ऐक्य झालं म्हणजेच त्या परमात्म्याची एकरूप झालं पाहिजे. ज्या क्षणी आपण त्या परमात्म्याची एकरूप होऊ तो क्षण आपल्या मुक्तीचा क्षण असणार आहे. यालाच संत सांगतात, ठाईच बसूनी करा एक चित्त |आवडी अनंत आळवावा || मूख हलेना, कंठ हलेना, जीवनसूम रे राम राम करे हम बैठे आराम याला जोडून पुढे संत सांगतात काहो हिमता राणू राणी उसा संतांचे जाऊ नये थोर संतांचा महिमा आला बहुतांच्या कामा त्याला संत तुकाराम महाराज म्हणतात देव पहावयासी गेलो आणि देवची होऊनी ठेलो || सूक्ष्म विचार आहे की दगड एकदा मंदिरात गेला तर तो भगवंत स्वरूप होऊन जातो आणि माणूस मात्र आयुष्यभर मन मंदिरात जाऊन सुद्धा तो अंतकरणाने दगडच राहतो आपण देहाला सत्य मानतो.चार देह, चार अवस्था, तीन गुण, पाच कोश यांचे ज्ञान करून घेतले तर सर्व प्रारंधाच्या गाठी उकलल्या जातील. देहाच्या बांधोडी न पहिजे | सुखदुःखाच्या सागरी न बुडीजे | सुखे सुखात्मे घडीजे माझिया अंगा || चार देह स्थूल सूक्ष्म कारण महाकारण, चार अवस्था जागृती स्वप्न शिशुप्ती समाधी, तीन गुण रज तम सत्व, पंचकोश अन्नमय मनोमय विज्ञानमय आनंदमय याचे चिंतन झाले तर मोक्ष व मुक्ती इथेच आहे. स्थूल देह हा आकाश वायू तेज जल आणि पृथ्वी या पंचमहाभूतांनी बनलेला आहे. चर्मदृष्टीने दिसणारा असा आहे. पंचमहाभूत व तीन गुण यांनीच अष्टदा प्रकृती तयार होते, अष्ट सात्विक भाव सुद्धा तयार होत असतो. पाच प्राण व्यान समास उदान अपान प्राण हे पंचप्राण असतात. तर कान नाक त्वचा डोळा जीव ही पाच ज्ञानेन्द्रिय, वाणी हात पाय शिश्न व गुद ही पाच कर्मेंद्रिये हे सर्व सूक्ष्म देहामध्ये सामावलेले असते. नंतर कारण देह याला संतांनी अज्ञान स्वरूप असं मानलेला आहे व महाकारण देह याला ज्ञान स्वरूप असं म्हटलेलं आहे. अवस्था मध्ये जागृती -जागृती मध्ये सत्य वाटते. स्वप्न स्वप्नामध्ये खरे वाटते. परंतु स्वप्नामध्ये आपल्याला साप चावला तर त्यासाठी जागृतीतला डॉक्टर चालत नाही. अगदी तद्वतच तीन सत्ता आहेत. परमार्थिक, व्यवहारीक, प्रतिभासिक इ. प्रतिभासिक सत्तेत कल्पना असते, व्यावहारिक सत्तेत वास्तव असते.आणि ज्याच्या विषयी बोलता येत नाही ती पारमार्थिक सत्ता असते. जसे विचारापुढे विषय टिकत नाही आणि विचार भगवंतापुढे टिकत नाही. म्हणून शाश्वत तो फक्त भगवंत आहे बाकी सर्व अनात्म आहे. देह सुद्धा काळाच्या अधीन आहे. पंचकोशाची उपाधी घेतली की तो जीव होतो.जसे अन्नमय कोश म्हणजेच तो अन्नावर जगतो अन्नावर वाढतो आणि कोणाचे तरी अन्न होऊन जातो. प्राणमय कोश म्हणजे भूक आणि तहान लागते, मनोमय कोशामुळे भय चिंता निर्माण होते, विज्ञानमय कोषामुळे आपल्याला या सृष्टीचा करता करविता मी नाही याची ओळख होऊ लागते आणि आनंदमय कोश म्हणजेच आपण त्या स्वस्वरूपाशी एकरूप होऊन जातो. उपाधी गेली की जीव शिवच आहे. सगळे खेळ हे मानाचेच असतात. म्हणून आपण चारधाम यात्रा हे करण्यासाठी न फिरता, स्वतःच्या देहाला या सुदाम्याला त्रास न देता भगवंताची ओळख करून घ्यायला हवी. यात्रा एक पर्यटन म्हणून केली की इच्छा पूर्ती न झाल्याचे दुःख पदरी येत नाही. जैसे कर्म केले तसे फळाशी आले | उपजले मेले ऐसे किती || म्हणून कर्म करून निष्कर्ष स्थितीत राहण्याची मनाला सवय लागली की आपला प्रत्येक क्षण हा भगवंताच्या द्वारामध्येच असणार आहे. जोपर्यंत आपण आपल्या इंद्रियांना मनाला वळण लावत नाही तोपर्यंत आपण भगवंताच्या द्वारा जाऊ शकत नाही. म्हणून संत म्हणतात, देव आहे देव आहे , ह्रदयी मंदिरी शोधुनी पाहे || देव नटला नाना परी | भरुनी उरला चराचरी ||

# राज्यावर भीषण दुष्काळाचे सावट



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**यंदा पिण्याच्या पाण्याचे संकट गहिरे बनत चालले आहे. देशातील अनेक राज्ये पाण्यासाठी तरसत आहेत. देशातील ३३ कोटी लोकसंख्येला दुष्काळाने कवेत घेतले आहे. देशात सर्वाधिक धरणे महाराष्ट्रात आहेत. या राज्यात सिंचन प्रकल्पांची संख्या ३७१२ इतकी आहे. राज्यातील नऊ जिल्ह्यात संपूर्ण दुष्काळ आहे. लातुरात रेल्वेने पाणी पुरवावे लागले. महाराष्ट्रात असे पहिल्यांदाच घडले. राज्यातील धरणात फक्त १९ टक्के पाणी साठा शिल्लक आहे तर मराठवाड्यातील धरणांनी तळ गाठला. अशा प्रकारची वेळ भविष्यात येऊ नये यासाठी ठोस नियोजनाची आवश्यकता आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दुष्काळाची दाहकता जाणवत आहे. गेल्या वर्षी झालेल्या अपुऱ्या पावसामुळे यावर्षी राज्यावर भीषण दुष्काळाचे सावट आहे.**

दिवसेंदिवस दुष्काळाचे हे सावट आणखी गडद होत चालले आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. शेतीसाठी तर सोडाच पण पिण्यासाठीही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. संपूर्ण राज्यात दुष्काळाच्या झळा जाणवत आहे. धरणातील पाणी साठा कमी होत चालला आहे. अनेक धरणे कोरडी पडली आहेत. राज्यातील धरणात वीस टक्क्यांपेक्षा कमी पाणी साठा शिल्लक आहे. अनेक गावातील पाण्याची पातळी खालावली आहे. मराठवाड्यातील काही तालुक्यात तर पाण्याची पातळी तीन ते सहा मीटरने खालावली आहे. विहिरी, तलाव, नद्यांनी तर केंव्हाच तळ गाठला आहे. एक हंडा पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. राज्य सरकारने राबवलेल्या जलयुक्त शिवाय योजनेमुळे काही गावांना दिलासा मिळाला असला तरी टँकर मुक्त महाराष्ट्र हे राज्यसरकारचे स्वप्न अद्याप साकार झाल्याचे दिसत नाही. अनेक गावात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. एकट्या मराठवाड्यात शेकडो टँकर सुरू आहेत. राज्यातील करोडो नागरिकांवर पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. पिण्याच्या पाण्याची ही अवस्था तर शेतिसाठीच्या पाण्याचे काय ? पाण्याअभावी खरिपाचे पीके वाया गेली आहेत आता रब्बीचे पिकेही धोक्यात आहेत. पोटच्या पोरासारखे सांभाळले पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना चारा छावणीचा आधार घ्यावा लागत आहे. एकूणच या दुष्काळाने शेती उद्योगच धोक्यात आला आहे. पाण्याअभावी ग्रामीण भागातील नागरिक स्थलांतर करू लागले आहेत. पाणी नसल्याने उपवर मुलामुलींचे विवाह लांबले आहेत. एकूणच या दुष्काळाने राज्याची दैनावस्था झाली आहे. हा दुष्काळ १९७२ पेक्षाही भीषण आहे असे काही जाणकार सांगत आहेत. ही परिस्थिती मागील काही वर्षात सातत्याने दिसत आहे. सर्वाधिक जलसिंचन आणि धरणे महाराष्ट्रात असूनही महाराष्ट्राला नेहमीच दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. ही जरी नैसर्गिक आपत्ती असली तरी याला आपणच जबाबदार आहोत. उपलब्ध पाण्याचा कसाही वापर करणे, पाणी वापराचं नियोजन नसणे, पावसाचं पाणी साठवण्यासाठी सहकार्य व नियोजनाचा अभाव, शेतकरी, उद्योगपती, व्यापारी, कामगार व सर्वसामान्य नागरिक यांनी पावसाच्या पाण्याच्या साठवणुकीची उपाययोजना न करणे, गरजेपेक्षा अधिक पाणी उपसा, वाळू उपसा, पाणी गळती यामुळे पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. वृक्षतोड, जंगल तोड यामुळे पर्यावरणाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला आहे त्यामुळे ऋतुचक्रही बदलले आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे



पृथ्वीचे तापमानही वाढत चालले आहे. यावर्षी आपण त्याचा अनुभव घेतला आहे. जगातील सर्वात उष्ण शहरात देशासह राज्यातील काही शहरांचा समावेश होऊ लागला आहे. यावर्षी आपल्या राज्यातील सर्व शहरांचे सरासरी तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस इतके होते. दिल्ली राजस्थान येथील तापमानाच्या पाऱ्याने तर पन्नाशी ओलांडली आहे. चुकीच्या पीक पद्धतीमुळे जमिनीचा पोत कमी होऊ लागला आहे. लोकसंख्या जरी वाढत चालली असली तरी पाण्याचे साठे मर्यादित आहेत त्यामुळे पाण्याची टंचाई कायम जाणवत राहणार आहे. पाण्याचा वापर, पाण्याची साठवण आणि जिरवण आणि पुनर्भरण याबाबत आपण आज जर सावध झालो नाही तर आपल्याला भविष्यात खूप मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल एवढं निश्चित. इस्त्राईल सारखा छोटा देश अत्यल्प पाण्याचे नियोजन करून समृध्द बनू शकतो तर आपण का नाही ? इस्त्राईल पेक्षा आपल्या देशात खूप जास्त पाऊस पडतो. या पावसाच्या पाण्याचा संचय हा दुष्काळावर उपाय ठरू शकतो. त्यासाठी जलसंधारण योजना आखणे व ती पूर्णत्वास जाणे गरजेचे आहे. पावसाच्या पाण्याचा एक थेंबही वाया न जाऊ देता ते पाणी वाचवायला हवे. त्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगचा वापर करायला हवा. केवळ मोठ्या इमारतीतच नव्हे तर लहान घरातही विशिष्ट तंत्र वापरून पाणी साठवता येऊ शकते. सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, अस्थापने, दुकाने, बँका, सहकारी गृहनिर्माण सोसायट्या यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करायला हवे. वाढती वृक्षतोड थांबवून जास्तीतजास्त वृक्षलागवड करायला हवी. लावलेली वृक्ष जगवायाला हवे. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना एक वृक्ष लावायला देऊन त्याची वाढ करायला सांगावी. हवे तर यासाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यात यावे. चुकीच्या पीक पद्धती बदलायला हव्यात. ऊस, केळी यासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना ठिबक सिंचन सक्तीचे करायला हवे. श्रमदानातून जलसंधारणाची कामे करून जनतेचे प्रबोधन करायला हवे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालायला हवा. दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीला आपणच जबाबदार असल्याने तिच्यावर मात करण्यासाठी सर्वांनी हातात हात घालून काम करायला हवे. दुष्काळ निवारण ही केवळ सरकारची जबाबदारी नसून ती आपल्या सर्वांचीच आहे. दुष्काळ निवारण्याच्या सरकारच्या प्रयत्नास आपण सर्वांनी साथ दिल्यास या भीषण आपत्तीवर मात करता येऊ शकेल.

# हरवलेल्या गप्पा



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

आधुनिक केसरी

**गप्पा ..... कट्ट्यावरच्या गप्पा , कॅन्टीन मधल्या गप्पा , कॉलेजच्या बंक क्लासमध्ये मारलेल्या गप्पा, कधी कुणाच्या गच्चीवर बसून मारलेल्या निवांत गप्पा , तर कधी मित्रांच्या टोळक्यातील गप्पा .... या गप्पा नेहमीच हसत्या खेळत्या वातावरणामध्ये असायच्या. हलक्या फुलक्या असायच्या कधी अवचित कोणाच्या डोळ्यातून सहज पाणी निघून जायचं . तर कधी सहज बोलता बोलता मन मोकळे व्हायचे . एकमेकांसोबत झालेले असे कित्येक क्षण या गप्पांमध्ये उलगडून यायचे . बंधन नव्हतं या गप्पांना. वेळ काळाचे बंधन नव्हतं , या गप्पांना विषयाच बंधन नव्हत , ना राग लोभाच.**

कसलच बंधन नव्हतं. या गप्पा कधी हमरी तुमरी वर यायच्या , तर कधी एकमेकांची टांग खेचण्यात पुढे जायच्या . पण गप्पा या मनमोकळ्या व्हायच्या , हसत खेळत व्हायच्या आणि वातावरण हलकं फुलक करत राहायच्या . संबंध अधिक दृढ करायच्या . तर कधी संबंधाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवायच्या . पण आताशा या गप्पाच कुठेतरी हरवल्यासारख्या वाटत आहेत . शाळेमध्ये असताना शालेय पातळीवरच्या गप्पा व्हायच्या . मोठा झाल्यावर मी अस करिन तस करीन , हा असा तो तसा , अशा लहान लहान गप्पा चालायच्या . महाविद्यालयात गेल्यानंतर महाविद्यालयाच्या कॅन्टीनमध्ये तासान तास गप्पा रंगायच्या . कधी कोणाच्या मैत्रिणीच्या , कधी कोणाच्या प्रेयसीच्या , तर कधी कुणाच्या सामान्य परिस्थितीच्या सुद्धा , आणि कधी कोणाच्या गर्भ श्रीमंतीच्या सुद्धा . आवडणारे सर मॅडम यांचाही गप्पांमध्ये समावेश असायचा . हेवेदावे नव्हते या गप्पांमध्ये , ना एकमेकांबद्दलची असूया होती. होतं ते फक्त गप्पांचा फड . निव्वळ गप्पा गप्पा आणि गप्पा . काळाच्या ओघात मात्र आता या गप्पा कुठेतरी हरवलेल्या आहेत . भौतिक समृद्धी वाढायला लागली आणि पाहता पाहता गप्पांचे हे कट्टे , गप्पांचे हे फड किंवा ओसरी आता रिकाम्या रिकाम्या दिसू लागल्या आहेत . ओस पडल्यागत जाणवत आहेत . गाव खेड्यांमध्ये पारावर बसून गप्पा व्हायच्या , तर कधी कुणाच्या शेतात बसून गप्पा व्हायच्या . हिवाळ्यात शेकोटी भोवती रंगलेल्या गप्पांची मजाच काही और असायची . या गप्पा अनेकांच्या घरातल्या , बाहेरच्या , वैयक्तिक आयुष्यातल्या , सार्वजनिक जीवनातल्या , बरेचदा राजकीय आणि कधी कधी सामाजिक क्षेत्रातल्या सुद्धा गप्पा या एका वेगळ्या उंचीवर जायच्या. पण आता या गप्पांसाठी कुणाकडे वेळच उरलेला नाही असं दिसतंय . आता गप्पान ऐवजी वाढलंय



ते फक्त चॅटिंग .पण या चॅटिंग मध्ये तो ओलावा उरलेला नाही, या चॅटिंग मध्ये ती माया उरलेली नाही , ती आपुलकी , तो स्नेह , ती चेष्टा मस्करी कुठेतरी आटल्यासारख जाणवायला लागलय . कारण आभासी विश्वातले चॅटिंग आता एका क्लीक वर डिलीट होतं किंवा ऑल क्लिअर केलं जातं .पण गप्पा मात्र अशा नसायच्या . गप्पा या आजही अनेकांच्या हृदयाच्या गाभाऱ्यात आहेत . गप्पांनी अनेकांच्या मनांचे कोपरे आजही ओले आहेत . अनेक ठिकाणी गप्पांनी डोळ्यांच्या कडा ही तितक्याच पाणावलेल्या आहेत. हे सगळं आभासी जगतातील चॅटिंग मध्ये दिसत नाही. आधी माणसं पाई चालायची कोणी भेटली ओळखीची तर थांबून एकमेकांची चौकशी व्हायची. गप्पा व्हायच्या, असेल जवळ टपरी तर चहा व्हायचा नी निरोप घेतला जायचा . म सायकल आली . भेटलाच कोणी ओळखीचं तर थांबून दहा मिनिटं गप्पा व्हायच्या . म गाड्या आल्या , बाईक आल्या म थांबणं कमी झालं , हात हालावून निघायला लागलो आपण विरुद्ध दिशेने असलो तर ,सोबत असलो तर गाडीवर जाता जाताच गप्पा करू लागलो . आता चारचाकी आल्या आहेत तर ग्लास बंद करून एसी सुरू करून आपल्याच गुर्मीत , आपल्याच थाटात एकटेच जायला लागलोय आपण . भौतिक समृद्धी जसजशी वाढायला लागली तसतस अलिप्त व्हायला लागलोय आपण समाजापासून , लोकांपासून . गप्पा दूरच राहिल्यात आता. मला आठवत आमच्या घरी माझे मित्र येऊन बसायचे . सायंकाळी स्लॅब वर चटई , सतरंजी टाकली की या गप्पा माझ्या वडिलांनी किंवा आईनी आवाज दिल्याशिवाय थांबायच्या नाहीत . झाल्या नाही का रे तुमच्या गप्पा ? गप्पानीच पोट भरणार आहेत का आज ? हे माझ्या वडिलांचे शब्द ऐकले की मित्र म्हणायचे आता आम्ही काय सांगू आमच्या काय गप्पा चालल्या आहेत ? आणि म आम्ही सगळे खळखळून हसत हसत खाली उत्तरायचो . मध्ये तर आम्हाला रेल्वे स्टेशन वरच जाऊन बसायची सवय लागली होती . सगळ्यात शेवटच्या बाकावर जाऊन बसायचो नि गप्पांचे फड असे रंगायचे की आम्ही कुठच्या कुठे फिरून पण यायचो . सगळं प्लॅनिंग तिथेच करायचो . जाणं न जाणं हे नंतर . पण गप्पांनि मात्र आम्ही शेगाव , शिर्डी , गोवा , केरळ सगळं फिरून यायचो . एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा मिळायची , आनंद मिळायचा जगण्याला या गप्पांमधून . इथेच मित्रांच्या डोळ्यातलं पाणीही आम्ही पाहिलंय नि इथेच सावरलय आम्ही एकमेकांना बरेचदा . आज सगळेच स्थिरावलेत आपापल्या परिवारात . या गप्पांची शिदोरी घेऊन. आताशा या गप्पाच होत नाहीत . भेटीत तो ओलावा आता जाणवत नाही . तो निवांत वेळ, ती मोकळीक, ते हास्याचे फवारे आता नाही जाणवत. आजच्या कॉलेज मधील मुलांमध्ये मोबाईल च फॅड इतकं वाढलंय की बदलत्या काळाबरोबर त्यांनी या सहज साध्य गोष्टी हिरावून घेतल्या आहेत आजच्या तरुणाई पासून अस वाटतं. कित्येकदा या गप्पांनी मनावरचं ओझं कमी व्हायचं , जगण्याला एक नवी दिशा मिळायची या गप्पांमधून , कित्येक प्रश्नावर सहज बोलता बोलता उत्तर सापडायची , अनेकांचे छुपे राज या गप्पांमधून उलगडायचे . या गप्पा ना काही वेगळंच रसायन असायच्या त्या काळी . आभासी विश्वातील आजच्या भौतिक समृद्धीच्या या काळात आपण सगळेच या गप्पांपासून दुरावलोय अस नाही वाटत ?? की घाबरतोय आज आपण या अशा गप्पांसाठी की कुठं बोलण्याच्या ओघात अश्रू तर निघणार नाहीत ना ? नि म ते पाहून लोक काय म्हणतील याची पण भीती ?? टाळतोय का आपण आजकाल या गप्पांना ? विचार करा . जमल्यास मारा परत एकदा निवांत गप्पा आपल्या मित्र मैत्रिणी सोबत . होऊ द्या कवाडं मोकळी हृदयाच्या गाभार्याची . कदाचित ऑपरेशन थेटर मध्ये डॉक्टरांना उघडावी लागणार नाहीत तुमच्या हृदयाची दार चाकु कैचीने. गप्पांच्या माध्यमातून मित्रच कदाचित रफू करून टाकतील.. बघा पटतंय का ....

# आजोळ



प्रा. माया सूर्यकांत मुळे
9423342097

आधुनिक केसरी

**परीक्षा संपून सुट्टी लागली की, ओढ लागायची ती आजोळी जायची. त्यादरम्यान आजोळाहून कुणी येतंय का ज्याच्या सोबत आपल्याला जाता येईल याची हुरहूर लागून रहायची. अन जो कुणी आजोळहून येईल त्यासोबत येष्टीत बसून पळती झाडे पाहत मामाच्या गावाला जायचं. सुट्टीचा एक दिवस ही वाया जाऊ नये एवढाच ध्यास मनी असायचा.**

सगळी भावंड सुट्टीत आजोळी एकत्र यायची. जवळपास दीड महिना शाळेला सुट्टी असायची. अन सुखाचा काळ! जगण्याचा उत्सव होऊन जायचा. घरी पोचल्या पोचल्या मोठ्या मामी शिळ्या भाकरीचा टुकडा ओवाळून टाकायच्या (का? ते..अजून याचं कोड उलगडलेलं नाही) आणि आलामाला घेऊन कुशीत घ्यायच्या. हे सुख म्हणजे परमानंद असायचा. दिवसभर मामाच्या मळ्यात नुसती धम्माल चालायची. काठोकाठ भरलेली विहीर, मोठ्या पाईपातून फेसाळणारं पाणी दिवसभर पाटांतून वाहायचं अन वाट्टेल तेव्हा त्यात डुबक्या मारायच्या, तासनतास त्यात पोहत रहायचं तर सूर मारून पोहणारी मंडळी विहिरीत तळापर्यंत डुबक्या मारण्याच्या शर्यती लावायची. आम्ही आपलं काठावर बसून टकामका बघायचो अन पाटातल्या पाण्यातचं खूश!कसला उकाडा, कसला उन्हाळा न काय!? हराळी ने दाटलेल्या, पाण्याने तुडुंब भरलेल्या बांधावरून सगळ्या मळ्यात फिरायची मौज भारीच होती. माळव्यासाठी, जनावरांच्या घासासाठी राखलेली रानं हिरवीगार दिसायची (दिवसा त्यात लपाछपी चा खेळ चलायचा) तर नांगरलेली रानं काजळ लावल्यासारखी काळीभोर दिसायची. तिन्हीसांजेला त्या रानात विट्टी-दांडूचा खेळ रंगायचा. दुपारचं सगळ्या मामी उन्हाळंकामं करण्यात दंग असायच्या झाडाच्या सावलीत शेवया, नकुले, बोटवे, फणूले, हातशेवया गाणी गात, आनंदात व्हायचं सारं. असे संस्कार झालेलं अन्न किती रुचकर लागायचं. हे करता-करता झाडाच्या सावलीत भाकर-खायची गोळ्यामेळ्याने. आज्ज्या-माम्या मायेने खाऊ घालायच्या.. कितीतरी जिन्नस असायचे खायला ( भाकरी, मोकळ्या भाज्या, कालवण, मिरचू, लोणचं, कांदा, दही-ताक तोंडी लावणं इत्यादी) आत्मा तृप्त व्हायचा! अन कुणी सावलीत, कुणी कोट्यात खिनभर अंग टाकायचं तोवर आम्ही केळीचे कमळ तोडून, लिंबुळ्या, तुराट्या, रानात जे मिळलं ते गोळा करून खेळ मांडायचा मोठ्या भावंडांच्या देखरेखीत.




पुन्हा मावळतीला घरी आल्यावर तुळशीपुढे दिवा, दारावर राकेलची चिमणी किंवा खंदिल; झाली दिवेलागण; एवढाच काय तो उजेड! मग चुलीवरचा चहा, अंगणात गप्पा, इस्त्यावर भाजलेल्या पापड्या- शेंगदाणे सोबत. मग निवांत जेवणं; चिमणीच्या उजेडात. (कँडल लाईट डीनरचा शोध बहुधा हाच असावा!) रात्री आजोबा तासनतास गोष्टी सांगायचे. आज्ज्या-माम्या, मामा मिळेल त्याच्या मांडीवर निजून सारं ऐकायचं. बऱ्याचदा गोष्ट नसली की आज्जी किंवा मामी वाकळ शिवत, दोरवाती वळत आणि कितीतरी गाणी गायच्या कधी डोळा लागला तो सकाळ झाल्यावर रेडीओ च्या आवाजाने जाग यायची. (सगळ्या थेरपीज् आपल्या संस्कृतीतचं होत्या हे आता कळतंय) पाववाला आला की आठआणे मिळवण्यासाठी धांदल उडायची. त्यात एक पावकांडी यायची चहा सोबत खातांना किती आनंद व्हायचा. चुलीत वांगे-बटाटे भाजून तेल-चटणी अन गरम भाकर खायची काय ते सुख असायचं! पापड्या-कुरवड्याचा चीक गरमागरम खायचा. पुन्हा गावात फेरफटका काहीतरी आणायला; कामानिमित्त सारा गाव धुंडाळून यायचं. (कोण काय करतंय? नेमकं गाव कस आहे?ते पहायची तीव्र इच्छा असायची)कुठली मनोरंजनाची साधनं नव्हती, मोठं-मोठी दुकानं, बाजारपेठा नव्हत्या तरी किती करमायचं! दिवस पुढे सरकायचे शाळा सुरू होण्याची बातमी कळायची आणि मन भरून यायचं आजोळ सोडून येतांना. सगळी नाती-गोती, प्रेम, माया मनात भरून जडावल्या पावलांनी पुन्हा येष्टी धरायची आणि हुंदके देत खिडकीतून साऱ्यांचा निरोप घेऊन ओढ परतायची पुढच्या सुट्टीच्या आशेने. पळणारी झाडं आता गहिवरून जायची! आजोळ मागे पडून आता आयुष्य खूप पुढं निघून गेलं. कित्येक पिढ्यांचा हुंदका मात्र अजूनही गोठलेला आहे आजोळात!

# जागतिक पर्यावरण दिन

आधुनिक केसरी

"शेत बघा आलया राखणीला सोन्याचं घुंगरू गोफणीला" किंवा "धरणी माता येईल आता नेसून हिरवं लेणं रं लेणं गाऊ मोटं वरचं गाणं " किती सुंदर गाणी आहेत ही शेतवरची अशी हिरवीगार शेतं आता कमी बघण्यात येतात. आपण खूप वर्षापूर्वी एक जाहिरात बघायचो



प्राजक्ता पाटील
9021335510

दूरदर्शनवर एक छोटी मुलगी रोप लावत असते. रोप आणि मुलगी दोन्ही हळू हळू मोठे होतात .मुलीला पहायला पाहुणे येतात. नवरा मुलगा मुलीला पसंत करतो आणि म्हणतो ,"ही नुसती लक्ष्मी नाही, वनलक्ष्मी हाय वनलक्ष्मी. अशा कितीतरी सुंदर जाहिराती आपण पहिल्या. आत्ता नुकतीच एक जाहिरात पाहिली त्यात मुलगा "JACK AND JILL" कविता म्हणत असतो प ण कवितेत ते दोघे पाणी आणायला जातात पण त्यांना कोठेच पाणी भेटत नाही . खऱ्या कवितेत आडाचे पाणी शेंदत असतात "पण सॉरी कवितेत आता बदल करावा लागेल कारण कोठे पाणीच मिळणार नाही. 5जुन 1972 संयुक्त राष्ट्र महासभेने घोषित केली आणि तेंव्हा पासून जागतिक पर्यावरण दिन साजरा करायला लगलो .यावर्षीची घोषणा आहे "माझी जमीन,माझे भविष्य " आणि थीम आहे 'जमीन पुनर्संचयित करणे,वाळवंटीकरण आणि दुष्काळी प्रतिकारशक्ती' रस्ते बांधतांना विकास होतो पण जी दुतर्फा झाडांची कत्तल होते. त्यामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होते. जमिनीची धूप



होते .पाऊस पण कमी पडतो. वृक्षांची पुनर्लागवड केली जातं नाही. अगदी अल्पशी केली तरी जोपासली जात नाही .रस्ते बांधताना झाडे मुळासकट उपटून दुसरीकडे लावायचे तंत्रज्ञान असताना का वापरले जात नाही याचा जाब विचारण्या एवढी जनता जागरूक नाही. प्रत्येकाने दरवर्षी एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करणे अनिवार्य आहे ,खूप खूप गरजेचे आहे. दिवसेंदिवस वाढत जाणारे जागतिक तापमान आणि सौर वादळ पर्यावरणाचे संतुलन ढासळण्याचे परिणाम आहेत. उष्माघाताने मरणारांची संख्या वाढत आहे .ती वरचेवर वाढत जाणार. आपण झाडं तोडून पर्यावरण साखळीच नष्ट करत आहोत .जंगलतोड करताना .रस्ता रुंदीकणासाठी वृक्षतोड करताना आपण विचारच करत नाहीत .तिथली पाखरे कुठे गेली असतील ,त्यांना काय खायला मिळत असेल. घरटी कुठं बांधतील, प्रजनन कुठं करतील. ही अन्न साखळी नष्ट करून आपण उपद्रव ओढवून घेवू. कीटक, आळ्या खाणारे पक्षी जातील तर पिकांना त्रास होईल. मोठे पक्षी नसतील तर उंदीर घुशी वाढतील. शाकाहारी प्राणी काय खातील पुरेसा चारा नसेल तर. मानव तरी धान्य साठवतो ते काय करतील ?त्यांच्यावर अवलंबून असणारे मांसाहारी प्राणी काय खातील. जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होईल जमीन पडीक व नापीक होईल .सगळं पोषण मुली वाहून जाईल .दुष्काळ पडेल. पृथ्वीवर खूप मोठ्या प्रमाणात पाणी आहे असे वाटत असले तरी प्रत्यक्षात ते उपयोगात येणारे नाही. जे आहे ते खूपच थोडे आहे आणि आपण ते ही जपून वापरत नाहीत. मोठे कारखाने नद्यांचे पण घाण करत आहेत त्यांना पाणी शुद्ध करणे सक्तीचे करायला हवे. पृथ्वीवरचा पर्यावरणाचा समतोल राहिला तर दुष्काळ पडणार नाही. सुपीक जमिनीचे वाळवंट होणार नाही. पाऊस व्यवस्थित पडेल. मग आपण म्हणू **श्रावणात घननीळा बरसला रिमझिम रेशिम धारा उलगडला झाडातून अवचित हिरवा मोर पिसारा.**

# जननायक बिरसा मुंडा

आधुनिक केसरी

आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली.

# अश्रू....

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 52

दुसऱ्यांचे अश्रू पुसता आले पाहिजे आणि आपल्यामुळे कोणाच्या डोळ्यात अश्रू येऊ नये. कधीकधी काही घटना अशा घडतात की डोळ्यातून एकही थेंब अश्रू येत नाही. पण हृदय मात्र सतत रडत असतं. जेव्हा हृदय रडतं तेव्हा डोळे कोरडे होतात. खरंतर अधून मधून रडलंच पाहिजे. रडल्याने मन हलकं तर होतच. पण हृदय सुद्धा मोकळं होतं. हार्ट अटॅकचा धोका कमी होत असावा. रडलं पाहिजे म्हणजे मग उठसुट केव्हाही डोळ्यात पाणी नको .सतत रडल्याने अश्रूंची किंमत पण कमी होते. आणि डोळ्यावर पण परिणाम होतो. डोळ्यातील अश्रू इतकेही स्वस्त असू नये की समोरच्याला त्याची काहीच किंमत नसावी. जेव्हा एखाद दुःख वेदना खूप अनावर होतात तेव्हा डोळ्यातून अश्रू आपोआप गालावर ओघळतात. लहान बाळाला जेव्हा भूक लागते तेव्हा ते सहज रडतं. पण त्याला जेव्हा काही वेदना होतात तेव्हा मात्र रडताना त्याच्याही डोळ्यातून अश्रू येतात. त्याच्या डोळ्यातील पाणी आईच्या हृदयाला भिडतं. तिला आपल्या लेकराचे अश्रू पाहून अतोनात दुःख होतं. अश्रू हे कधी आनंदाचे असतात तर कधी दुःखाचे. पण अश्रूंना हे माहीत नसतं की आपण दुःखासाठी वाहतोय की सुखासाठी वाहतोय. वाहणे हा त्याचा धर्म आहे. रडल्यावर मात्र रडणारी व्यक्ती थकते .अश्रूंचा अर्थ शोधता आला पाहिजे. "शोधला तर अर्थ आहे नाहीतर नुसताच स्वार्थ आहे. अश्रूंना मोल असावं. गालावरून अश्रू ओघळला म्हणजे त्या थेंबाचा मोती होतो. डोळ्यातील एक थेंबाचा अर्थ कळावा. खोटे आसू आणि खरे आसू ओळखता आले पाहिजे. काहीजण डोळ्यात खोटे अश्रू आणून दुसऱ्यांना फसवतात. खरंतर दुःख हलकं करण्याचा अश्रू हा उपाय आहे. पण रडणं ही कमजोरी समजू नये. कोणी रडकं म्हणू नये. स्त्रियांच्या डोळ्यात पटकन पाणी येतं. कारण त्या जास्त संवेदनशील व भावनात्मक असतात. झाडे देखील अश्रू गाळतात .ती सुद्धा रडतात. त्यांच्या खोडातून बाहेर पडणारा चीक हा त्यांचे अश्रूच असतात. कैरी तोडली असता तिच्यातून सुद्धा खूप चीक निघतो. झाडापासून तिला आपण तोडतो म्हणून ती रडते. झाडे कैरीचे आई-वडील आहेत .आणि पूर्ण आंबा होण्याआधीच जर आपण तोडले तरच ती रडते. बरीच फळे, फळभाज्या ,पालेभाज्या तोडल्यानंतर चीक किंवा पाणी बाहेर येते ,अश्रूच आहेत ते . बारकाईने पाहिले तर लक्षात येईल. काहींचे अश्रू घळाघळा गालावरून ओघळतात. दोन दोन धारा लागतात. तर काहींच्या फक्त डोळ्यांच्या कडा पाणवतात. शेवटी अश्रूच ते... मनसोक्तरडा... मोकळं व्हा ... गरजेच असतं.....



# गुरुत्व प्राप्त होण्यासाठी लघुत्व अंगिकारावे लागते

आधुनिक केसरी

**गुरू होणं हे एवढं सहज सोप नसतं त्यासाठी सुक्ष्म अति सुक्ष्म जीव देखील वंदनीय आहे याची प्रचिती कृतीतून दिसली पाहिजे.लहानपणा स्वीकारणं हा सर्व श्रेष्ठ गुण तर आहेच पण वास्तविक जो मोठा असतो तो नेहमी स्वतःला लघु समजतो हे मोठेपणा असणाराच खरं वैशिष्ट्य असतं. जगातील सगळ्यात अवघड व कठिण गोष्ट साध्य हिच आहे कि स्वतः ला लहान समजण्यासाठी फार कोणीही तयार नाही.मुळात स्वतःकडे लहान पणा घेऊन इतरांना श्रेष्ठ समजणं हेच ज्ञान गुण असण्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे.**

इतरांकडे पाहताना आपला दृष्टिकोन हा विशालकाय ठेवून पाहता आलं पाहिजे.इतरांच्या मध्ये आपल्याला सर्व उत्कृष्टच दिसलं पाहिजे त्यांचं बरोबर इतरांन कडे , असणारे सद्‌गुण



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

,विद्वत्ता, मोठेपणा पाहण्याची दृष्टी, दिव्यता , शक्ति ,मनाचा मोठेपणा ह्या मध्ये निर्माण होणं हिच आपली खरी प्रगती असते मात्र आपण जीवनात हिच प्रगती करत नाहीत. जेव्हा हि प्रगती आपण करू शकु तेव्हा मात्र आपण जगातील सगळ काही मिळवलं असंच म्हणावं लागेल. तसं पाहिलं तर आजही आपल्या ग्रामीण भागात जुनी जानती माणसं या संदर्भात बोलताना संदर्भ देतात कि हत्ती होऊन लाकड फोडण्या पेक्षा मुंगी होऊन साखर खाता आली पाहिजेत पण अनेकदा हे आपल्या डोक्यावरून जात.मुळात इतरांना मोठेपणा देणं हे उत्तम पुरुषाच लक्षण आहे.परंतु हेच उत्तम पुरुषांच लक्षण सध्याच्या युगात प्रत्यक्षात फार कोणीही आचरणात आणताना दिसत नाही. हि खुपचं खेदजनक बाब आहे. उलट पक्षी खोट्या आणि बेगडी प्रतिष्ठेसाठी भौतिक मोठेपणाची झुल पांघरूण खोटी प्रतिमा लोकमनावर बिंबवण्यासाठी व स्वतः चा मोठेपणा सिद्ध करण्यासाठी अहोरात्र बैचेन , मग्न व्यस्त ,असलेली आणि भौतिक मोठेपणा हा जणुकाही एखाद्या आजार आहे. या पद्धतीने वावरताना दिसणारी माणसं सध्या आपल्या आजुबाजूला इतरत्र बहुसंख्य वावरताना दिसतात. हा वेळेचा काळाचा प्रभाव आहे. आणि म्हणून याच कालखंडात जर आपल्याला आपल्याला स्वतःला लहान समजता आलं तर आपल्या साठी जगातील अशक्य असे कहीच नाही.आपल्या सोबत ,सहवासात, आजुबाजूला,किंवा विरोधात कोणीही व्यक्ती समाज घटक असु द्या समोरच्याला मोठेपणा देऊन आपल्या स्वतः कडे लघुत्व घेण हे जीवनातील सगळ्यात मोठं कौशल्या आहे आणि हेच कौशल्य सगळ्यांकडे उपलब्ध असल पाहिजे पण असं होतं नाही लघुत्व या गुण कौशल्याचा वापर कसा करायचा आहे हे मात्र व्यक्ती परत्वे वेगवेगळे भिन्न असल्यामुळे त्याचा परिणाम देखील तसाच येतो आहे. लघुतव हि चुंबकीय शक्ती आहे ज्यामुळे आपण अनेक शक्य नसतील अशा बाबी शक्य करू शकतो.त्याच बरोबर हि चुंबकीय शक्ति आपण योग्य पद्धतीने वापरली तर आपण जगातील कोणालाही आपल्या कडे खेचु शकतो पण तितका मनाचा मोठेपणा आपल्या कडे असला पाहिजे.आणि तो प्रकट देखील झाला पाहिजे. वास्तविक सध्याचं युग हे भौतिक मोठेपणाला भुलेल अस जग आहे.असं जरी म्हटलं तरी ते वावगं ठरणार नाही.खोटा मानपान ,प्रतिष्ठा या साठी लोक कुठल्याही स्तरावर जाण्यासाठी तयार आहेत असंच एकंदरीत वातावरण निर्माण झालेलं आपण पाहतोय. आणि सध्या जी परिस्थिती आपण अनुभवतोय याच्या मधुन एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती हि कि दुस-याला मोठेपणा बहाल करण्याचा मनाचा मोठेपणा आज लोप पावत चाललेला आहे. प्रत्येक व्यक्ती मी कशाप्रकारे मोठा आहे याचं विश्लेषण करण्या मध्ये तसेच दाखवण्यात दंग आहे. त्यासाठी अनेक असे नानाविध प्रयोग देखिल करताना अनेक जण दिसतात तसंच इतर लोकांनी मला मोठं म्हटलं पाहिजे.माझी स्तुती केली पाहिजे. अशी जवळपास प्रत्येक व्यक्ती ची धारणा आहे.त्या साठी वाटेल ते करण्याची मानसिकता आहे.पण स्वतः कडे लघुतव ठेवण्याचे संस्कार आणि प्रवृत्ती खुप कमी लोकांच्या कडे दिसते आहे.आणि ज्याला स्वतः कडे लघुतव ठेवण्याचे कार्य जमलं त्याने जगातील सर्वकाही मिळवलं लघुतव स्वतः कडे ठेवणं हि सर्वसाधारण गोष्ट नाही एक प्रकारची साधना तप आहे पण हि तप हि साधना ज्याला अर्जित करता येईल त्याला या सृष्टीवर दिव्य दृष्टी प्राप्त झाली म्हणून समजा ज्याच्या कडे हि शक्ती आहे त्याला या जगात ,सुख काय,दुःख , काय, वेदना, काय संकटं अडचणी समस्या,असणार नाहीत.उलट संबंध सृष्टी वरील शक्ति उर्जा त्याच्या साठी सकारात्मक असेल. आणि सृष्टीवरील कुठलही कार्य, कर्म निर्विघ्नपणे पुर्ण करण्याची ताकद शक्ती निर्माण होण्यासाठी स्वतः कडे लघुत्व ठेवता आलं पाहिजे.हि अद्‌भुत किमया साधली तर मग जगात आपल्यासाठी कोणतीही समस्या अडचण राहत नाही हे मात्र नक्की आहे.

# कष्टाची कमाई श्रेष्ठ

आधुनिक केसरी

एका गावात दोन चोर राहत होते. ते प्रत्येक दिवशी चोरी करत आणि आलेले धन तीन हिस्से मध्ये वाटून घेत. आपापला हिस्से स्वतःसाठी व एक हिस्सा ईश्वराला ठेवतात.असे खूप दिवस चालत होते .एका रात्री ते चोरीसाठी दुसऱ्या गावात निघाले. बरीच वेळ भटकंती करूनहीसुद्धा त्यांना काही चोरी करण्याची संधी मिळाली नाही.ते दोघेही थकून एका मंदिरात बसले. तेथे त्यांना एक साधू संत मादिरामध्ये झोपलेले दिसले. त्यांनी संताला उठवले व म्हणाले कि काही असेल तर द्या नाही तर मारून टाकले जाऊ. संताने त्यांना विचारला तर त्या चोरांनी सांगितले कि आम्ही चोर आहोत.आम्ही चोरी करतो .हे ऐकून संत म्हनाले, तुम्ही करता ते चांगलेआहे की वाईट याचा कधी विचार केला ? चोर म्हणाले," आम्ही चांगलेच करतो कारण आम्ही चोरी करून जे धन मिळवतो ते आम्ही तीन हिस्से मध्ये वाटतो. एक एक भाग आम्ही घेतो आणि तिसरा भाग ईश्वराला चरणी अर्पण करतो.

हे सगळे ऐकल्यावर संत त्यांच्या जवळील एक जिवंत कोंबडा काढला आणि त्यांना दिला व म्हणाले "आज तुम्ही काहीही चोरी करू शकले नाहीत त्यामुळे तुम्हीला हा कोंबडादेऊ शकतो बाकी माझ्याकडे काही नाही.पण आता चोरापुढे प्रश्न पडला कि आता याचे हिस्से कसे करायचे. ते दोघेही चोर आश्चर्यचकित झाले. संताने त्यांना आशय समजावून म्हाणाले कि चोरी हा जगण्याचा पर्याय नाही. तुम्ही कष्टाची कमाई करून त्यातील एक हिस्सा ईश्वरचरणी ठेवा. ते खरे सार्थक आहे .हे सगळे म्हणणे त्या चोराला पटले आणि ते दोघेही संताला नमस्कार करून चोरी सोडून द्यायचा निर्णय करून तेथून निघून गेले.

लय भारी
# सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

लस्सी हा प्रकार भारतातील पंजाब येथे प्रथम सुरु झाला. अजूनही तिथे वर्षभर लस्सींचे विविध प्रकार आनंदाने बनवले जातात. पाहुण्यांचे स्वागत आपल्याकडे चहा, कॉफीने करतात तसे तिथे लस्सी, छाच म्हणजेच ताक यांनी करण्याची पद्धत आहे. साधी लस्सी तर आपणही बनवतोच पण उन्हाळ्यात आंब्याच्या खास सिझनमध्ये ही स्पेशल लस्सी करून पहाच..सर्वजण तृप्त, खुश होऊन नक्कीच प्रशंसा करतील .करूया ना मग सुरुवात ?

**साहित्य :** 2 कप आंब्याच्या फोडी ,2 कप स्वीट, घट्ट दही, अर्धा कप फ्रेश क्रीम किंवा व्हीप्ड क्रीम , 7..8 वेलदोडे , 7..8 केशर काड्या ,2..3 चमचे साखर , 2..4 आईस क्युब्ज.

**कृती :** प्रथम दिड कप आंब्याच्या फोडी मिक्सरमध्ये घालून व्यवस्थित फिरवून घ्याव्यात. बाकीच्या फोडीन्चे बारीक तुकडे करावेत. आता मिक्सरमधील आंब्याच्या पल्प मध्ये दही , 2 चमचे साखर व वेलदोडे सोलून घालावेत व 2 आईसक्युब्ज घालून मस्त ब्लेंड करावे. आता काचेच्या ग्लासमध्ये हे मिक्सरमधून ब्लेंड केलेले घालून त्यावर आंब्याच्या फोडींचे तुकडे घालावेत. आता थोडे आईसक्युब्ज व 1 चमचा साखर घालून व्हिप्ड् क्रीम किंवा फ्रेश क्रीम ब्लेंडरने व्यवस्थित भरपूर फेटून हलके झाल्यावर ग्लासमध्ये घालावे . शेवटी त्यावर केशर काड्या घालून सजवावे .आवडत असेल तर ड्रायफ्रुट्सचे पातळ काप घालावेत व थंडगार सर्व्ह करावी. **वैशिष्टय :** ही स्वीट मँगो लस्सी दिसायलाही तितकीच स्वीट दिसते . वरून मँगो आईस्क्रीम घातल्यास आणखी मज्जा येते . मधूनच लागणारी आंब्याची फोड लज्जत वाढवते तर क्रीममुळे वेगळाच रिचनेस येतो . ही लस्सी घट्टसर असते त्यामुळे लगेंच पोट भरते .उपवासासाठी तर ही एक पर्वणीच आहे . लहानापासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच आवडेल .उन्हाळ्यात जेवण ,मसाल्याचे ,गरम पदार्थ खाणे नकोसे होते . अशावेळी लगेच पोटभरण्यासाठी थंडगार , टेस्टी स्वीट लस्सी हा उत्तम पर्याय आहे. याचप्रमाणे स्ट्रॉबेरी, बनाना, चिकू, सीताफळ, पपई , खरबूज, अननस ...अशा विविध आवडेल त्या फळाची आपण लस्सी बनवू शकतो. सर्वच लस्सी एकापेक्षा एक स्वादिष्ट.



## स्वीट मँगो लस्सी विथ फ्रेश क्रीम

# शिवराज्याभिषेक दिन हा बहुजनांच्या स्वातंत्र्यतेचा दिवस

## अनिता काळे : मराठा समन्वय परिषद व मराठा सेवा संघाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज




**अहमदनगर :** मराठा समन्वय परिषद व मराठा सेवा संघाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जय भवानी... जय शिवाजी! च्या घोषाने परिसर दणाणले.

या अभिवादन सोहळ्याप्रसंगी मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे, माजी महापौर शिलाताई शिंदे, अलकाताई मुंदडा, जयश्री पुरोहित, संपूर्णा सावंत, सुरेखा कडूस, शोभाताई भालसिंग, आशा गायकवाड, कमल खेडकर, शोभा कांबळे, संगिता घोडके, प्रतिभा भिसे, नंदिनी गांधी, कमल खेडकर, शिवानी कर्डिले, सतीश इंगळे, उदय अनभुले, श्रीकांत निंबाळकर, अभियंता मनोज पारखे, पै. नाना डोंगरे, सुनिल सकट, सतीश बनकर, केशव हराळ, रिजवान शेख, अमोल लहारे, भिमराज कानगुडे, बापू साठे, विजय नवले, राजेंद्र कर्डिले, विजय जगताप, शशिकांत झांबरे आदी उपस्थित होते.

अनिता काळे म्हणाल्या की, शिवराज्याभिषेक दिन हा बहुजनांच्या स्वातंत्र्यतेचा दिवस आहे. महाराष्ट्रावरती साडेतीनशे वर्ष पारतंत्र्याची काळी छाया होती. प्रचंड निराशा, पारतंत्र्य, गुलामी, अवहेलना दुःख आणि संकटांचा भीषण काळोख्यात सह्याद्रीच्या कुशीत शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मशाल पेटवली. अठरा पगड जातीच्या मावळ्यांना एकत्र करुन स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवली. आजच्या युवकांपुढे असलेले आव्हाने व संकटे शिवरायांच्या आदर्शाने दूर होणार आहे. तर महिलांनी देखील राजमाता जिजाऊ यांचा आदर्श समोर ठेऊन शिवबाप्रमाणे आपल्या मुलांवर संस्कार रुजविण्याचे त्यांनी आवाहन केले.

सुरेश इथापे यांनी स्वतंत्रता, समता आणि बंधुता या तत्वावर छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याची मुहुर्तमेढ रोवली. प्रत्येक सर्वसामान्य जनतेला आपलेसे वाटणारे राज्य व रयतेचा राजा उद्यास आला. या राजांच्या कारभाराने समाजाला एक आदर्श प्रस्थापित केल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## कमलेश नवले यांना साहित्यरत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** जीवन ज्योत फाऊंडेशनचे संस्थापक कमलेश



बाबासाहेब नवले यांच्या सामाजिक कामाची दखल घेऊन सन 2024 चा एस फोर सोल्यूशन्स संस्था महाराष्ट्र राज्य च्या वतीने साहित्यरत्न पुरस्कार दिला असून ते नेवासा तालुक्यातील सौंदाळा येथील रहिवासी आहेत.मागील वर्षापासून सातत्याने लेखन करून मराठी साहित्य क्षेत्रात भरीव योगदान केल्याबद्दल त्यांना साहित्यरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.एस फोर सोल्यूशन्स संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा साहित्यरत्न 2024 पुरस्काराची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे.अशी माहिती एस् फोर सोल्यूशन्स संस्था च्या पदअधिकारी यांनी दिली आहे.लेखक कमलेश नवले पाटील यांनी जीवन ज्योत फाऊंडेशन च्या सर्व पदआधिकारी व एस फोर सोल्यूशन्स संस्था महाराष्ट्र राज्य चे संचालक मंडळाचे आभार मानले आहे. लेखक कमलेश नवले पाटील यांना मिळालेल्या साहित्यरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल तालुक्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



## विविध प्रश्नांवर १८ जूनला करणार आंदोलन : श्रावण दादा गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरवादी संघर्ष समितिची महत्वपूर्ण बैठक दिनांक ७/६/२४ रोजी दुपारी एक वाजता गांधी भवन, समर्थनगर येथे घेण्यात आली बैठकीमध्ये आंबेडकरी समाजाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन १८ जुनला समितीच्या वतीने भव्य आंदोलन करण्यात येणार असल्याचे ठरले आहे.

समितिचे अध्यक्ष श्रावणदादा गायकवाड यांनी समाजाच्या विविध प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन केले असून रामराव दाभाडे यांनी अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप केला. यावेळी नानासाहेब शिंदे, ॲड.डि.व्ही.खिललारे, मोहनलाल गोरमे, मधूकर ठोंबरे, मिलिंद मोकळे, बाळु भाऊ वाघमारे, संतोष मोकळे, बि .के.ऊफाडे, मधुकर त्रिभुवन, सुशिल भिसे, राहुल मकासरे, सागर साळवे, आनंद भिसे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास किशोर गडकर, राहुल वडमारे, सुनील खरात, विनोद कासारे, संजय जाटवे, सुनील अवचरमल, अरुण खरात, विजय मोरे, गणेश साळवे, आदित्य खरात, राजु त्रिभुवन,बाळु मगरे, राष्ट्रपाल गवई, आकाश ढिलपे, सोमनाथ वाघमारे, योगेश अचलखाब, अनिल इंगळे, प्रविण खरे, उत्तम कांबळे, विशाल मोरे, लालाजी बताडे, नारायण लोधे, संतोष आकोदे, अक्षय जिनवाल, रवि पवार, संतोष बनपुरे, राजेंद्र लाहोट, अशोक मोरे,राजु गाडेकर, प्रदिप शिरसाठ, संजय छडिदार, सुभाष सातदिवे, शिवाजी घोबळे, वसंत धवसे, अंबादास गजहस, मनोहर जोगदंडे, विलास ऊगले, अशोक आव्हाड, रामभाऊ निकाळजे, विनोद जाधव, महेन्द्र शिंदे, संतोष ससाणे, दिनेश देहाडे आदिंसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.




## समृद्धी महामार्गावर भरधाव ट्रक दुसऱ्या ट्रकवर आदळला; एक जण ठार, एक गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**डोणगाव :** समृद्धी महामार्गावर भरधाव ट्रक समोरील ट्रकवर आदळल्याने एक जण जागीच ठार झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना ८ जून रोजी पहाटे डोणगावजवळील पेट्रोल पंपासमोर घडली. कलीम सय्यद सलीम (वय २४, रा. दारव्हा, जि. यवतमाळ) असे मृतकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार समृद्धी महामार्गावर डोणगावनजीक पेट्रोल पंपाजवळ ट्रक क्र. एमएच ३२ एजे ४६६६ ला मागून येणाऱ्या ट्रक क्र. एमएच २९ टी ०७७० ने धडक दिली. यामध्ये धडक देणाऱ्या ट्रकमधील कलीम सय्यद सलीम व मिर्झा कुदरत बेग हे गंभीर जखमी झाले होते. यामध्ये कलीम सय्यद सलीम यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच डोणगाव पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. तसेच मृतकाचे प्रेत उत्तरीय तपासणीसाठी रवाना केले. जखमीवर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी डोणगाव पोलिसात वृत्त लिहिस्तोवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## विधानसभा संदर्भाने बि.आर.एस.पक्ष प्रमुखांशी चर्चा करणार : शंकर अण्णा धोंडगे

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** शंकर अण्णा धोंडगे परिवाराच्या वतीने कंधार



तालुक्यातील बाचोटी येथे होणाऱ्या परंपरागत रसाळी स्नेह भोजन कार्यक्रमाचे आयोजन दि.७ जून रोज शुक्रवारी करण्यात आले होते. यावेळी शेतकरी नेते माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे पुढे बोलतांना म्हणाले कि कंधार लोह्याचे राजकीय, सामाजिक दृष्ट्या आणि विकासाने गत दहा वर्षात मोठे नुकसान झाल्याची खंत शंकर अण्णा धोंडगे यांनी व्यक्त केले,महाराष्ट्रात आक्टोंबर महिण्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूका संबंधाने भारतराष्ट्र समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.के.चंद्रशेखरराव यांचे सोबत आठवड्याभरात चर्चा करुन पुढील धोरण ठरवण्यात येणार असल्याची माहिती धोंडगे यांनी सांगितले,दिड वर्षापुर्वी तेलंगणाचे तात्कालीन मुख्यमंत्री मा.के.चंद्रशेखरराव यांनी त्यांच्या दशकभराच्या काळात तेलंगणात केलेल्या विकास कामाचे मॉडेल घेवून मोठा गाजावाजा करीत महाराष्ट्रात नांदेड व लोहा येथे मोठ मोठ्या सभा घेवून महाराष्ट्रात आले.त्यांनी तेलंगणात केलेल्या वास्तविक व मुलभूत विकासाच्या "मॉडेल" व कृतीमुळे महाराष्ट्रातील शेतकरी कष्टकरी,गोरगरीब जनतेसह सर्व सामाजिक घटक प्रभावीत व आकर्षित झाले.शेतकरी नेते माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांचे सह अनेक मान्यवरांनी पुढाकार घेवून महाराष्ट्रात बि.आर.एस.ला असंख्य समर्थक मिळवून देवून पक्ष विस्ताराचे काम केले. महाराष्ट्रात पक्षाचे वीस लाख सभासदही झाले. बि.आर.एस.च्या कार्यकर्त्यांची महाराष्ट्र विधानसभा लढवावी अशी इच्छा असल्याने त्याबाबत आठवडाभरात मा.शंकर अण्णा धोंडगे पक्ष प्रमुख मा.के. सि.आर.साहेबांसोबत चर्चा करुन पुढील धोरण निश्चित करण्यात येईल,त्यानंतर या महिन्या अखेर महाराष्ट्र राज्यातील कार्यकत्यांचा मेळावा घेवून पुढील वाटचाल निश्चित करणार असल्याचे धोंडगे यांनी सांगितले.

## एम.आय.टी. रोटेगाव येथे 'सुविधा केंद्र' उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** एम.आय.टी. पॉलिटेक्निक रोटेगाव येथे शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये पॉलिटेक्निकच्या प्रवेशासाठी एम.एस.बी.टी.ई.चे सुविधा केंद्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. नुकताच इयत्ता दहावीचा आणि बारावीचा निकाल जाहीर झाला असून त्यानंतर पॉलिटेक्निकच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू होत असते. त्या अनुषंगाने नाव नोंदणी करण्यासाठी एम.आय.टी. पॉलिटेक्निक रोटेगाव येथे सुविधा केंद्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. या संस्थेत ॲग्रिकल्चरल, कंप्युटर, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखा उपलब्ध असून नाव नोंदणीसाठी विद्यार्थ्यांनी तात्काळ संस्थेत संपर्क साधावा, असे आव्हान संस्थेचे प्राचार्य प्रा. किशोर पाटील तसेच प्रवेश प्रक्रिया प्रमुख प्रा. दिगंबर आव्हाळे आणि प्रा. स्वप्निल पाठक यांनी केले.



आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड येथील मे. कांचन ॲग्रो एजेन्सी येथे कापूस वाण कबड्डी प्रति पॅकेट 1200/- प्रमाणे विक्री करताना डमी ग्राहक पाठवून रंगे हाथ शनिवारी पकडण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. कृषि विकास अधिकारी जि. प. यांचे उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. सोबत तालुका कृषि अधिकारी बरधे साहेब, मोहीम अधिकारी पाटील साहेब व संजय व्यास कृषि अधिकारी यांची उपस्थिती होती.**

# शिवणी (जा) शिवारात वीज कोसळून महिला ठार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पावसाळ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांची पेरणीपूर्व अंतर्गत शेती मशागतीसाठी लगबग सुरू असून शेतातील अंतर्गत कामे सुरू असताना लोहा तालुक्यात वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाटात पाऊस झाला. त्यात शेतात काम करत असलेल्या छपण वर्षीय महिलेच्या अंगावर वीज कोसळून जागीच मत्यू झाला. महसूल व पोलिस प्रशासनाकडून पंचनामा करण्यात आला. सदरील घटना दि. ७ रोजी सायंकाळी पावणे सहा वाजताच्या दरम्यान घडली. तालुक्यातील शिवणी (जा) येथील सुनंदाबाई श्रीराम जामगे (वय ५६) या सूनेसह दि. ७ रोजी स्वतःच्या शेतात कडब्याचे चिपाडे वेचात होत्या. सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान अचानक वादळी वारे सुरू झाले. लगबगीने सासू व सून अशा दोघीही घराकडे जाण्यासाठी निघाल्या असता विजांच्या कडकडाटात पाऊस झाला. दरम्यान सुनंदाबाई जामगे (सासु) यांच्या अंगावर विज कोसळली त्यात सुनंदाबाई जागीच मृत्यू पावली. सासूच्या मागे केवळ १५ ते २० फुटाच्या अंतरावर असलेली सून सुदैवाने बचावली. सुनंदाबाई जामगे यांना उपचाराठी लोह्यातील उपजिल्हा रुग्णालय दाखल केले असता कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. महसूल व पोलिस प्रशासनाने सदर घटनेचा पंचनामा केला.



# रोहिण्यानंतर मृगाचेही आगमन, शेतकरी खरिप पीक पेरणीच्या तयारीत

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगीसह परिसरात दि.७ संध्याकाळी मृग नक्षत्र पावसाचे आगमन झाले व रोहिणी नक्षत्रानंतर मृग चे ही आगमान झाल्याने शेतकरी खरिप पिक पेरणीसाठी तयारीला लागल्याचे चित्र आहे.

तालुक्यात दोनतीन दिवसांपासून ढगाळ वातावरण तथा वीजेचे कडकडाट ढगांची गडगडाट वादळीवाऱ्यासह अवकाळी वा रोहिण्या पावसाची फटकेबाजी सुरू आहे.त्यात दि ७ शुक्रवारी संध्याकाळी मृग नक्षत्र पावसाला सुरुवात झाली.तर रात्री वाथळी वारा विजेची कडकडाट ढगांची गडगडाट सह पाऊस सुरु झाले. मौसमी पावसापुर्वीच शेतकऱ्यांनी शेती मशागत नांगरणी वखरणी रोटाव्हेटर मारणे शेतातील केरकचरा काढुन साफसफाई करणे वळणे दुरस्त करणे आदि कामे आटोपली तर आता शेतकरी बीबीयाणे खरेदी खते खरेदी करुन लागवड पेरा साठी तयार झाला आहे.आता प्रतिक्षा आहे मोठ्या पावसाची व शेतात मोठा ओलावा होण्याची.मोठा पाऊस होताच लागवड पेरा ला सुरुवात शेतकरी करणार आहे. काही शेतकऱ्यांनी पावसाचे अंदाज व हवामानात बदल पावसाळा वातावरण बघता कोरड्यात लागवड पेरा करण्याची हिम्मत दाखवली आहे.

गतवर्षी नाममात्र पाऊस तद्नंतर अधिकचे पाऊस त्यामुळे खरिप रब्बी पिक हंगामात मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. तर पावसाची सरासरी बघता शासन प्रशासनाने दुष्काळ जाहीर केला होता.त्यातून शेतकरी सावरला नाही. की पिकविमा व नुकसान भरपाई हाती पडली नाही व पुन्हा आता खरिप पिक हंगाम समोर आहे. यात शासनाने तातडीने पिक कर्ज बॅंके द्वारे वाटप करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# आ. बच्चू कडूंचा सरकारला इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा आरक्षणासाठीच्या मागणीला घेऊन मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आजपासून पुन्हा उपोषण सुरू केले आहे. अंतरवाली-सराटी गावात ते उपोषणाला बसले असून पहिल्याच दिवशी त्यांनी एल्गार पुकारत राज्य सरकारला आणि मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा न देणाऱ्या आमदारांना थेट इशारा दिला आहे. तसेच, आंदोलनास होत असलेल्या विरोधावर आणि जातीवादी म्हणून टीका करणाऱ्यांवरही त्यांनी भाष्य केले.

अशातच पहिल्यापासूनच मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला समर्थन करणारे प्रहार पक्षाचे सर्वेसर्वा आमदार बच्चू कडूंनीही सरकारला इशारा दिला आहे. यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले की, आजपासून मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले. त्यामुळे सरकारने सकारात्मकपणे समोर आलं पाहिजे. सरकारने त्यांना जे आश्वासन दिलं, त्यानुसार आता कारवाई करावी. इतके सहज आणि सोपं हे प्रकरण असून सरकारने यावर ठोस भूमिकाघेत हा प्रश्न आता मार्गी लावावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला दारुण पराभवाला समोर जावे लागले आहे. या पराभवाची जबाबदारी स्वीकारून देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन पक्षसंघटनेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांच्या या घोषणेने भाजपसह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. याविषयी बोलताना बच्चू कडू म्हणाले की, या लोकसभेत मराठा आरक्षणाचाही फटका भाजपला बसलाय. या निवडणुकीत मुस्लिम आणि बौद्ध समाजाचे मते एकतर्फी कॉंग्रेसला गेले आणि हिंदूचे मते भाजपला गेले. त्यामुळे दोन्हीकडे धर्म चालला, जात चालली. आपल्या हिंदुस्थानात वेगळं काहीही कराव लागत नाही. एकान भगवा झेंडा पकडला आणि दुसऱ्याने हिरवा आणि निळा पकडला. त्यामुळे यंदा केवळ जातीचे आणि धर्माचे राजकारण झाले असल्याचे मतही बच्चू कडूंनी बोलताना व्यक्त केले आहे.

लोकसभा निवडणुकांनंतर आपण मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणाला सुरुवात करण्याची घोषणा केलेल्या उपोषणकर्ते मनोज जरांगे यांनी आजपासून पुन्हा उपोषण सुरू केले आहे. अंतरवाली-सराटी गावात ते उपोषणाला बसले असून पहिल्याच दिवशी त्यांनी राज्य सरकारला आणि मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा न देणाऱ्या आमदारांना थेट इशारा दिलाय. तसेच, आंदोलनास होत असलेल्या विरोधावर आणि जातीवादी म्हणून टीका करणाऱ्यांवरही त्यांनी भाष्य केले. जालना-अंबड आंदोलन झालं याठिकाणी आंदोलनासाठी कोणी परवानगी मागितली की, सरकार परवानगी नाकारत आहे, पण संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करत आपण आंदोलन करणारच, असे जरांगे यांनी म्हटले होते. त्यानुसार, त्यांनी आजपासून उपोषण सुरू केलं आहे.

# दर्शन प्रवचन व कुमकुम अर्चण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** श्री श्री श्री जगदगुरु विद्यारण्य शंकराचार्य स्वामी महाराज यांच्या आगमणाप्रित्यर्थ दर्शन प्रवचन व कुमकुम अर्चण सोहळाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रा. अविनाश कुलकर्णी यांनी उपोरोक्त प्रतिनीधीशी बोलताना दिली. दि 15 जुन रोजी सायंकाळी चार वाजता हनुमान मंदीर परिसर दुर्गा नगर परिसरात आयोजित करण्यात आले आहे. तद्ननंतर भक्ता साठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी भक्तांनी कार्यक्रमचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. अविनाश कुलकर्णी, वेदपंडीत शंकर महाराज पांडे, पत्रकार महेश जोशी यांनी केले आहे.

# न. प. मुख्याधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : डॉ. गोपाल बशिरे

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** नगरिषदेच्या मुख्याधिकारी लोणार वासीयांना नळ योजनेद्वारे दूषित,दुर्गंधीयुक्त पाणी पिण्यास देऊन मानवाधिकाराचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा अशी मागणी विभागीय आयुक्त, निधी पांडे यांच्याकडे शिवसेना उ.बा.ठा. चे जिल्हा संघटक प्रा. डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे), यांनी केली.

लोणार येथील मुख्यधिकारी यांनी शहरास पिण्यायोग्य स्वच्छ पाणी किमान आठवड्यातून एकदा देण्यात यावे या करिता डॉ.गोपाल बशिरे यांनी अनेक वेळा विनंत्या केल्या निवेदने दिले .गजानन जाधव यांनी मे २०२३ मध्ये आमरण उपोषणे केले तेव्हा मुख्याधिकारी यांनी लेखी आश्वासन देऊन १० दिवसातून एकवेळा स्वच्छ व फिल्टर पाणीपुरवठा करूत असे लेखी आश्वासन देऊन सुद्धा मुख्याधिकारी यांनी जाणून बुजून किंवा त्यांना या विषयाचे गांभीर्य नसल्याकारणाने त्यांनी रितसर या पाणी प्रकरणाकडे डोळे झाक केलेली आहे आणि त्यांच्या या कृतीमुळे पिवळ्या रंगाचे,दूषित व दुर्गंधीयुक्त पाणी कोणत्याही प्रकारचे फिल्टर न करता जसेच्या तसे धरणातून पाण्याच्या टाकीत व पाण्याच्या टाकीतून नळाला २० ते ३० दिवसातून एक वेळा शहरास नळ योजनेमार्फत सोडण्यात येत आहे जेव्हा की दि. १२ डिसेंबर २०२३ला न.प. ने पाठविलेले पाण्याचे नमुने अहवाल क्र.५७७९-८ दि.१७/१/२०२४ नुसार सदरील पाणी पिण्यास अयोग्य आहे असे मुख्य अणूजीव शास्त्रज्ञ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा बुलढाणा यांनी कळवले होते यांनी कळविले होते परंतु सदरील पाण्यावर कुठलीही प्रक्रिया न करता तसेच दूषित पाणी लोणार वाशीयांना पिण्यासाठी सोडतात

या कारणाने लोणार शहरातील शेकडो अल्पवयीन मुले वृद्ध हे डायरिया, पोटाचे विकार, व कावीळ सारख्या विकाराणे ग्रस्त झाले आहेत व यास कारणीभूत नगरपरिषद लोणारच्या मुख्याधिकारी ह्या आहेत त्यांनी जाणून बुजून सर्वसामान्य जनतेस पिवळ्या रंगाचे दूषित, दुर्गंधीयुक्त पाणी पिण्यासाठी देऊन संविधान अनुच्छेद २१ म्हणजेच स्वच्छ पाण्याच्या संदर्भात मूलभूत अधिकाराचे हनन करून हजारो माणसांच्या जीवनाशी खेळत आहेत. करिता नगरपालिका लोणार मुख्याधिकारी यांच्या विरोधात संविधान अनुच्छेद २१ मधील पाण्याविषयीची मूलभूत अधिकाराचा उल्लंघन विरोधात व सर्वसामान्य हजारो लोकांना दूषित पाणी पिण्यासाठी देऊन त्यांच्या प्राणास धोका निर्माण करून त्यांच्या जीवाशी खेळण्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून नियमाने कार्यवाही करावी करिता फिर्याद निधी पांडे विभागीय आयुक्त यांच्याकडे एक तास चर्चा करून त्यांच्याकडे दाखल करण्यात आली. त्यावर विभागीय आयुक्तांनी उपजिल्हाधिकारी जोग यांना डॉ. गोपाल बशिरे यांच्यासमोर पाण्याचे नमुने घेऊन तपासणीस पाठवा असे आदेश दिले त्यानंतर कार्यवाही करू जिल्हा उपाधिकारी जोग मुख्याधिकारी व यांच्यासमोर पोलीस स्टेशन समोरील भागातून नळातून येणाऱ्या पाण्याची नमुने घेतले व ते तपासणी बुलढाणा व संभाजीनगर या दोन ठिकाणी पाठवण्यात आले. याप्रसंगी बुलढाणा जिल्हाउपाधिकारी जोग, लोणार तहसीलदार गिरीश जोशी, लोणार न.पा. मुख्याधिकारी विभा वऱ्हाडे, व शिवसेना उबाठाचे शहर प्रमुख गजानन जाधव, उपतालुका प्रमुख परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, राजू बुधवत, श्रीकांत मादनकर, लूकमान कुरेशी, इक्बाल कुरेशी, तानाजी अंभोरे, तानाजी मापारी, अश्रूबा धारकर, राजू दहातोंडे, गणेश पाठे हे उपस्थित होते.




# पाझर तलावांची बनावट दुरुस्ती भोवणार

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा. :** मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत उपविभागात झालेल्या पाझर तलावाच्या दुरुस्ती संपूर्णतः बनावट कामांची चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्रदारांविरुद्ध कारवाईची मागणी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली होती. सदर प्रकरणात नुकतेच चौकशीचे आदेश प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी मृद व जलसंधारण नागपूर यांनी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी अमरावती यांना दिले आहे.प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी यांनी गांभीर्याने घेतलेल्या सदर प्रकरणात चौकशीअंती पाझर तलावांच्या बनावट दुरुस्तीचे प्रकरण चांगलेच भोवणार आहे.

मृद व जलसंधारण उपविभाग मार्फत पाझर तलावांच्या दुरुस्ती बाबतचा संपूर्ण बनावट कामांची चौकशी ही दक्षता व गुण नियंत्रक पथका कडून व्हावी,यातील दोषी उपविभागीय अधिकारी मृद व जलसंधारण, व त्यांचे सहकारी शाखा अभियंतासह जबाबदार कंत्राटदार यांच्याविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री आणि मृद व जलसंधारण मंत्री यांच्याकडे महाराष्ट्र राज्य युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली होती. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना अंतर्गत फेब्रुवारी २०२२ मध्ये वरील दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता देऊन त्या कामांचे मे २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.सदर पाझर तलाव दुरुस्तीची कामे या उपविभागाकडून करण्यासाठी संबंधित एजन्सीला शाखा अभियंता व उपअभियंता यांनी संगणमत करून थातूरमातूर पद्धतीने व बोगस कामे करून घेऊन सदर कामे पूर्ण झाल्याचे दर्शविण्यात आले. तसेच बनावट देयके तयार करून अंदाजपत्रकाप्रमाणे मोजमाप पुस्तिकेत मापे नोंद करण्यात आल्याचा आरोप श्री खरात यांनी केला होता. सदर प्रकरणाची



तात्काळ चौकशी करा व दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कंत्राटदार यांना कठोर शासन करून निलंबित करण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने प्रचलित कायद्याप्रमाणे नाईलास्तव सक्षम प्राधीकरणाकडे,उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ अथवा लोकायुक्त मुंबई यांच्याकडे दाद मागावी लागेल अशा प्रकारचा निर्वाणीचा इशारा महाराष्ट्र राज्य सामाजिक युवा पुरस्कार प्राप्त युवा सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी दिला होता.

याची दखल घेत प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी यांनी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग यांना एका पत्राद्वारे नमूद प्रकल्प संबंधित माहिती तपासून खातरजमा व प्रमाणित करून तक्रारी मध्ये उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने आपले कार्यालयाचे अहवाल, व आपला सुस्पष्ट अभिप्राय तात्काळ सादर करण्याचे आदेश निर्गमित केले आहे.या आदेशानंतर प्रादेशिक जलसंधारण अधिकारी हे सदर प्रकरणास किती गांभीर्याने घेतात याबरोबरच त्यांच्या चौकशी संबंधी अहवालाकडे जनतेचे लक्ष लागले आहे. दरम्यान मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत पाझर तलावांची केलेली थातूरमातुर दुरुस्ती व बनावट देयके उपविभागीय मृत व जलसंधारण विभागास चांगलेच भोवणार आहे.

# एकीकडे किसान सन्मान; दुसरीकडे हमीभावातून बळीराजाचा अपमान

## पिकाला हमी भाव जाहीर पण खरेदी केंद्र कुठ? याच कारणाने शेतकऱ्यांनी महायुतीला नाकारले!

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** अलीकडेच झालेल्या लोकसभा निवडणूक मध्ये शेतकऱ्यांच्या शेतमालाचा पडलेला दर हा विषय खूपच गाजला होता. कांदा निर्यात बंदीने अनेक प्रस्थापितांच्या डोळ्यात पाणी आणले, या सर्व गोष्टींचा चांगलाच फटका महायुतीला बसला त्यामुळे अनेक दिग्गजांना पराभवाचे धक्के बसले. मराठवाड्याचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. 60 ते 70 टक्के लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर चालतो. मराठवाड्यामध्ये प्रामुख्याने खरीप हंगामात सोयाबीन, कापूस ही पिके घेतली जातात. तर रब्बीला गहू, ज्वारी, हरभरा या पिकावर शेतकऱ्यांचा भर असतो. या वर्षीच्या कमी पर्जन्यमानामुळे पशुधनांचा चारा प्रश्न गंभीर होईल. पाणीसाठा कमी असल्यानं तर गहू पिकाला पाणी जास्त लागते. हरभरा पिकास पोषक वातावरण नाही. अशा अनेक कारणांमुळे या वर्षी उन्हाळी ज्वारीचे उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल जास्त होता. परिणामी यंदा उन्हाळी ज्वारीच्या उत्पादनात भरीव वाढ झाली. मात्र ज्वारीला हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी कायम आहेत. सोयाबीन पिकाबाबतीत ही असेच घडले गेल्या वर्षी शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक मळणी करून घरात आहे. आज दुसऱ्या वर्षी सोयाबीन पेरणीची वेळ आली तरीही सोयाबीनचा दर कोसळलेलाच आहे. वर्षभरात कधी सोयाबीनचा दर हमीभाव जवळ तर कधी हमीभावाच्या खाली पडलेला असतात अश्या वेळी सोयाबीन खरेदी केंद्र बंद राहतात. त्यावेळी शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात पडेल त्या भावात सोयाबीन व्यापाऱ्यांना विकावे लागते. हमीभावाच्या दरात सोयाबीनचे भाव असताना खरेदी केंद्रावर रंगाच्या रांगा लागलेला असतात. मग त्या शेतकऱ्याला ज्या वाहनामध्ये सोयाबीन विक्रीसाठी खरेदी केंद्रावर आणवे लागते. त्या वाहनास दिवसभर रांगेत थांबण्याच्या कारणास्तव त्या वाहन मालकास जास्तीचे भाडे द्यावे लागते. तिथेही बळीराजाचं भरडला जातो. सोयाबीन निघाल्यानंतर दुष्काळी परिस्थितीत





झगडत रब्बी हंगामात मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी कांदा केला. त्याला लावलेला निर्यात बंदीमूळे पण दुष्काळात पै-पै साठी शेतकऱ्यांचा जीव मेटाकूटीला आला. दुष्काळाच्या झळा सोसत रब्बी पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांनी गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी अधिक प्रमाणात उन्हाळी ज्वारीची लागवड केल्याने उत्पादन वाढले आहे. आज ज्वारीचं कुठेही खरेदी केंद्र नाहीये. ज्वारी दर अत्यंत कमी असल्याकारणाने व्यापाऱ्याकडूनही ज्वारी हमीभावात खरेदी केली जात नाही. या कारणामुळे दुष्काळी पट्ट्यात पिकवलेल्या ज्वारीला हमीभाव एवढी किंमत मिळत नसल्याने शेतकऱ्याला दुष्काळाच्या छायेत जगावं लागत आहे. यासाठी प्रशासनाकडून योग्य नियोजन करून शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालासाठी योग्य हमी भाव देऊन त्यांना त्यांच्या पिकवलेल्या माल विक्रीसाठी जवळच अशी सुलभ बाजारपेठ कशी उपलब्ध होईल. यावर मंथन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांसाठी शासनाकडून शेतकरी गट, ॲग्रो प्रोडूसर कंपनी, शेती समूह गट यांना त्या त्या भागातील हमीभाव केंद्रे सुरू करण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतकऱ्यांचा वेळ अन् वाहन खर्च ह्या दोन्ही गोष्टी बचत होतील. इथून पुढच्या काळात तरी या सरकारने चिंतन, मंथन, बैठका, मंत्रीपदाचे राजीनामे कुठल्या पट्ट्यात मतदान कमी पडले? या नेत्याने काम केले नाही, त्या आमदाराने काम केले नाही. यावर पुन्हा वेळ घालू पणा करू नये. कारण याच आजवरच्या कारणामुळे विकासाचा महामेरू घेऊन मराठवाड्यावर नुसत्या योजनांची सरबत्ती करणाऱ्या महायुती सरकारवर शेतकऱ्यांनी मतपेटीतून पूर्ण नाराजी व्यक्त केले आहे. त्यासाठी मराठवाड्यातील शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य हमीभाव देत हमीभाव केंद्र सुरू करून या मराठवाड्यातील बळीराजाची आर्थिक दुरवस्था थांबवावी.





# वाघलवाड्यात काँग्रेसने राखला गड; अजरोद्दीन शेख यांचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे गोळेगावकर**

**उमरी :** लोकसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात काँग्रेसने गड राखला असून नांदेड हा काँग्रेसचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध केले. मातब्बर नेते माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडून भाजप प्रवेश केल्यामुळे नांदेड जिल्ह्यात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले होते परंतु नांदेड लोकसभेत काँग्रेसने गड राखल्यामुळे कार्यकर्त्यांच्या उत्साहाला उधाण आले आहे. जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील वाघलवाडा येथे काँग्रेसने



सर्वाधिक मते काँग्रेस पक्षाला मिळवून दिले आहेत. वाघलवाडा बूथ क्रमांक १११ वर काँग्रेसचे उमेदवार वसंतराव चव्हाण याना ४९८ मते पडली असून भाजप उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांना १६० मते पडली आहेत. चव्हाण यांनी चिखलीकरांना तब्बल ३३० मतांनी प्रभाव करून विजयी पताका फडकावला. वाघलवाडा भागातून सर्वाधिक मते काँग्रेसच्या पारड्यात पडल्यामुळे वसंतरावांच्या विजयात वाघलवाडा वासियांनी महत्वाची भूमिका बजावल्याचे स्पष्ट होते. विशेष म्हणजे वाघलवाड्या मध्ये भाजपचे शेतकरी नेते नायगाव विधानसभाचे कवळे गुरुजी यांचा विशेष लक्ष वाघलवाडा गावात असुन सुद्धा बीजेपीला धोबीपछाड मिळालेली आहे. यापुढेही गावातील तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत सर्व लोक हे काँग्रेस पक्षाच्या आणि वसंतराव चव्हाणांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असे मत काँग्रेस पक्षाच्या एन.एस.यु.आय विंगचे कार्यकर्ते अजरोद्दीन शेख यांनी बोलताना सांगितले.

# साई संस्थान विश्वस्त मंडळ लवकरच येण्याची शक्यता?

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीचा झालेला भ्रमनिरास त्यानंतर राजकीय घडामोडींचा वेग बघता विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन महायुतीतील घटक पक्षांच्या अनेक नेत्यांचं व पदाधिकाऱ्यांचं पुनर्वसन होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. खरं तर १२वर्षापासुन संस्थानवर विश्वस्तमंडळ स्थिर राहिले नाही, कधी घटनाबाह्य नेमणुका तर कधी विश्वस्त मंडळ स्थापन झाल्यानंतर दाखल याचिका आणि त्यातूनच कायद्याच्या कचाट्यात सापडलेल विश्वस्तमंडळ स्थापन होऊ शकलं नाही त्यामुळे याकडे राज्य सरकारच लक्ष गेल्याने आता नवीन विश्वस्तमंडळ लगतच्या काळात स्थापन होण्याची शक्यता आहे. व साईभक्त भाविकांसह शिर्डी ग्रामस्थाचे देखील लक्ष लागून आहे विश्वस्तपदावर नगर जिल्यातील ८ सदस्य निवडण्याची सक्ती असल्याने राष्ट्रवादी



काँग्रेस ( अजित पवार गट ), शिवसेना (शिंदे गट) भाजपा या तीनही पक्षांचे सदस्याना नवीन विश्वस्त मंडळात संधी मिळेल तर उर्वरित सदस्य हे राज्यातील असणार आहेत. एकूण १७ सदस्य असून यापैकी एक महिला, डॉक्टर, वकील, इंजिनियर, तसेच सामाजिक क्षेत्रात योगदान असणाऱ्यांना प्राधान्य असणार आहे. शिर्डीचे साई संस्थान हे जगप्रसिद्ध आहे आणि देशातील तिरुपती बालाजी ट्रस्ट नंतर सर्वात श्रीमंत असलेले ट्रस्ट आहे त्यामुळे येथील विश्वस्तांना देशभरात मोठा सन्मान मिळत असतो नगर जिल्ह्यातील संख्याबळ जास्त असल्याने संस्थान कारभराच्या माध्यमातून खूप मोठा जनसंपर्क साधला जातो. त्यामुळे कामगाराचे प्रश्न, पंचक्रोशीतील विकासकामे, निधी यामुळे सत्ताधारी पक्षांना याचा चांगलाच फायदा होतो. विशेष बाब म्हणजे देश विदेशातील अनेक श्रीमंत व्यावसायिक, उद्योजक, सेलिब्रिटी यांच्याशी संपर्क होत असल्याने देणगी स्वरूपात मिळणाऱ्या रकमेतून अनेक विकास कामांना हातभार लागतो. हाच दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन आजतरी नगर जिल्ह्यात तीनही पक्षांना कार्यकर्त्यांची मोट नव्याने बांधण्यासाठी विश्वस्त मंडळातील नवीन सदस्यांना संधी उपलब्ध करून देण्याची ही संधी आहे असं राजकीय अभ्यासकांच मत आहे. विश्वस्त पद मिळण्यासाठी तीनही पक्षातील इच्छुकांना मोठी रस्सीखेच करावी लागते अनेकांनी आपापल्या नेत्यांकडे या पदासाठी फिल्डिंग लावली आहे. सध्या साई संस्थानचा कारभार हा त्रिसदस्यीय समिती पहात असून यामध्ये अध्यक्षस्थानी जिल्ह्याचे प्रधान न्यायाधीश तर जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी हे सदस्य आहेत. यासर्व मा. उच्च न्यायालयाने ठरवुन दिलेल्या नियमानुसार कामकाज करावे लागते अर्थात यामध्ये त्रिसदासिय समितीला पाच लाख रुपये आर्थिक खर्च करण्याचा अधिकार असून त्यापुढील खर्चास न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक आहे अर्थात सध्याचा कारभार हा कायद्याच्या चौकटीत आहे. राज्यसरकारच्या अधिपत्याखाली असणारे साई संस्थांनमध्ये नवीन विश्वस्त मंडळाची स्थापना झाली तर शिर्डीतील रखडलेली अनेक विकासकामे, कामगारांचे प्रश्न, गार्डन, लेसर शो यासारखे मनोरंजनाचे प्रोजेक्ट झाली तर शिर्डीत भाविक थांबला तर शिर्डी अर्थकारणाला हातभार लागणार आहे. यासाठी नवीन विश्वस्त मंडळाची स्थापना होणे गरजेचं असून यावर महिनाभरात निर्णय होण्याची शक्यता आहे.

# नेवासा येथे महिलांसह नागरिकांचा हंडा मोर्चा, धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** शहर व प्रभागात प्रदीर्घ काळापासून विस्कळीत स्वरूपात सुरू असलेल्या पाणी योजनेला बेजबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या हाडेलहाप्पी धोरणाला कंटाळून नेवासा नगरपंचायतच्या निषेधार्थ शुक्रवारी दि.७ जून रोजी नगरपंचायतवर हंडा मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात आले.तास दीड तास होऊन ही कोणतीही भूमिका नगरपंचायतने न घेतल्याने महिलांनी माठ फोडून नगरपंचायतच्या बेजबाबदार कारभाराचा यावेळी निषेध केला. समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी या मोर्चा व धरणे आंदोलनाचे नेतृत्व केले. नेवासा नगरपंचायत च्या ढिसाळ कारभारामुळे नेवासा शहराचा पाणी प्रश्न अतिशय गंभीर बनला. नेवासा शहराच्या बाजूलाच मध्यमेश्वर बंधारा तुडुंब भरलेला असताना नेवासा शहरात आठ दिवस पाणी येत नाही तर उपनगरात तीन तीन आठवडे पाणी मिळत नाही. ही परिस्थिती अतिशय विदारक आहे. या गलथान कारभाराचा निषेध करण्यासाठी शहरातील त्रस्त महिला एकत्र येत नगरपंचायत चौकात त्यांनी धरणे आंदोलन केले. धरणे आंदोलनात मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातच झुणका भाकर खाऊन महिला आंदोलनकर्त्यांनी ठिय्या मांडला. हंडा मोर्चा आंदोलनास तास दीड तास होऊनही नगरपंचायत प्रशासनाकडून आंदोलकांच्या प्रश्नांची दखल घेतली गेली नाही. म्हणून आंदोलकांनी आपला मोर्चा मुख्याधिकारी यांच्या दालनाकडे वळवला. मुख्याधिकारी यांच्या दालनामध्ये ठिय्या देत महिलांनी आपले पाण्याच्या विषयीचे प्रश्न पोटतिडकीने मांडले.परंतु प्रश्न सोडवण्यासाठी मुख्याधिकारी किंवा सक्षम अधिकारी उपस्थित नसल्याचे पाहून आंदोलन महिला चांगल्याच संतापल्या.मुख्याधिकारी येईपर्यंत ठिय्या देण्याचा ठाम निर्धार महिलांनी केला.आपला पाणी प्रश्न पोटतिडकिने मांडताना महिलांनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातच चटणी भाकरी खाऊन आंदोलन सुरूच ठेवले.नगरपंचायतच्या उपस्थित अधिकाऱ्यांकडे महिलांना देण्यासाठी कोणतेही ठोस आश्वासन नव्हते. नगरपंचायत प्रशासन पाणी प्रश्न गांभीर्याने घेत नाही हे यावरून स्पष्ट झाले. या बेजबाबदार कारभाराचा निषेध म्हणून महिलांनी माठ फोडून आपला संताप व्यक्त केला. यावेळी बोलताना डॉ.करणसिंह घुले म्हणाले की गेल्या सुमारे दीड वर्षापासून नगरपंचायत नेवासा यांच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या पाणीपुरवठा योजनेमध्ये मोठा विस्कळीतपणा सुरू आहे. नेवासा शहरातील प्रवरा नदीच्या बंधाऱ्यात पाणी असताना तसेच जायकवाडी जलाशयात पिण्यापुरते पाणी राखीव असताना नेवासा शहरात दहा ते पंधरा दिवस सलग पाणीपुरवठा होत नाही. ज्यावेळी होतो त्यावेळी तो पूर्ण दाबाने होत नाही. याबाबत अनेक वेळा तक्रारी करू नये या विभागाचे कर्मचारी व अधिकारी गांभीर्याने कुठलाही विषय हाताळत नाही, अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत नाही. पाणीपुरवठ्याच्या विषयात ओरड निर्माण झाली ही वीज वितरण कंपनीकडे किंवा जीर्ण झालेल्या नळ योजनेकडे बोट दाखवतात.नागरिकांना नगरपंचायतला असलेल्या अडचणीबाबत किंवा पाणी योजनेच्या स्थितीबाबत कुठलेही देणे घेणे नसून नागरिक नियमित नळपट्टी भरत असतील तर त्यांना किमान एक दिवस आड का होईना पूर्ण दाबाने, पूर्णवेळ पाणी मिळणे हा त्यांचा अधिकार आहे तो का मिळत नाही असा सवाल त्यांनी यावेळी बोलताना केला. सदर आंदोलन प्रसंगी नेवासकर ग्रुपचे शांताराम गायके, माजी सरपंच सतीश गायके,भाजपचे युवा नेते मनोजअण्णा पारखे,आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष संदीप आलवणे,शिवसेनेचे भाऊसाहेब वाघ,अनिल सोनवणे यांनी आपल्या त्रिव भावना व्यक्त केल्या.नेवासा शहरात गंभीर होत चाललेला पाणी प्रश्नावर कायम स्वरूपाचा तोडगा काढण्यासाठी व कर्मचाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेला चव्हाट्यावर आणण्यासाठी नगरपंचायत च्या कारभाराचा निषेध यावेळी आपल्या भाषणातून केला.

# जलयुक्त शिवारच्या कामांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जलयुक्त शिवार ही शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि.7) जिल्ह्यातील प्रलंबित कामांचा आढावा घेऊन सूचना दिल्या. वीस कलमी सभागृहात पार पडलेल्या या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, उपविभागीय अधिकारी संजय पवार (चंद्रपूर), विशालकुमार मेश्राम (मूल), जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शुभम दांडेकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी निलिमा मंडपे, लघुपाटबंधारे विभागाच्या अभियंता प्रियंका रायपूरे व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, जलयुक्त शिवारच्या ज्या कामांचे कार्यादेश देण्यात आले आहेत, अशी प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करावे. तसेच तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झाली असल्यास निविदा प्रक्रिया राबवून काम लवकर सुरू होईल, याबाबत नियोजन करा. संबंधित अधिका-यांनी प्रत्यक्ष साईटवर जाऊन जलयुक्त शिवारच्या कामांची पाहणी करावी. या योजनेचा शासन स्तरावरून नियमित आढावा होत असल्याने जिल्ह्यातील प्रलंबित कामांना गती द्यावी. उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांनी तालुका कृषी अधिकारी व संबंधित यंत्रणांना घेऊन तालुकास्तरावर त्वरीत बैठक घ्यावी. निधी मागणीचे प्रस्ताव असतील तर ते तातडीने प्रशासनाकडे सादर करावे. जेणेकरून निधी उपलब्ध करून देऊन कामांना गती देण्यात येईल, अशा सुचना जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी दिल्या. बैठकीला दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.




# पुन्हा उधळला दोन बालविवाहाचा घाट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पालकांच्या समुपदेशाने जिल्ह्यात एकाच दिवशी दोन बालविवाह रोखण्यात चाईल्ड हेल्पलाईन आणि जिल्हा बालसंरक्षण कक्षाला यश प्राप्त झाले. विशेष म्हणजे जिवती तालुक्यातील 5 बालविवाह यावर्षी यंत्रणेनी थांबविले आहे. चंद्रपूरपासून दूर अंतरावर असलेल्या जिवती तालुक्यातील गावांमध्ये बालविवाह होत असल्याची गोपनीय माहिती चाईल्ड हेल्पलाईन च्या 1098 क्रमांकावर मिळाली. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी चंद्रपूर आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाहीला सुरवात करण्यात आली. सर्वप्रथम दोनही बालिका अल्पवयीन असल्याचा पुरावा सहाय्यक संरक्षण अधिकारी परविन शेख, अंगणवाडी सेविका व सुपरवायजर यांच्या मदतीने प्राप्त करण्यात आला. यानंतर चाइल्ड हेल्पलाईन आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कर्मचारी दोन्ही बालिकेच्या बालविवाह होत असलेल्या गावात पोहचले व ग्रामीण बाल संरक्षण समिती सदस्यांच्या मदतीने दोन्ही बालविवाह थांबविले. दोन्ही अल्पवयीन बालिकांच्या कुटुंबाकडून बालविवाह करणार नसल्याचे शपथपत्र लिहून घेण्यात आले. या संपूर्ण कारवाही दरम्यान जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दिपक बानाईत, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, चाईल्ड हेल्पलाईनचे अभिषेक मोहुर्ले, प्रकल्प समन्वयक प्रदिप वैरागडे, सुपरवायझर अंकुश उराडे, किरण बोहरा आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या हर्षा वऱ्हाटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# जिंतूरात 14 सदस्यीय प्रशासक मंडळावर गुन्हा दाखल

## जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समिती : 33 लाख 37 हजार 466 रुपयांचा अपहार

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** येथील कृषि उत्पन्न बाजार समितीतील तत्कालीन अशासकीय प्रशासकीय मंडळाने अनेक बाबीत केलेल्या 33 लाख 37 हजार 466 रुपयांच्या अपहाराबद्दल 14 सदस्यीय प्रशासकीय मंडळाविरुध्द जिंतूर पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये फसवणूकीचे गुन्हे दाखल झाले आहेत. जिंतूर बाजार समितीत 22 जानेवारी 2020 ते 20 एप्रिल 2022 या कालावधीत अशासकीय प्रशासकीय मंडळ कार्यरत होते. मनोज मुंजाभाऊ थिटे यांच्या अध्यक्षतेखालील या मंडळात शंकर गुलाब जाधव, रुपेश कांतराव चिद्रवार, जगदीश मुंजाजी शेंद्रे, प्रकाश माधवराव शेळके, दिलीप रामभाऊ डोईफोडे, दिलीप वाघोजी घनसावंत, प्रभाकर भिमराव चव्हाण, कैलास शंकरराव सांगळे, हनुमंत मसाराव भालेराव, मोहम्मद आबेद मोहम्मद गफार, अभियंता बोराडे, सतीश काळे व लोकपाल मंगेश शिंदे




आदी समाविष्ट होते. या मंडळाने त्या कालावधीत प्लॉट वाटप, अविक्रीय माल, रस्ते, लाईट, बाग-बगीचा इत्यादींच्या खर्चात, बांधकाम खर्च, गोदामामधील भंगार विक्री, स्वच्छता व दुरुस्ती, प्रवास खर्च व भोजन इत्यादींमध्ये स्वतःच्या फायद्या करीता बाजार समितीच्या निधीचा मुक्तपणे वापर केला, अपहारही केला. सदर रक्कमेतून स्वतःचे व कुटूंबियांच्या नावे मिळकती खरेदी केल्या. संपूर्ण कालावधीत अत्यंत अंदाधुंद पध्दतीने म्हणजे सर्व कायदे, नियम, अटी वगैरे खुंटीला टांगून खोटी कागदपत्रे, बनावट पावत्यांच्या आधारे या मंडळातील प्रत्येक सदस्याने बाजार समितीच्या निधीचा अपहार केल्या चा आरोप कृषि उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती गंगाधर वामनराव कदम बोर्डीकर यांनी 27 मे 2023 रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला. त्यावर जिल्हा उपनिबंधकांनी तत्कालीन अशासकीय मुख्य प्रशासक व संबंधित अशासकीय सदस्य यांच्या विरुध्द खोटे व बनावट बिले, व्हावचर तयार करुन बाजार समितीच्या निधीचा अपहार केल्या प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे आदेश बजावले. या पार्श्वभूमीवर बाजार समितीचे सभापती गंगाधर बोर्डीकर यांनी जिंतूर पोलिस ठाणे गाठून महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियमचे कलम 29 अन्वये तक्रार दाखल केली. जिंतूर पोलिसांनी या तक्रारीच्या आधारे 14 जणांविरोधात दखलपात्र गुन्हा क्रमांक 357/2024 कलम 420, 405, 408, 409, 464, 465, 466, 468, 471, 477 (अ) 120 (ब) 34 भादंवि अन्वये गुन्हे दाखल केले आहेत.

# खरिपाच्या पार्श्वभूमीवर कृषि सेवा केंद्राची तपासणी मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे व रासायनिक खते मिळावी यासाठी उपविभागीय कृषि आधिकारी सुभाष आघाव, तालुका कृषि आधिकारी मदन शिसोदिया यांनी कृषि केंद्र तपासणी धडक मोहीम राबवली. यामध्ये कृषि सेवा केंद्रांची कसून तपासणी केली जात आहे. खरिप हंगाम तोंडावर असल्याने परिसरात शेतकऱ्यांची बियाणे, खते खरेदीसाठी लगबग सुरु झालेली आहे त्यामुळे शेतकऱ्यांना यावर्षी उच्च दर्जाचे बियाणे व खत मिळावी म्हणून ही धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. उपविभागीय कृषी आधिकारी सुभाष आघाव यांच्या पुढाकाराने थेट कृषि सेवा केंद्रांची विविध प्रकारची तपासणी केली जात आहे निकृष्ट दर्जाचे खत बियाणे दिल्यास त्या कृषि सेवा केंद्र चालकावर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा तालुका कृषि अधिकारी मदन शिसोदिया यांनी दिला.केंद्र चालकांना एमआरपीपेक्षा बियाणे, खते चढ्या भावात विक्री न करणे, दर्शनी फलकावर बियाणे लिस्ट लावणे, खरेदी पक्के बिल शेतकर्यांना देणे, स्टाक रजिस्टर अद्यावत ठेवणे बाबत माहिती घेण्यात आली सदर तपासणी मोहीमेत तालुका कृषि आधिकारी मदन शिसोदिया मंडळ कृषि धिकारी आर जी गुंडीले,संपत वाघ,कृषि पर्यवेक्षक प्रदीप पाटील,समाधान चौधरी कृषि सहाय्यक कैलास कुमावत,बी आर चौरे, अर्जुन सुरडकर, विश्वजित तायडे सहभागी होते.



# 190 वाहनांवर पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** कळंब- ठाणे वाहतूक शाखेच्या वतीने 190 वाहन व मोटरसायकल यांच्यावर केसेस करून दंड लावला यामध्ये मोटर सायकल लायसन नसणे ट्रिपल सीटओव्हरलोड तसेच अठरा वर्ष खालील मुलांना गाडी देणे अशा अशा प्रकारच्या विविध केसेस एका महिन्यामध्ये दाखल केल्या त्यामध्ये एकूण 86150 दंड ठोठावला माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपविभागीय अधिकारी संजय पवार कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवी सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक राम बहुरे व पोलीस हेड कॉन्स्टेबल मुंडे , रवी कोरे यांनी कार्यवाही केली आहे. चौकट. सर्व पालकांना कळंब पोलीस ठाणे वतीने आव्हान आपल्या 18 वर्षी खालील पाल्यांना मोटरसायकल चालवण्यास देऊ नये अन्यथा शहरातील सर्व चौकामध्ये दररोज वाहन तपासणी करण्यात येणार आहे व यामध्ये जर अल्पवयीन पालक आढळला तर दंड वसूल करण्यात येईल असे अहवाल कळंब पोलीस ठाण्याची पोलीस निरीक्षक रवी सानप यांनी केले.

# वीजदर आवाक्याच्या बाहेर गेल्याने सर्वसामान्यांचे मोडले कंबरडे

## महावितरण कंपनीचा मनमानी कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातसह तालुक्यात बहुतांश मोलमजुरी करून खानारा व बेरोजगार शेतकरी नागरिक आहेत. यात मार्च एप्रिल मे महिन्यात इलेक्ट्रॉनिक बिल जास्तच येत असल्याने बिल भरणा शक्य होत नाही महावितरण कंपनीचे वरचेवर दर वाढत आहेत या महागाई च्या युगात विविध आवश्यक वस्तूचे भाव वाढल्याने जनता त्रस्त झाली आहे. यातच महावितरण कंपनीच्या मनमानी कारभारामुळे विज दर आवाक्याच्या बाहेर गेल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. सदर,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने चालू आर्थिक वर्षात एक एप्रिल पासून विजेची दरवाढ केल्यामुळे ग्राहकांना मोठ्या प्रमाणात सोयगावकरांचा खिशाला मोठा फटका बसत असून सर्वसामान्य,मजूरदार शेतकरी यांना वीज बिल परवडत नसल्याने त्यांच्याकडे लाखो रुपयांची थकबाकी होत आहे तर काही नागरिक पोटाला चिमटा देऊन केलेली कमाई वीज बिल भरण्यामध्येच घालत आहेत त्यामुळे शासनाने यावर वीज बिल कमी करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत. प्रत्येकाला हवी असणारी वीज युनिटची किंमत आवाक्याच्या बाहेर पोहोचली असून यात वीज आकार १०० युनिट पर्यंत ४ रुपये ७१ पैसे, १०१ ते ३०० युनिट पर्यंत १० रुपये २९ पैसे, ३०१ ते. ५०० युनिट पर्यंत १४ रुपये ५५ पैसे, ५०१ ते १ हजार युनिट पर्यंत १६ रुपये ६४ पैसे तर १ हजार युनिटच्यानंतर १६ रुपये ६४ पैसे पर युनिट भरावे लागत आहेत. त्या सोबतच वहण आकार एका युनिटला एक रुपया सतरा पैसे, इंधन समायोजन आकार एका युनिटला ४०



पैसे, वीज शुल्क जे की महाराष्ट्र शासनाला भरला जाणार टॅक्स १६ टक्के इतका असून या सर्व अंदाजे जवळपास दहा रुपये पर युनिट सर्वसामान्यांना वीज बिल भरावा लागत आहे. वीज वितरण कंपनीला तोटा होत आहे, याचा गाजावाजा महावितरण करीत आहे. वितरण कंपनीतर्फे विजेची सेवा देताना ज्या बाबींची दखल घ्यायला हवी ती घेतली जात नसल्यामुळे त्यांचा तोटा वाढतोय त्यापैकी विजेची होणारी भरमसाठ चोरीवर उपाय केला जात नाही. लाईट दिवसेंदिवस राहत नाही आता पावसाळा सुरूवातीला काही दिवस बाकी परत वारा, गारा,अवकाळी पाऊस झाडे तुटली तारे तुटली म्हणुन लाईट प्रॉब्लेम सुरळीत लवकर होत नाही खूप काही समस्या निर्माण होतात याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने विज दर कमी करावेत पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तारे,डीपी किटक्याट विविध कामे दुरुस्त करून विज पुरवठा खंडित वारंवार होऊ नये याची दखल घ्यावी अशी सोयगाव तालुक्यातील जनतेतून चर्चा होत आहे.


# धमक्या देणाऱ्यांचा कार्यक्रम करणार : सुळे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** काही लोक तर धमक्या देतच फिरत होते. माझे एकावर तर फारच लक्ष आहे. मी वाटच बघते आहे तो परत कधी धमकी देतो. तो कुठे राहतो याचा पत्ता मला माहीत नाही. अर्ध्यावेळी नावही लक्षात राहात नाही. पण मला माणूस लक्षात आहे. सगळ्यात जास्त त्रास या संपूर्ण भागात धमक्यांचा कुणी दिला तर त्या व्यक्तीने दिला आहे. मी तेव्हा उमेदवार होते आता मी खासदार आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात असले लोक फिरत असतील तर त्यांचा करेक्ट कार्यक्रम कसा करायचा हे मला माहीत आहे. त्यामुळे बारामती लोकसभा मतदारसंघात आपल्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्याला दिलेली धमकी मी खपवून घेणार नाही. ज्याला कुणाला कळलं असेल त्याला कळलं असेल. आता कुणाचं काही करायची गरज नाही. जे उत्तर आपण द्यायची गरज होती ते उत्तर मतदारांनीच त्यांना दिले आहे, असेही सुप्रिया सुळेंनी म्हटलें आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीची लोकसभा निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार असा सामना बारामतीत रंगला होता. मात्र मैदानाबाहेरची लढत ही शरद पवार विरुद्ध अजित पवार अशी होती. या सामन्यात शरद पवारांनी बाजी मारली आहे. कारण सुप्रिया सुळे बारामतीतून चौथ्यांदा खासदार झाल्या आहेत. हा निकाल आपल्याला अनपेक्षित होता, पण आम्हीच कमी पडलो असं अजित पवारांनी म्हटलं आहे. अशात सुप्रिया सुळे या विजयाच्या सभा घेत आहेत. खडकवासला या ठिकाणी त्यांनी घेतलेली सभा, रोहित पवारांना दिलेला सल्ला सगळं चर्चेत आहे. कार्यकर्त्यांचा इतका उत्साह आहे की मला वाटतं आहे मी पहिल्यांदाच लोकसभा निवडून आले. ही निवडणूक सगळ्यांसाठीच नक्की वेगळी होती. आपले कार्यकर्ते आहेत त्यांनी निश्चय मनात पक्का केला आहे

# 'राष्ट्रीय पुस्तक मेळ्याला' कोथरूडमध्ये शानदार सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** भारतीय विचार साधना फौंडेशन आयोजित 'राष्ट्रीय पुस्तक मेळ्याला' (ता. ७) सुरवात झाली. हा मेळा तीन दिवस चालणार आहे. भारतीय संस्कृतीची, राष्ट्रप्रेमाची, आध्यात्माची, एकात्मतेची उर्जा वाचकांना मिळावी आणि वाचनाचे प्रमाण वाढत जावे या दृष्टीने या मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूडमधील बालशिक्षम मंदीर व आयएमसीसी इमारतीच्या तळमजल्यावर हे प्रदर्शन भरविण्यात आले असून ते सकाळी १० ते रात्री ९ या वेळात सुरू राहील.दरम्यान उद्घाटनसमारंभानंतर यावेळी सावरकर अभ्यासक, लेखक अक्षय जोग यांच्या 'दुर्लक्षित हिंदुहितवादी' या पुस्तकाचे प्रकाशन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष विनय सहस्रबुद्धे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे विश्वस्त राजेश पांडे, माजी खासदार प्रदीप रावत, लेखक अक्षय जोग, रा.स्व. संघ छत्रपती संभाजी भाग संघचालक अनिल व्यास व भाविसा फौडेशनचे अध्यक्ष चित्तरंजन भागवत आदींची उपस्थिती होती. 'त्यांना काय वाटेल? याचा अपराधगंड स्वातंत्र्यानंतर हिंदूंच्या मनात सातत्याने रुजवण्यात आला आहे. तो दूर करून राष्ट्रीय विचारांची निर्भय मांडणी करण्याची आज गरज आहे', असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वातंत्र्य चळवळीतील अनेक हिंदुहितवादी नेते, विचारक दुर्लक्षित झाले, आजही अनेकांना त्यांच्याबद्दल पुरेशी माहिती नाही, अशा हिंदुंचे हित जाणणाऱ्या विचारकांच्या कार्यावर प्रकाशझोत टाकण्याचे काम अक्षय जोग यांनी आपल्या पुस्तकातून केले आहे. हिंदुंचं हित बघणाऱ्यांना आता वेगळ्या दृष्टीकोनातून बघितले जाते, असे होता कामा नये, असे मत विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले. तर, भारतात प्रबोधनात्मक चळवळींचा कालावधी हा अत्यंत कमी आहे, या चळवळींना बंगालपासून सुरुवात झाली, असे प्रतिपादन माजी खासदार प्रदीप रावत केले. 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ गणेश आगरकर, राज नारायण बसू, नवगोपाळ मित्र, देवेंद्रनाथ ठाकूर आदींच्या विचार व कार्यातून हिंदूंच्या हिताच्या भूमिका ठळकपणे दिसतात. मात्र, त्याबाबत कोणी लिहीत वा बोलत नाही', असे जोग यांनी सांगितले. प्रकाशन समारंभाचे सुत्रसंचालन मिलिंद भणगे यांनी केले. याच मेळ्यात आज (शनिवार, ८ जून) सायंकाळी ४ ते ५ या वेळांत लेखक राजीव तांबे यांची बालगोपाळांसोबत गप्पांचा कार्यक्रम तर ९ जून रोजी 'फाळणीच्या वेदना' या पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हे दोन्ही कार्यक्रम आयएमसीसी इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील कॉन्फरन्स हॉलमध्ये सायंकाळी ४ वाजता होणार आहेत. भाविसा फौंडेशन आयोजित पुस्तकमेळ्यात दुर्लक्षित हिंदुहितवादी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना विनय सहस्त्रबुद्धे, (डावीकडून) अनिल व्यास, लेखक अक्षय जोग, विनय सहस्त्रबुद्धे, प्रदीप रावत, राजेश पांडे, चित्तरंजन भागवत.



# नियोजन शून्य कारभारामुळे प्रवाशांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** येथे जिल्ह्याच प्रमुख बसस्थानक आहे. या जिल्ह्यामधील तुळजापूर येथे हे महाराष्ट्राचे कुलदैवत आई तुळजा भवानीचे मंदिर आहे. यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांची संख्या भरपूर असते. तुळजापूरकडे ये जा करणाऱ्या भाविकांसाठी धाराशिव येथील प्रमुख बस स्थानक आहे. तसेच जिल्ह्याचे ठिकाण असल्याकारणाने महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहरात नोकरीनिमित्त अनेक नागरिक एसटी बसने प्रवास करत आहेत. हॉस्पिटल मुळे येथे येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षनिय आहे. संभाजीनगर, सोलापूर, तुळजापूर, बीड, लातूर, विजापूर शहरांना जोडणाऱ्या मार्गावरील धाराशिव हे एस.टी बस स्थानक आहे. यामुळे बस स्थानकात बहुसंख्येने प्रवासी रोज येत असतात. धाराशिवसंभाजीनगर, सोलापूर, तुळजापूर, बीड, लातूर, विजापूर अश्या अनेक शहरांना जोडणाऱ्या मार्गावरील धाराशिव एस.टी बस स्थानक हे एक महत्त्वाचे बस स्थानक आहे. मात्र रोहिणी नक्षत्राच्या पहिल्याच पावसात बस स्थानक व एसटी बस आगारात पाण्याची मोठमोठी डबकी साचली आहेत. या डबक्यातील साचलेले खराब पाणी प्रवाशांच्या अंगावर उडत जात आहे. बस स्थानक परिसरात मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यापूर्वी खड्डे भरण्याचे काम न केल्याने, बस स्थानक परिसरामध्ये नवीन बस स्थानकाचे काम सुरू असल्याने पावसाळ्यासाठी प्रवाशांच्या निवाऱ्याचं तात्पुरते उभा केलेल्या शेडसमोर पहिल्याच पावसात पाणी साचून तळ्याचे स्वरूप आले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला जनसामान्य लोक जे एसटीने प्रवास करतात त्यांचे असे हाल होणार आहेत. परिवहन महामंडळाच्या संबंधित विभागाने याकडे जर दुर्लक्ष केलं तर पुढील चार महिने या छत्र हरवलेल्या बस स्थानकावर शाळा महाविद्यालय सुरू झाल्यावर विद्यार्थी-विद्यार्थिनींना, दवाखान्यासाठी आलेल्या रुग्णांना, पोटाची खळगी भरण्यासाठी ये- जा करणाऱ्या चाकरमान्यांना, तुळजापुरला जाणाऱ्या भक्त भाविकांना धाराशिव येथील तोडक्या-मोडक्या बसण्याची सुविधा नसलेल्या आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे या बस स्थानकावर प्रवाशांना रेनकोट घालून जीव मुठीत धरून लाल परीची वाट बघत उभा रहायची वेळ येणार आहे.

# सुरेश कुटेला बीड पोलिसांनी घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** राज्यभर गाजलेल्या कोट्यवधी रुपयांच्या ज्ञानराधा बँक घोटाळ्याप्रकरणी तिरुमला उद्योग समूहाचे प्रमुख सुरेश कुटे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बीड पोलिसांनी पुण्यात ही कारवाई केली. कुटे यांच्याविरोधात विविध ठिकाणी पाच गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी सुरेश कुटे यांना सायंकाळी 5 वाजेपर्यंत ज्ञानराधा बँकेच्या घोटाळ्यासंबंधीचे दस्तऐवज सादर करण्याची मुदत दिली आहे. त्यानुसार कुटे यांना ठेवीदारांच्या ठेवी कसे परत करणार तसेच आरबीआय सोबत झालेला पत्रव्यवहार इत्यादी कागदपत्रे पोलिसांना सादर करायची आहेत. ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये 6 लाख 50 हजार ठेवीदारांचे 3 हजार कोटी रुपये अडकल्याने ठेवीदार प्रचंड आर्थिक तणावात आहेत. तात्पुरती गरज भागवावी म्हणून लोकांकडून घेतलेले देणे परत करताना ठेवीदारांच्या नाकीनऊ आले आहे. मात्र सुरेश कुटे यांनी बुधवारी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत तुम्ही माझ्या बँकेतून पैसे काढणार आहात आणि दुसऱ्या बँकेत व्याजासाठी टाकणारच आहात तर माझ्याच बँकेत पैसे राहू द्या, असे म्हणून गरजवंत ठेवीदारांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. त्यामुळे ठेवीदार आक्रमक होत आहेत. मागील 9 महिन्यांपूर्वी कुटे यांनी दिलेल्या चेकच्या तारखा संपत आल्याने ठेवीदार आता बँकेत चेक टाकणार आहेत. गेल्या आठ दिवसांपासून ज्ञानराधाच्या 51 पैकी 26 शाखा बंद आहेत. बँकेत चेक टाकणार, बाउन्स झाल्यास कुटेंवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करणार ऑक्टोबर 2023 मध्ये मी पैसे काढण्यासाठी बँकेत गेलो तेव्हा मला 7 महिन्यांची पुढील तारीख टाकून चेक दिला. चेकची मुदत संपत आली आहे. मी पोलिसांत गेलो मात्र त्यांनी टाळाटाळ केली. घर घेतल्यामुळे पैशाची अत्यंत गरज आहे. मुदत संपण्यापूर्वी मी चेक बँकेत टाकणार आहे. बाउन्स झाल्यास आता फसवणुकीचा गुन्हा दाखल करणारच, अशी प्रतिक्रिया एका ठेवीदाराने दिली.

सुरेश कुटे यांनी तत्काळ ठेवी वाटप सुरू करावे. यासाठी दोन दिवसांत ठेवीदारांची बैठक घेऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यात येईल, असा इशारा ठेवीदारांचे आंदोलक सचिन उबाळे यांनी दिली. आर्थिक शाखा करणार तपास ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये ठेवलेल्या ठेवी परत मिळत नसल्याने अनेक जण पोलिसांत जात आहेत. मात्र पोलिस त्यांना उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने काही ठेवीदारांनी बीड जिल्हा न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाच्या आदेशाने आतापर्यंत बीड, नेकनूर आणि माजलगावमध्ये ज्ञानराधा मल्टिस्टेटचे चेअरमन सुरेश कुटे आणि त्यांच्या पत्नी अर्चना कुटे यांच्यासह संचालकांवर 9 गुन्हे दाखल झाले आहेत. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे दिला आहे. या मल्टिस्टेटच्या संचालकासह कर्मचाऱ्यांनी संगनमत करून खातेदारांच्या ठेवी परत न करता त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे. शहरातील खातेदारांनी पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. परंतु पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे मल्टिस्टेटच्या खातेदार शिवकांता गौरीशंकर तोडकरी, दिनकर हांगे, दत्तात्रय पारडकर, आशाबाई पारडकर, चतुराबाई पारडकर यांनी शेवटी माजलगाव येथील सत्र न्यायालयात धाव घेऊन ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या संचालकांसह कर्मचाऱ्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी याचिका दाखल केली.

# जादादराने बियाणे विक्रीद्वारे शेकऱ्यांची लूट

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** खरीप हंगाम जवळ आल्याने शेतकऱ्याकडून खाते व बियाणे घेण्यासाठी लगबग सुरु आहे. मात्र कृषी केंद्र दुकानदारांकडून जादा दराने बियाणे विक्री केल्या जात असल्याच्या तक्रारी शेतकरी वर्गाकडून होत आहे. जादा दराने बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्रावर कृषी विभागाने तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना कृषी केंद्र चालकांकडून जादा दराने बियाणे विक्री होत असल्यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आज तालुका कृषी अधिकारी यांची भेट घेतली. दरम्यान देऊळगाव राजा तालुक्यामधील अनेक कृषी केंद्र जादा दराने बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची लूट करत असून अशा कृषी केंद्राचे परवाने कायमस्वरूपी निलंबित करण्याची मागणी राष्ट्रवादीने कृषी अधिकाऱ्यांकडे केली. देऊळगाव राजा तालुक्यात शेतकऱ्यांकडून शेतीसाठी लागणाऱ्या बियाणांची खरेदी सुरू आहे. सर्व कंपन्यांचे कापूस बियाण्यांच्या पाकिटाची किंमत 864 रुपये एवढी ठरलेली आहे. मात्र असे असताना काही कृषी केंद्र चालक हे शेतकऱ्यांना वाढीव दराने कपाशीचे बियाणे विक्री करत आहे. शिवाय लिंकिंग बियाणे घेण्यासाठी अडवणूक करत आहे. तर अनेक शेतकऱ्यांना बियाणे मिळत नसल्याचा प्रकार देखील पुढे येत आहे. अशावेळी कृषी विभागाने सतर्क राहून वाढीव दराने बियाणे विक्रीवर तात्काळ अंकुश लावणे गरजेचे आहे. तसेच कृषी केंद्राचे साठा रजिस्टर अद्यावत आहेत की नाही हे देखील तपासणे गरजेचे असून कीटकनाशके कायद्यातील तरतुदीनुसार ज्यादा दराने बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्रावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी चे तालुका अध्यक्ष राजेश इंगळे, तालुका सचिव जहीर पठाण, उपाध्यक्ष रावसाहेब गाडवे,शहराध्यक्ष विजय खांडेभराड,आजमत खान,शंकर वाघमारे, जना मगर,असलम खान, राजू गव्हाणे आदींनी कृषी विभागाकडे केली आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# दुष्काळात होरपळणाऱ्या जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही

## नाना पटोले : नवनिर्वाचित खासदारांनी आपल्या मतदारसंघातील दुष्काळग्रस्तांना आधार द्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात सध्या भीषण दुष्काळ असून जनता या दुष्काळाने होरपळून निघाली आहे. हंडाभर पाण्यासाठी महिलांना पायपीट करावी लागत आहेत तर जनावरांना चारा नाही. महाभ्रष्टयुती सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडले आहे परंतु काँग्रेस पक्ष जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. काँग्रेसच्या नवनिर्वाचित खासदारांनी आपापल्या भागातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून शेतकरी व जनतेशी संवाद साधावा, अशा सुचना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्या आहेत.

टिळक भवनमध्ये आज काँग्रेसच्या नवनिर्वाचित खासदारांची बैठक झाली या बैठकीत दुष्काळावर चर्चा करण्यात आली. जनतेने काँग्रेस पक्षावर मोठा विश्वास दाखवलेला आहे. दुष्काळाने संकटात सापडलेल्या जनतेच्या पाठीशी सरकार उभे राहत नाही असे चित्र आहे परंतु काँग्रेस पक्ष जनतेचे प्रश्न




हाती घेऊन सरकारला जाब विचारेल. दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून केंद्र सरकार बरोबरच राज्य सरकारकडेही मदतीसाठी पाठपुरावा केला जाईल, त्यासाठी खासदारांनी आपल्या मतदारसंघात दुष्काळी भागाचा दौरा करून आढावा घ्यावा. दुष्काळग्रस्तांशी संवाद साधून त्यांना आधार द्यावा तसेच प्रशासनाकडे पाठपुरावा करून दुष्काळग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रदेशाध्यक्ष म्हणाले.



# शनेश्वर देवस्थानला मनोज पवार यांच्याकडून मदतीचे आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील श्रीक्षेत्र नेवपुर येथे उद्दोजक मनोज पुष्पाबाई केशवराव पवार यांनी श्री शनिदेवाची आरती करुन दर्शन घेतले यावेळी शनिभक्तांनी शनिदेवाचे मंदिराचे काही राहिलेले बांधकामासाठी देणगी दयावी अशी इच्छा व्यक्त केली या वेळी उदयोजक मनोज पवार यांनी लागलीच 51000 रुपेयची देणगी देण्याची घोषणा केली तसेच मंदीराचे सवेसर्वा शनीभक्त 1008 मंडलेश्वर सुखदेव महाराज यांनी मनोज पवार यांना भावी आमदारा साठी भरभरून आशीर्वाद दिले व तुमच्या सर्व ईच्छा पुर्ण होतील असे ही आशीर्वाद दिले या प्रसंगी बबनराव बनसोड, गणेश पिंपळे, अनिल खंबाट, पवन ठाकूर, रुपेश भारुका,आदित्य गव्हारे, शंकर राउत, बंटी जाधव, सतिश खिलारे व सर्व शनीभक्त, ज्येष्ठ नागरिक, माता भगिनी ,तरुण मित्र मंडळ व उद्दोजक मनोज पवार मित्र मंडळ उपस्थित होते.

# सामाजिक वनीकरणतर्फे पर्यावरण दिन

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** सामाजिक वनीकरण परिषद देऊळगाव राजा तर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मोरेश्वर महादेव हरित टेकडीवर वडाचे रोप लागवड करण्यात आले. दिवसेंदिवस बिघडत चाललेल्या पर्यावरणाचा समतोल हा विषय आता आणखी गंभीर होत चालला आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे गरजेचे झाले आहे.याचाच एक भाग म्हणून जागतिक पर्यावरण दिन निमित्त रोप लागवड सप्ताह चे आयोजन स्थानिक सामाजिक वनीकरण विभागामार्फत करण्यात आले होते. सदर सप्ताह निमित्त वड रोपाची लागवड करण्यात आली. यावेळी वनपाल श्री गवळी, सोसे बाबू, संरक्षण मजूर सुखदेव शिंदे, महेश चाटे विशाल चाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



# शिक्षकांच्या समस्या सोडवा : शिवणकर

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** ७ जुन रोजी शिक्षणाधिकारी माध्यमिक नागपूर यांना जनता शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्य मा.अनिल शिवणकर राज्य सचिव यांच्या उपस्थितीत मा.शिक्षणाधिकारी प्राथ. यांना निवेदन सादर करण्यात आले. जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

वरिष्ठ व निवड श्रेणी मंजूर करणे, निम्न श्रेणी सहाय्यक शिक्षकांना स्थायी करणे, प्रतिनियुक्त कर्मचाऱ्यांना मूळ आस्थापनेवर रुजू करणे, निम्न श्रेणी सहाय्यक शिक्षक व पदवीधर शिक्षकांना पदोन्नती देणे. समायोजन प्रक्रिया राबवणे, सेवाजेष्ठता यादी तयार करणे, दुर्गम भागातील शासकीय विनंती बदली यादी प्रसिद्ध करणे. आदिवासी एक स्तर थकबाकी देणे. वरील मागण्याचे निवेदन मा. शिक्षणाधिकारी प्राथ. यांना देण्यात आले. तसेच मा.शिक्षणाधिकारी (माध्य) यांची भेट घेवून सहविचार सभेची तारीख निश्चित करण्यात आली.

जनता शिक्षक महासंघ, नागपूर मा. अनिल शिवणकर (राज्य सचिव), संदीप उरकुडे,सुधीर गवारकर, भाग्यश्री भोयर, डॉ. यमुना नाकले, माधुरी करपे, संगीता देशभ्रतार, संगीता ढबाले, लता मेहतकर, सोनाली सोनटक्के, मुख्याध्यापक शेषराव घाटोळे, सुरेश ढोके, चंद्रशेखर शिवणकर, मीरा माहुरे, प्रफुल काळे, बंडू लोहारे, राकेश भलावी व इतर उपस्थित होते.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर